
ISSN 0973-8452
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र-ज्येष्ठ १९३५
एप्रिल-जून २०१३ / खंड ३७ अंक १


- डॉ. र. पु. कुरुलकर: अर्थशास्त्राचे कृतिशील अभ्यासक
- भारतीय बँकिंग : एक दृष्टिक्षेप
- नियोजन काळातील भारताचे जलधोरण
  सहकारी तत्त्वातील संक्रमण
- भारतातील भाववाढ व चलन धोरण
  केन्द्रीय अर्थसंकल्प २०१३-१४: एक दृष्टिक्षेप
- एकात्मिक बाल विकास सेवा योजना
- भारतातील भाववाढीची चिकित्सा
  सहकारी चळवळ: नवी दिशा
  कृषि विकासासाठी करार शेती
- कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ
  अपंगांचे समावेशन: एक दृष्टिक्षेप
- निबंधलेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषय रूपरेषा

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

एप्रिल-जून २०१३ / खंड ३७ अंक १

International Research Journal
ISSN 0973-8452
Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।
www.marthpari.org

**प्रमुख संपादक**
**अविनाश रामलाल निकम**

**सहाय्यक संपादक**
शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**
(२०१२-१५)
प्रशांत काटोले
अशोक खाचणे
राहुल म्होपरे
अशोक हळ्ळी

**संपादकीय पत्रव्यवहार**
**डॉ.अविनाश निकम**
मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

लेखातील मते लेखकांचीच

## अनुक्रमणिका

**अविनाश निकम**, शहादा
संपादकीय संवाद........ १
**धनश्री महाजन**, औरंगाबाद
डॉ.र.पु.कुरुलकर: अर्थशास्त्राचे कृतिशील अभ्यासक........ ३
**कैलास पाटील**, परभणी
भारतीय बँकिंग : एक दृष्टिक्षेप........ ६
**प्रकाश तितरे**, भद्रावती
नियोजन काळातील भारताचे जलधोरण........ २५
**महादेव पाटील**, मिरज
सहकारी तत्त्वातील संक्रमण........ ३४
**मधुकर शिंदे**, उरण-इस्लामपूर
भारतातील भाववाढ व चलन धोरण........ ३८
**संजय तुपे**, नाशिक
केन्द्रीय अर्थसंकल्प २०१३-१४: एक दृष्टिक्षेप........ ५१
**साबळे एस.एन.**, संगमनेर, **सापनर बी.एन.**, नाशिक
एकात्मिक बाल विकास सेवा योजना........ ५५
**युगंधरा देशपांडे-टोपरे**, औरंगाबाद
भारतातील भाववाढीची चिकित्सा........ ६६
**नारायण टाक**, जेजुरी
सहकारी चळवळ: नवी दिशा........ ७३
**चंद्रकांत कोकाटे, आनंदा वडवळे**, औरंगाबाद
कृषि विकासासाठी करार शेती........ ७९
**वाय. एस. गायकवाड**, सांगली
कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ........ ८७
**बी.आर.सोनवणे**, सिल्लोड
अपंगांचे समावेशन: एक दृष्टिक्षेप........ ९६
निबंधलेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषय रूपरेषा
**अवधूत नाडकर्णी**, मुंबई........ १००
**श्रीराम जोशी**, जळगाव........ १०२
**लालासाहेब घाटगे**, सातारा........ १०४

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**कार्यकारी मंडळ २०१३-१४**

**अध्यक्ष**

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

मधुकर शिंदे (इस्लामपूर)
सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
मुक्ता जहागिरदार (अमरावती)

**सदस्य**

श्रीराम जोशी (जळगाव)
सुरेश ढाके (डोंगरकठोरे)
हरिहर तिवारी (वाशीम)
रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
बालाजी शिंदे (परभणी)
वामन सावंत (रत्नागिरी)
वनिता चौरे (चांदूरबाजार)



**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.
दूरध्वनी: ०२१८४-२२४२९४,
भ्रमणध्वनी: ८८०५६९१४०६


**वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१२-१३ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय संवाद...

### उत्तराखंडचा महाप्रलय...

इथं समुद्र किनारा नाही म्हणून काय झालं? आभाळ भेदणाऱ्या हिमालयाच्या पर्वत रांगा, हिमाच्छादीत शिखरं, आकाशाकडे उंच झेपावणारी... खूप उंच जाण्याची स्पर्धा करणारी झाडं, पर्वत रांगांना छेदून जमिनीला भिडणाऱ्या खळखळत्या अप्रतिम नद्या, थंडगार आल्हाददायक हवा, जिकडं पहावं तिकडं निसर्गाची भरभरून उधळण, घाटातून नदीकाठानं जाणारे वळणा-वळणाचे रस्ते... हे सगळं काही उत्तराखंडमध्ये आहे. अनेक ठिकाणी पर्वतावरून उतरणारे धबधबे रस्त्यावरून प्रवास करत खाली नद्यांना जाऊन भेटतात. खरं सांगायचं तर काश्मीरपेक्षा सुंदर हा परिसर आहे. कारण इथं कृत्रिमता नाही. निसर्गाच्या बाबतीत मानवाचा हस्तक्षेप कमीतकमी आहे. बद्रिनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमुनोत्री या हिमालयातील चार धाम यात्रेसाठी भावीक मोठ्या संख्येनं जातात. ही आठ दिवसांची यात्रा बरेच लोक हरिद्वारपासून सुरू करतात. हरिद्वारहून ऋषिकेश हा अर्ध्या तासाचा प्रवास केल्यानंतर या यात्रेत पुढे ७-८ दिवस सखल जमीन व सरळ रस्तेच दिसत नाहीत. संपूर्ण पर्वतमय प्रदेशातील ही यात्रा आहे. उत्तराखंडमध्ये शहरे, लहान-लहान गावे नदीकाठावर आहेत. साहजिकच रस्तेही सामान्यपणे नदीकाठावरच आहेत. गावे वसण्यासाठी सखल जमिनीचा तुटवडा आहे. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा वसलेली अनेक गावे आहेत. रस्त्याच्या एका बाजूस पर्वत तर दुसऱ्या बाजूस खळाळती नदी असते त्यामुळे डोंगराच्या कडेला असलेल्या घरांना अतिवृष्टीने मलबा येण्याची भिती असते तर नदीकाठाकडील घरांना पुराची भीती असते.

भरपूर पाऊस होणं, नद्यांचं पाणी वाढणं, मलबा (पर्वताचा कडा) वाहून रस्त्यावर येणं या समस्यांची स्थानिक रहिवाश्यांना सवय झाली आहे परंतु जून महिन्यात उत्तराखंडमध्ये प्रचंड पावसानंतर ढगफुटी होऊन आलेल्या भीषण पुरामुळे गावेच्या गावे वाहून गेली आहेत. रस्ते, पूल आणि दळणवळणाचे सर्व मार्गही खचले आहेत. या महाप्रलयामुळे शेकडो रस्त्यांचे नुकसान झाले आहे. टिहरी येथील २५९, उत्तर काशीतील १३२, चमोलीतील ११०, रुद्रप्रयाग जिल्ह्यातील ७१ तर डेहराडूनमधील १३९ रस्त्यांचा त्यात समावेश आहे. केदारनाथ तीर्थक्षेत्राची मोठी हानी झाली आहे. यात अनेकांनी आपलं सर्वस्व गमावलं आहे.

उत्तराखंडमधील प्रलयाच्या प्रवाहात अनेक जण वाहून गेले तर अनेक गाडले गेले त्यामुळेच या नैसर्गिक संकटात नेमक्या किती जणांनी प्राण गमावले याचा अंदाज कधीच येणार नाही. मृतांची संख्या काही हजारात असल्याची भिती व्यक्त केली गेली. उत्तराखंड विधानसभा अध्यक्ष यांनी या आपत्तीतील मृतांचा आकडा दहा हजाराहून अधिक असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. प्रलयानंतर १०-१५ दिवस काही गावांशी प्रशासनाचा संपर्क होऊ शकला नाही.

अन्नधान्याची मोठी टंचाई सुरू झाली. अशा काळात खाद्य पदार्थांचे भाव गगनाला भिडणे साहजिकच होते. हिमालयाच्या पर्वत रांगांमध्ये अडकलेल्या नागरिकांना वाचविण्यासाठी हेलिकॉप्टरची मदत घेतली गेली. मदतकार्यात पर्जन्यवृष्टीमुळेही अडथळे आले. उत्तराखंडमध्ये आलेल्या महाप्रलयाचा तडाखा तेथे गेलेल्या पर्यटकांना बसला याकडे प्रसिध्दी माध्यमांचे पूर्ण लक्ष होते पण खरा तडाखा बसला तो तेथील स्थानिक नागरिकांना. कारण केवळ त्यांची घरंच नाहीत तर दुकानं तसेच स्वयंरोजगाराची साधनंही वाहून गेलीत. त्यामुळे लोक रस्त्यावर आले, नव्हे, रस्त्यावर आले कसले? रस्त्यावर येण्यासाठी रस्ते शाबूत असावे लागतात. ठिकठिकाणी रस्तेच वाहून गेले आहेत. आभाळाचं छत आणि जमीन हाच निवारा अशी स्थिती त्यांच्यापुढं येऊन ठेपली आहे. एका दिवसात उत्पन्नाचं साधन आणि घरदार जाऊन आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे उध्वस्त झाल्याची तेथे हजारो उदाहरणे आहेत. जे पर्यटक अडकले होते त्यांना हेलिकॉप्टरने डेहरादूनला सोडल्यानंतर निदान त्यांचं घरदार आणि सगळंच ठिकठाक होतं हे पाहता तेथील जनतेचं संकट खूप मोठं आहे. इतर लोकांना निदान हेलिकॉप्टरने सुरक्षित स्थळी जाता आलं उध्वस्त झालेले स्थानिक रहिवासी हेलिकॉप्टरने जाणार तरी कुठं? त्यांनी गावं सोडली नाहीत. येथील अर्थव्यवस्था केवळ पर्यटनावर अवलंबून आहे. लहान-मोठी दुकानं, रेस्टॉरंट्स, लॉजींग्ज, खासगी वाहतूक हाच रोजगाराचा प्रमुख मार्ग येथे आहे. शेती अत्यंत तुरळक असून डोंगरदऱ्यात किरकोळ पिकं घेतली जातात. केदारनाथ, यमुनोत्री येथे हजारो लोकांचा व्यवसाय खेचरने प्रवासी वाहतूक करणे हा आहे. सहा महिने चालणाऱ्या या यात्रेत त्यांना दिवसाला दोन-तीनशे रुपये मोठ्या कष्टाने मिळतात. खालच्या गावात राहणारे हे लोक राहण्यासाठी तात्पुरती झोपडी तेथे बांधतात. या लोकांची खेचरे वाहून गेल्याने ते हतबल झाले आहेत. या भागात सहा महिने हिमवृष्टी होत असल्याने त्यांना सहा महिन्याचा किराणा व आवश्यक वस्तू त्यापूर्वी साठवाव्या लागतात. अशा स्थितीत या लोकांपुढे संकटांचा ससेमिरा लागला आहे. दोन-तीन वर्षे पर्यटक तिकडे जाऊ शकणार नाहीत. रस्ते सुरू झाल्यानंतरही पूर्वीइतकी पर्यटकांची रेलचेल राहणार नाही. अशा परिस्थितीत केन्द्र व राज्य शासनासमोर हे राज्य आर्थिकदृष्ट्या पुनर्स्थापीत करण्याचं मोठं आव्हान उभं आहे. केंद्र-राज्य सरकारे, सामान्य जनतेकडून मदतीचा ओघ सुरू आहे. अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी उत्तराखंडमधील पुनर्बांधणी व पुनर्वसनासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेण्याची घोषणा केली आहे. नगरपालिका क्षेत्रांमध्ये राजीव गांधी आवास योजनेअंतर्गत घर बांधणी सुरू करता येईल. उत्तराखंड राज्याचा आर्थिक कणा मोडला असला तरी आलेल्या निधीचा वापर राज्यकर्ते कोणत्या पध्दतीने करतात, यावर बरंच अवलंबून आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले यांनी सलग चार अंकांना जाहिरात देऊन सहकार्य केलं असून पुढील चार अंकांना जाहिरात देण्याचं आश्वासन दिलं आहे याबद्दल प्रा.चारुदत्त गोखले यांचे मन:पूर्वक आभार ! हा अंक वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

**अविनाश रामलाल निकम**
(प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद')

# डॉ.र.पु.कुरुलकर: अर्थशास्त्राचे कृतिशील अभ्यासक

**धनश्री महाजन, औरंगाबाद,**
अर्थशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब
आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
भ्रमणध्वनी: ९८८११३१०९३.

डॉ.र.पु. कुरुलकर सरांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्राची आणि विशेषत्वाने महाराष्ट्रातल्या मराठवाडा, विदर्भ आणि कोकणासारख्या मागास विभागांची अपरिमित हानी झाली आहे. अखेरच्या श्वासापर्यंत महाराष्ट्राच्या समतोल विकासाचा ध्यास घेतलेलं सरांचं व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेलं आहे. १४ जानेवारी १९३३ रोजी हिंगोली येथे सरांचा जन्म झाला. सरांचे पितृछत्र ते फार लहान असतानाच हरपले. त्यांच्या मातोश्रींनी मोठ्या धीराने प्रपंचाचा भार पेलला. १९४० च्या दशकात त्यांनी आधी स्वत:चे शिक्षण पूर्ण करुन शिक्षिकेची नोकरी पत्करली. परिस्थितीची प्रतिकूलता ध्यानात घेऊन कुरुलकर सरांनी उस्मानिया विद्यापीठातून पदवीचे शिक्षण पूर्ण होताच माध्यमिक शाळेत शिक्षकाची नोकरी स्वीकारून कुटुंबाचा भार पेलला. शालेय अध्यापनाचे काम करत असतानाच त्यांनी अर्थशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर उदयगिरी आणि मिलिंद कला महाविद्यालयात काम केल्यावर ते १९७२ मध्ये तत्कालीन मराठवाडा विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. १९७८ मध्ये प्रा.बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेल्या त्यांचा पीएच्.डी. प्रबंध इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन, दिल्ली या संस्थेच्या काशीप्रसाद स्मृती पारितोषिकाचा मानकरी ठरला. १९८८ मध्ये सरांनी मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. १९९३ मध्ये विभागप्रमुख म्हणून निवृत्त होईपर्यंत अध्यापनाखेरीज सहा संशोधन प्रकल्प, क्रमिक आणि संदर्भग्रंथाचे लेखन, शोधनिबंधांसाठी संशोधन, सर्वेक्षण यात कुरुलकर सर सतत व्यग्र असत.

कुरुलकर सरांचा प्रादेशिक अर्थशास्त्र आणि समग्रलक्षी अर्थशास्त्र या विषयांचा गाढा व्यासंग होता. अर्थमिती आणि संख्याशास्त्र हे त्यांच्या आवडीचे विषय होते. बँकिंगची तत्वे आणि पध्दती यावर सरांनी एमएच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकाचे लेखन केले. याशिवाय अर्थशास्त्र परिभाषा कोषाच्या संपादनातही योगदान दिले. अभिनव अर्थशास्त्र, जिल्हा नियोजन, रोजगार हमी योजना आणि भूमिहीन

शेतमजूर, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, नवीन आर्थिक धोरणाचा रोजगारावरील परिणाम, भारतीय अर्थव्यवस्था या विषयांवर त्यांनी पुस्तके लिहिली.

आपलं ज्ञान समाजाच्या उपयोगी पडलं पाहिजे असं ते त्यांच्या विद्यार्थ्यांना सतत सांगत असत आणि त्यांच्या सहवासात येणाऱ्या संशोधकांना *मागास विभागांचा विकास* या विषयावर काम करण्यासाठी प्रेरित करीत असत. निवृत्तीनंतर त्यांनी आपला वेळ महाराष्ट्रातील मागास विभागांच्या समस्यांच्या अभ्यासाला द्यायला सुरुवात केली. मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने कुरुलकर सरांनी बीड आणि जालना जिल्हयांचे विकास विषयक चित्रण प्रकल्प हाती घेतले व जिल्हा नियोजनाचे उपयोजन कसे करता येईल याचा वस्तुपाठच आपल्या संशोधनातून घालून दिला. औरंगाबाद येथील स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेचे संचालक म्हणून कोणत्याही मानधनाची अपेक्षा न करता संस्थेच्या वतीने अनेक संशोधन प्रकल्प स्वीकारुन त्यांनी ते आपल्या नेतृत्वाखाली पूर्णत्वाला नेले आणि स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेला नावारुपास आणले.

१९९५ मध्ये राज्य शासनाने महाराष्ट्रातल्या प्रादेशिक असमतोलावर संशोधन करण्यासाठी नेमलेल्या इंडिकेटर्स ॲन्ड बॅकलॉग कमिटीचे तज्ञ सदस्य म्हणून सरांची नियुक्ती केली. १९९८ मध्ये अमरावती येथे पार पडलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. त्याचवर्षी सरांनी मराठवाडा वैधानिक विकास मंडळावर तज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती स्वीकारली आणि मंडळाच्या कामाला पूर्ण न्याय देता यावा म्हणून दक्षिण आशियाई देशांच्या पाणी वाटप सल्लागार समितीचे तज्ञ सदस्य म्हणून मिळणारे मोठे मानधन नाकारुन समितीकडे आपला राजीनामा सोपवला.

२००१ मध्ये महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या मानव विकास अहवालाच्या अभ्यास पध्दतीतले दोष दाखवून सरांनी महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकाचे यूएनडीपीच्या अभ्यास पध्दतीच्या आधारे मापन करुन पर्यायी निष्कर्ष मांडले. महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांचा वंचना निर्देशांकही काढला. स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेच्या वतीने मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांच्या कृषी विकासाचा आराखडा कृषी क्षेत्रातल्या तज्ञ संशोधकांची मदत घेऊन तयार केला. रिसोर्स मॅपिंग ऑफ लो एच.डी.आय. डिस्ट्रिक्टस् इन महाराष्ट्र या प्रकल्पा अंतर्गत परभणी, हिंगोली आणि उस्मानाबाद जिल्ह्यात रोजगार वाढवण्यासाठी कोणते उद्योग स्थापन करता येऊ शकतील याचा बारकाईने अभ्यास करुन सरांनी आपल्या नेतृत्वाखाली या जिल्ह्यांचे अहवाल तयार करुन ते महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला सादर केले.

प्रादेशिक अर्थशास्त्राचा आपला व्यासंग पणाला लावत कुरुलकर सरांनी मागास विभागांना प्रगत विभागांच्या बरोबरीने पुढे आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा, समाजकारणाचा आणि राजकारणाचाही अत्यंत बारकाईने अभ्यास केला. आवडीच्या विषयात त्यांच्या व्यासंगाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने २००६ मध्ये सरांना राज्य नियोजन मंडळाचे सदस्यपदी नियुक्त केले.

मागास विभागांचा अनुशेष दूर होऊन महाराष्ट्राचा समतोल विकास व्हावा यासाठी शासन स्तरावर अपेक्षित उपाय योजनांबाबत त्यांनी राजकारण्यांच्या दोन पिढ्यांचे प्रबोधन केले.

योजना खर्चाप्रमाणेच योजनेतर खर्चासाठीच्या विभागवार तरतुदी राज्याच्या अर्थसंकल्पात दिल्या जाव्यात, याबाबतची शिफारस सरांनी वैधानिक मंडळाच्या माध्यमातून मा.राज्यपालांकडे केली आणि ती मान्य करुन मा.राज्यपालांनीही तसे आदेश राज्य शासनाला दिले.

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील खर्चाच्या विभागवार तरतुदीबाबत पारदर्शिता आणण्यासाठी सरांनी सतत पाठपुरावा केला. महाराष्ट्राप्रमाणेच आंध्र प्रदेशातही राज्य अर्थसंकल्पामध्ये खर्चाची विभागवार तरतूदीची मागणी यामुळे पुढे येऊ लागली आहे. मानव विकास निर्देशांकाच्या आधारे जिल्हयांना निधी वाटप करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वापरलेले सूत्र विकसित जिल्हयांना जास्त आणि अविकसित जिल्हयांना कमी निधी देणारे आहे हे दाखवून वैधानिक विकास मंडळाचे प्रभारी अध्यक्ष असतांना त्यांनी मंडळाच्या माध्यमातून निधी वाटपाचे पर्यायी सूत्र शासनासमोर मांडले. १९९८ मध्ये सरांनी केलेल्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या अभ्यासाला इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशनचा पुरस्कार प्राप्त झाला. त्याच वर्षी मराठी अर्थशास्त्र परिषदेचा उत्कृष्ट शोधनिबंधासाठीचा भावे पुरस्कार तसेच २००७ मध्ये मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेचा उत्कृष्ट शोधनिबंधासाठीच्या पुरस्काराचे सर मानकरी होते. शिक्षण क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत दिल्ली येथील इंडियन सॉलिडॅरिटी कौन्सिलने त्यांना अलिकडेच राष्ट्रीय विद्या गौरव सुवर्ण पदक प्रदान केले. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन ॲन्ड मॅनेजमेंट या संस्थेच्या बेस्ट एज्युकेशनिस्ट पारितोषिकाचेही सर मानकरी ठरले.

२०११ मध्ये राज्य शासनाने कुरुलकर सरांची समतोल विकासावरील उच्चाधिकार समितीचे (केळकर समिती) तज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती केली. त्याच सुमारास शासनाने महाराष्ट्रातल्या मागास विभागांचा अनुशेष आता संपला आहे असेही जाहीर केले. त्यावर १९८४ ते २०१२ या काळात मागासलेल्या विभागांचे मागासपण कायम राहून नवा अनुशेष कसा तयार झाला आहे याची सप्रमाण मांडणी सरांनी केली आणि या विषयावर संशोधनपर लेखही प्रकाशित केले. केळकर समितीचे तज्ञ सदस्य म्हणून सरांवर मराठवाडयाच्या प्रादेशिक अभ्यासाची जबाबदारी होती. ती यशस्वीपणे पार पाडत सरांनी समितीपुढे 'रीजनल स्टडी ऑन मराठवाडा' या अभ्यासाचा खंड सादर केला. यासाठी अनेक तज्ञ अभ्यासकांचे लेख संपादित केले व मागास प्रदेशांचे दरडोई उत्पन्न प्रगत प्रदेशांच्या बरोबरीने आणण्यासाठीची एक निश्चित व्यूहरचना आणि कृती कार्यक्रम सरांनी मांडला. लवकरच केळकर समितीचा अहवालही सादर होईल. पण महाराष्ट्रातल्या मागास विभागांना अनुशेषापासून मुक्ती देऊन प्रगत विभागांच्या बरोबरीने आणण्यासाठी आत्मीयतेने, खऱ्या तळमळीने, त्यासाठी पडणाऱ्या कष्टांची तमा न करता काम करणाऱ्या कुरुलकर सरांची उणीव नेहमीच जाणवत राहील. महाराष्ट्र आज अर्थशास्त्राच्या एका कृतिशील अभ्यासकाला मुकला आहे. सरांची खंबीरपणाने साथ देणाऱ्या त्यांच्या सुविद्य पत्नी कुमुदिनी कुरुलकर आणि कन्या डॉ.संगीता, रागिणी, ॲड.मंजूषा आणि दीपा यांच्या दुःखात मराठी अर्थशास्त्र परिषद सहभागी आहे.

# ३६ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन

## अध्यक्षीय भाषण

# भारतीय बँकींग - एक दृष्टिक्षेप

**कैलास काशिनाथ पाटील**, परभणी
कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९४२३१०२८६३.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाच्या मुख्य उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष, ३६ व्या वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटक, प्रमुख पाहुणे मा.डॉ.आर.पी.कुरुलकर (माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ.बा.आं.म.वि., औरंगाबाद) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ.संतोष दास्ताने, डॉ.व्ही.बी.जुगळे, डॉ.व्ही.बी.भिसे, डॉ.आर.एस.सोळुंके, डॉ.बी.के.शिंदे व परीषदेचे सन्माननीय माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले, कार्यवाह-खजिनदार प्राचार्य डॉ.अनिल सूर्यवंशी, अर्थसंवादचे मुख्य संपादक प्रा.डॉ.अविनाश निकम, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वायकोळे मॅडम, स्थानिक कार्यवाह प्रा.व्ही.डी.पाटील व त्यांचे सर्व सहकारी, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विश्वस्त, पत्रकार आणि परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य बंधू-भगिनींनो.......

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३६व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी सर्वाधिक मताधिक्याने माझी निवड करून माझा आपण जो सन्मान केला त्याबद्दल सर्वप्रथम मी सर्वांप्रति जाहीर कृतज्ञता व्यक्त करतो.

मराठी अर्थशास्त्र परिषदेची वार्षिक अधिवेशने, वर्षभरातील नियमित उपक्रम, परिषदेच्या कार्याचा महत्त्वाचा भाग म्हणजे अर्थसंवाद हे त्रैमासिक यात आर्थिक विषयावर लिहिलेले संशोधनपर लेख हे परिषदेचे साडेतीन दशकातील उल्लेखनीय वैशिष्ट्ये.

प्रास्ताविक:

अलिकडच्या काळात बँकींग क्षेत्रात अनेक उच्चावचने घडत आहेत.

बँकिंग हा कोणत्याही देशाचा विकासाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. प्रगत तथा विकसित देशांच्या बँकींग क्षेत्रात कमालीची घसरण स्थिती निर्माण झाली आहे. या हेतूने *भारतीय बँकिंग - एक दृष्टिक्षेप* हा संदर्भ विचारात घेतला आहे.

बँक आधुनिक काळातील एक महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था आहे. जगातील कोणत्याही देशाच्या प्रगतीत बँकांचा सिंहाचा वाटा आहे. मानवाच्या शरीरात सर्वच रक्तवाहिन्यांना जितके महत्त्व असते, तेवढेच महत्त्व विद्यमान स्थितीत अर्थव्यवस्थेत बँकांना प्राप्त झाले आहे. भारतात बँक व्यवसायाचे अस्तित्त्व पुरातन काळात असल्याचे सांगितले जाते. बँक व्यवसायाचा उल्लेख वैदिक व बौध्दकालीन लिखाणातही दिसून येतो. इतकेच नव्हे तर विभिन्न साम्राज्य काळातूनही भारतात बँक व्यवसाय अस्तित्वात होता. पण तेथील बँक व्यवसायाची रचना व पध्दती एतद्देशीय होती. ब्रिटीशांच्या प्रवेशानंतर हळू-हळू एतद्देशीय बँकिंगचा ऱ्हास होऊ लागला. पण अद्यापही ग्रामीण भागात एतद्देशीय बँकिंगचे अस्तित्व पूर्णपणे संपलेले नाही.

'एतद्देशीय बँकांना पूर्वीच्या काळी मिळालेली राजमान्यता काळाच्या ओघात नष्ट झाली. ज्यामुळे एतद्देशीय बँक व्यवसायाला तडा गेला. तद्नंतर युरोपीय हाऊसेसचा उदय, वाढता व्यापार, औद्योगीकरण व आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताचा वाढता सहभाग, यामुळे आधुनिक बँक व्यवसायाचा वेगाने उदय झाला.'

इंग्लंडमध्ये बँकिंगचा विकास होत असताना जगातल्या विभिन्न राष्ट्रांमध्येही आधुनिक बँकांचा विकास झालेला दिसून येतो. भारतातील बँक व्यवसाय हा इंग्लंडच्या बँकींगच्या धर्तीवर प्रगत झाला आहे. भारतीय बँकींग प्रणालीचा अभ्यास करताना प्रामुख्याने दोन कालखंड विचारात घ्यावे लागतील.

**अ)स्वातंत्र्यपूर्व काळातील बँकिंग व्यवसाय:**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील बँकिंग व्यवसायाला कोणतीच दिशा नव्हती. परिणामी बँका बुडण्याचे प्रमाण जास्त होते. सामान्यपणे ब्रिटीश राजवटीच्या काळात *एजन्सी हाऊसेस* अस्तित्वात आली. याच व्यापारी संस्थांनी बँकिंग व्यवहार सुरू केले. *अलेक्झान्डर अँड कंपनी* या संस्थेने *बँक ऑफ हिंदुस्थान* या पहिल्या बँकेची १७७० मध्ये स्थापना केली. पण ही बँक १८३२ मध्ये बुडाली. बँकिंग आणि व्यापार व्यवहार एकत्रितपणे काम करणाऱ्या अनेक संस्था निर्माण झाल्या परंतु १९२९-३२ या मंदीच्या काळात त्यापैकी बऱ्याच संस्था बुडाल्या. सन १८००-१८५८ या कालावधीत ४० पेक्षा जास्त बँका स्थापन झाल्या. पुढे मंदीच्या काळात १२ बँकांनी टिकाव धरला. सन १९३९-१९४५ या दुसऱ्या महायुध्दाच्या कालावधीत युध्दसामुग्रीच्या निर्मितीमुळे बऱ्यापैकी पैसा उपलब्ध झाला. या पार्श्वभूमीवर बऱ्याच नवीन बँका अस्तित्वात आल्या पण त्यांनी आपली कुवत न ओळखता अनेक नवीन शाखा उघडल्या. परिणामी १९४५ नंतर भारतातील बँकिंग व्यवसायातील अडचणीत वाढ झाली. याचा परिणाम ५०० पेक्षा अधिक बँका बुडण्यात झाला.

**ब)स्वातंत्र्योत्तर काळातील बँकिंग व्यवसाय:**

सन १९४७ मध्ये भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बँकिंग क्षेत्रात एक नवे पर्व सुरू झाले. बँकिंग क्षेत्र सक्षम करण्यासाठी १९४९ साली बँकिंग नियमन कायदा पास करण्यात

आला. या कायद्याने मध्यवर्ती बँकेस व्यापारी बँकांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्राप्त झाले. म्हणजेच सन १९४९ या कायद्यान्वये रिझर्व्ह बँकेचे व्यापारी बँकांशी असलेले बँकिंग संबंध निश्चित केले गेले. या कायद्यामुळे ठेविदारांचे संरक्षण करण्याची खास तरतूद करण्यात आली. बँकिंग क्षेत्राला बळकटी आणण्यासाठी रिझर्व्ह बँकेने योग्य ती पावले उचलली-ज्यात लहान बँकांची मोठ्या बँकांत विलिनीकरणाचे धोरण स्वीकारले. परिणामी व्यापारी बँकांची संख्या सन १९५१-१९७१ या काळात ४३० वरून ७१ पर्यंत घटली. सन १९६०-६१ मध्ये बिगर अनुसूचित बँकांची संख्या २५६ होती. आता त्यांचे अस्तित्व जवळपास संपल्यासारखे आहे.

### भारतातील व्यापारी बँका:

भारताच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून व्यापारी बँकांकडे पाहिले जाते. बँकांमुळे शेती, उद्योग, व्यापार, वाहतुक, दळणवळण इ. क्षेत्राच्या भांडवल विषयक गरजा पूर्ण होतात. बँकांमुळे विविध राष्ट्रातील देण्याघेण्याचे व्यवहार पूर्ण होतात. प्रत्ययाची निर्मिती आधुनिक अर्थव्यवस्थेतील व्यापारी बँकांचे एक खास वैशिष्ट्य आहे. व्यापारी बँका त्यांच्या जवळील रोख भांडवलाच्या कितीतरी पटीने जास्तीत जास्त कर्ज देशातील व्यापारी व उद्योगपती यांना उपलब्ध करून देतात.

### स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील व्यापारी बँकांच्या कालखंडनिहाय महत्त्वपूर्ण घटना;

अ) सन १९४७ ते १९६९:

- १ जानेवारी १९४९ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यानंतर ही बँक भारत सरकारची बँक म्हणून कार्य करीत आहे.
- १६ मार्च १९४९ पासून बँकिंग नियमन कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्यामुळे रिझर्व्ह बँकेस व्यापारी बँकांवर/वित्तीय संस्थांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्राप्त झाले. बँकेच्या स्थापनेपासून ते त्या बँकेचा कारभार गुंडाळण्यापर्यंत सर्व अधिकार या कायद्याने रिझर्व्ह बँकेला दिले आहेत.
- १९५०-५१ मध्ये अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठ्याचा अभ्यास करण्याकरिता श्री. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली.
- १ जुलै १९५५ रोजी इंपीरीयल बँकेच्या राष्ट्रीयीकरणाची घोषणा करून तिचे स्टेट बँक ऑफ इंडियात रुपांतर केले.
- लहान व्यापारी बँकांचे मोठ्या आकाराच्या व्यापारी बँकांमध्ये विलिनीकरण करण्यात आले. ज्यामुळे व्यापारी बँकांची संख्या घटली.
- १ जानेवारी १९६२ रोजी भारतात ठेवीदारांच्या ठेवींना संरक्षण देण्यासाठी ठेवी विमा महामंडळाची स्थापना करण्यात आली..
- जून १९६३ मध्ये *कृषि पुनर्वित्त महामंडळ* (Agricultural Refinance Corporation) स्थापन केले. शेतीत सुधारणा घडवून आणण्याकरिता व पुढे १९७५ मध्ये या महामंडळाचे नामकरण *कृषि पुनर्वित्त व विकास महामंडळ* असे करण्यात आले.

- सन १९६६ मध्ये रिझर्व्ह बँक व सरकारने १९३५ पासून को-ऑप. क्रेडिट संस्थांच्या संदर्भात केलेल्या प्रयत्नांच्या परिणामांची पाहणी करण्यासाठी *ऑल इंडिया रूरल क्रेडिट रिव्ह्यू कमिटी* स्थापन करण्यात आली.
- १४ डिसेंबर १९६७ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पुढाकाराने अर्थमंत्री मोरारजीभाई देसाई यांनी बँकांवर सामाजिक नियंत्रण बसविण्याचा क्रांतीकारी निर्णय जाहीर केला. व्यापारी बँकांची मालकी खासगी भागधारकांकडे परंतु राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक पूर्ततेसाठी सरकारचे नियंत्रण.
- फेब्रुवारी १९६९ मध्ये बँकिंग कमिशनची नेमणूक करण्यात आली.
- १९६९ च्या बंगलोर येथील काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनात बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- १९ जुलै १९६९ रोजी भारतातील चौदा प्रमुख मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. ज्या बँकांच्या ठेवी ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त होत्या त्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. सर्व बँकांच्या ठेवीची रक्कम २,७४२ कोटी रुपये होती.

**सन १९४७-६९ या कालावधीतील व्यापारी बँकांचे समीक्षण:**

- खासगी क्षेत्रातील बँका नफा तोटा विचारात घेऊनच शाखा उघडत होत्या त्यामुळे शाखा विस्तार मंद गतीने झाला.
- प्राधान्यक्रम क्षेत्रांना होणाऱ्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण अत्यंत कमी होते.
- भारताची मदार कृषीवर असतानाही कृषि व त्यासंबंधित क्षेत्रांना १९४७-१९६९ या कालाधीत व्यापारी बँकांच्या एकूण व्यवहारात कृषि क्षेत्राचा वाटा जेमतेम २% राहिला.
- व्यापारी बँका मोठ्या प्रमाणात नफा कमावित होत्या. त्यामुळे खासगी उद्योगपतींकडे आर्थिक संपत्तीचे केंद्रीकरण होत होते.
- ग्रामीण भागात कर्ज पुरवठा योग्य प्रकारे व्हावा व ग्रामीण भागातील बचती आकर्षित करणे या कामी व्यापारी बँकांनी गांभीर्याने प्रयत्न केले नाहीत.
- बँका व त्यांच्या शाखा मुख्यत: शहरातच निर्माण झाल्या.
- व्यापारी बँकांची प्रगती प्रादेशिक असमतोलात भरच टाकत होती.
- बँकांच्या कर्ज व्यवहारात वाढ झाल्यामुळे पतचलनाची निर्मिती वाढून भाववाढीला प्रोत्साहन मिळाले.
- सरकारी रोख्यातील गुंतवणुकीपेक्षा अन्य मान्यताप्राप्त रोख्यातील गुंतवणुकीत वाढ झाली.
- ठेवी विमा महामंडळ व आकर्षक ठेव योजनांमुळे बँकांच्या ठेवीच्या प्रमाणात वाढ झाली.
- आर्थिकदृष्ट्या कमकुवत बँकांचे एकत्रीकरण केल्यामुळे सक्षम व्यवस्था उभारण्यास हातभार लागला.

भारतातील अनुसूचित व्यापारी बँकांची

## प्रगती (१९५०-२०१०)

भारतीय रिझर्व्ह बँक कायदा सन १९३४ च्या दुसऱ्या परिशिष्टात ज्या बँकांचा समावेश केला जातो, त्यांना अनुसूचित बँका असे म्हणतात. प्रारंभी अनुसूचित व्यापारी बँकेला भांडवल मर्यादा ५ लाख रुपयांपेक्षा अधिक होती. विद्यमान स्थितीत ही मर्यादा १०० कोटी रुपये करण्यात आली आहे.

तक्ता क्र. १

भारतातील अनुसूचित व्यापारी बँकांची प्रगती (१९५०-२०१०)

| घटक/साधने | कालावधी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | १९५० ते १९५९ | १९६० ते १९६९ | १९७० ते १९७९ | १९८० ते १९८९ | १९९० ते १९९९ | २००० ते २०१० | १९५० ते २०१० |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | ९१ | ७७ | ९४ | २४१ | २८४ | २२७ | १७० |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | २ | ५ | २५ | ४१ | १२ | ६१ | ८९ |
| विचरण गुणक (C.V.) | २.४५ | ६.७६ | २७.३४ | १७.१३ | ४.५४ | २६.७६ | ८२.७२ |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | ०.११ | -१.९९ | ८.२७ | ५.६७ | १.४३ | -७.४२ | २.५६ |
| 'I' मूल्य | ०.१३९ | -०.९३०*** | ०.९१७*** | ०.८९६*** | ०.९४९*** | -०.९३६*** | ०.८०१*** |
| ठेवी: | | | | | | | |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | १५५९ | ३०१६ | १५६३२ | ८७१२० | ४८५११३ | २५४५८४३ | ५४९८४७ |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | ३७७ | ११५ | ८८१७ | ४३३१० | २०१५६१ | १४५४०८४ | ११२८९९७ |
| विचरण गुणक (C.V.) | ३२.५० | ३६.९७ | ५६.४० | ४९.२६ | ४७.०६ | ५७.११६ | २०५.३२ |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | ९.५४ | १२.७५ | २०.६१ | १८.०५ | १७.३६ | ११.३६ | १६.७४ |
| 'I' मूल्य | ०.९२३*** | ०.९९७*** | ०.९९९*** | ०.९९८*** | ०.९९९*** | ०.९९८*** | ०.९९६*** |
| पतपुरवठा: | | | | | | | |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | ७५८ | २३५६ | १११०३ | ५५६८७ | २२९५१४ | १७७५८३५ | ३६९३१७ |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | २२६ | ८९३ | ५७६२ | २४६५७ | १२८१२१ | ११७१३७६ | ८२४६५३ |
| विचरण गुणक (C.V.) | २९.८४ | ३७.९२ | ५१.९० | ४४.२७ | ५५.८२ | ६५.९६२ | २२३.२९ |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | ९.६४ | १३.२२ | १९.११ | १६.१२ | २४.५६ | २४.०० | १६.२२ |
| 'I' मूल्य | ०.९४७*** | ०.९९८*** | ०.९९९*** | ०.९९८*** | ०.६९८*** | ०.९९६*** | ०.९९९*** |

*टीप: ***एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळी दर्शवितात.*

***पाच प्रतिशत अर्थपूर्णता पातळी दर्शवितात.*

**संख्या:** भारतातील अनुसूचित व्यापारी बँकांच्या प्रगतीचा सांख्यिकीय साधनांचा अवलंब करून आढावा घेतला असता दिसून येते की, १९५० ते २०१० या साठ वर्षांच्या कालावधीत सरासरी १७० ने संख्येत वाढ झाली असून, गत साठ वर्षांच्या काळात बँकांच्या संख्येत वार्षिक २.५६% या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ झाली असून ही वाढ एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळीला विशेष असल्याचे दिसून येते. गेल्या साठ वर्षात व्यापारी बँकांची संख्या ९२ वरून १९९८-९९ मध्ये ३०१ तर २०१०-११ मध्ये ही संख्या १६३ अशी कमी होत असल्याचे दिसून येते.

**ठेवी:** सन १९५० ते २०१० या ६० वर्षांच्या काळात एकूण ठेवीत सरासरी वार्षिक ५४९८४७ कोटी रुपयांनी वाढ झाली असून ही वाढ एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळीला विशेष असल्याचे दिसून येते. १९५०-५१ मध्ये ठेवी ९०६ कोटी रुपये होत्या तर २०१०-११ मध्ये ५२०७९६९

कोटी रुपयांवर गेल्याचे पहावयास मिळते. थोडक्यात, एकूण ठेवीत सातत्याने वाढ होताना दिसून येते.

**पतपुरवठा:** भारतातील अनुसूचित व्यापारी बँकांच्या पतपुरवठ्याचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, १९५० ते २०१० या साठ वर्षांच्या काळात पतपुरवठ्यात वार्षिक १६.२२ प्रतिशत या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ झाली असून ती एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळीला विशेष असल्याचे जाणवते. ६० वर्षात सूचित व्यापारी बँकांचा एकूण पतपुरवठा १९५०-५१ मध्ये ५४६ कोटी रुपये होता तो २०१०-११ मध्ये ३९४२२०८३ कोटी रुपयांवर गेला. बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतरचा कालखंड (१९६९-पासून).

भारतात व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यापूर्वी या बँका देशातील अग्रक्रम क्षेत्रांना पतपुरवठा करण्यास उदासिन होत्या. कारण शेतीस तत्कालीन बँका तारण मानत नव्हत्या. याशिवाय लघुउद्योग या महत्त्वपूर्ण क्षेत्रांकडे पूर्णतः दुर्लक्ष केले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात भारतातील व्यापारी बँकांची संख्यात्मक प्रगती झाली. अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती देण्यासाठी बँकांवर १४ डिसेंबर १९६७ मध्ये सामाजिक नियंत्रण आणले. सामाजिक नियंत्रण (Social Control) या उपायाने बँकिंग संचालक मंडळाकडून पूर्ण सहकार्य व निकडीची कार्यवाही होत नव्हती. राष्ट्राच्या पंचवार्षिक योजनेत बँकांचे महत्त्वपूर्ण स्थान लक्षात घेऊन भारत सरकारने बँकिंग कंपनीज (ॲक्विझिशन अँड ट्रान्स्फर ऑफ अंडरटेकिंग्ज) ॲक्ट १९६९ या कायद्यानुसार १९ जुलै १९६९ रोजी देशातील १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राष्ट्रातील ९०% पेक्षा जास्त बँकिंग व्यवसाय या बँकांच्या ताब्यात होता.

- १९ जुलै १९६९ रोजी ज्या बँकांच्या एकूण ठेवी रु.५० कोटीपेक्षा जास्त होत्या अशा १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
- डिसेंबर १९६९ मध्ये बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी अग्रणी बँक योजना सुरू झाली.
- एप्रिल १९७५ मध्ये बँकांमधील ग्राहक सेवेचा दर्जा तपासण्यासाठी श्री तलवार यांच्या नेतृत्वाखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला.
- २ ऑक्टोबर १९७५ रोजी महात्मा गांधी जयंतीच्या शुभ मुहूर्तावर देशातील कमकुवत वर्गाला बँकिंगच्या सुविधा प्राप्त व्हाव्यात म्हणून विभागिय ग्रामीण बँका सुरू करण्यात आल्या.
- श्री. जे. सी. ल्यूथर यांच्या नेतृत्वाखाली बँकांची लाभप्रदता व कार्यक्षमता तपासण्यासाठी कामकाज गट स्थापन करण्यात आला.
- जून १९७७ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा सर्वांगिण अभ्यास करण्यासाठी श्री.जे.एस. राज यांच्या नेतृत्वाखाली रिझर्व्ह बँकेने समिती नेमली.
- १५ एप्रिल १९८० मध्ये व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा दुसरा टप्पा पूर्ण झाला. या दिवशी रु.२०० कोटी पेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
- १२ जुलै १९८२ रोजी 'राष्ट्रीय शेती व ग्रामीण

विकास बँक' (National Bank for Agricultural and Rural Development-NABARD) शेती व खेड्यातील सर्वच व्यवहारांशी निगडित असलेल्या विषयांचा एकत्रितपणे विचार करण्यासाठी.

- १ जाने.१९८२ रोजी भारतीय निर्यात-आयात बँकेची स्थापना करण्यात आली. या बँकेची पूर्ण मालकी सरकारची आहे.
- ९ जुलै १९८८ रोजी 'राष्ट्रीय गृह बँक' (National Housing Bank) स्थापन करण्यात आली. घर बांधणीसाठी खास संस्था प्रस्थापित व्हाव्यात या उद्देशाने ही संस्था आर्थिक सहाय्य करते.
- एप्रिल १९८९ मध्ये देशभरातील सर्व बँकांमध्ये सेवा क्षेत्र दृष्टिकोनाची अंमलबजावणी करण्यात आली.
- जून १९९० मध्ये व्यापारी बँकांचा शाखा विस्तार ६०,००० च्या पुढे.
- १९९१ मध्ये भारतातील बँकांची रचना, संघटना व कार्यपध्दती संबंधी अभ्यास करण्यासाठी नरसिंहम् समितीची नियुक्ती करण्यात आली. या समितीच्या शिफारशींवरून भारतातील व्यापारी बँकात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले.
- ३० एप्रिल १९९२ रोजी प्रतीभूती घोटाळा शोधण्यासाठी आर. जानकीरामन यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमण्यात आली.
- श्री. नरसिंहम् समितीच्या सूचनेप्रमाणे सन १९९३ पासून RBI ने खासगी क्षेत्रात नवीन बँका स्थापण्यास अनुमती दिली.
- सन १९९४ मध्ये खासगी बँकांचा प्रवेश व तद्नंतर राष्ट्रीयीकृत बँकांचा तोटा कमी होण्याकडे कल.
- सन १९९४ मध्ये बँकिंग कंपनी अधिनियम १९९० मध्ये दुरुस्ती सूचविणारे विधेयक लोकसभेने मंजूर केले.
- ऑगस्ट १९९६ मध्ये रिझर्व्ह बँकेने लोकल एरिया बँक स्थापनेची घोषणा केली. या बँकांना त्यांचा शाखा विस्तार सलगच्या तीन जिल्ह्यात करता येईल. शेती व शेतीपूरक व्यवहार, लघु उद्योग व व्यापारासाठी त्या कर्ज देऊ शकतील. क्षेत्रीय ग्रामीण बँकांप्रमाणेच यांचे व्याजदर निश्चित होतील.
- सन १९९८ मध्ये भारत सरकारने बँकिंग क्षेत्रातील सुधारणांचा आढावा घेण्यासाठी पुन्हा श्री.नरसिंहम् यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती नियुक्त करण्यात आली. मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणांचा पुन्हा पाठपुरावा करून जागतिक स्तरावरील बँक व्यवहारातील संकेत आपल्या बँकांनी अंमलात आणावेत अशी सूचना केली.

**बँकांचे राष्ट्रीयीकरण - सन १९६९ पासूनची स्थिती समीक्षण:**

- खासगी क्षेत्रातील व्यापारी बँकांच्या नफ्यात काही वर्षी घट झालेली दिसते.
- अग्रक्रम क्षेत्राच्या उन्नतीसाठी बँकांना एकूण कर्जाच्या ४०% कर्ज द्यावी लागली. त्याचा परिणाम बँकांच्या कर्ज वसुलीवर झाल्याचे दिसते.
- बँकांच्या ठेवी मोठ्या प्रमाणात वाढल्या असल्याचे प्रथम दर्शनी दिसत असले तरी त्यांच्या स्वनिधीच्या प्रमाणात म्हणावी तशी वाढ दिसत नाही. त्याचप्रमाणे एकूण खेळत्या भांडवलाशी प्रमाण २.५ ते ३ टक्के दिसते.

- राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांचा ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा मध्यंतरीच्या काळात निम्न प्रतीचा होता.
- राष्ट्रीयीकरणानंतर बँकेतील कर्मचाऱ्यांच्या संघटना अधिक सक्रिय झालेल्या आहेत परिणामी राष्ट्रीयीकृत बँकांच्या अस्तित्वास साह्य झाले.
- बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर दैनंदिन कारभारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष राजकारणाचा हस्तक्षेप होत आहे.
- जागतिक स्तरावर अनेक बड्या बँकांशी स्पर्धा करावयाची असल्याने बँकांनी स्वत:च्या आकारमानाचे भान ठेवणे आवश्यक आहे.
- राष्ट्रीयीकरणापूर्वी व्यापारी बँकांचे नफा कमविणे हे उद्दिष्ट होते आता त्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा दृष्टिकोन ठेवला आहे.
- आर्थिक विकासासाठीच्या योजनांसाठी राष्ट्रीयीकृत बँका वित्तपुरवठा करतील अशी अपेक्षा होती परंतु प्रत्यक्षात या बँकांनी शासकीय रोखे खरेदीत सहभाग घेतला नाही.
- पतपुरवठा विस्तार अति किंवा नको तेवढा करण्यात आला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा पत विस्तार अद्यापही बेपर्वाईने होत आहे.
- पत-त्रूटी (Credit Gap) भरून काढण्यात राष्ट्रीयीकृत बँका अपयशी ठरलेल्या आहेत. सुरळितपणे होणारी पतप्रवाहाची पध्दती निर्माण करण्यात बँकांना यश आलेले नाही.

**संख्या:**

भारतात १९७९ मध्ये राष्ट्रीयीकृत बँकांची

तक्ता क्र. २

राष्ट्रीयीकृत बँकांची प्रगती (१९७९-२०११)

| घटक/साधने | कालावधी | | | |
|---|---|---|---|---|
| भांडवल: | १९७१ ते १९८९ | १९९० ते १९९९ | २००० ते २०१० | १९७९ ते २०११ |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | ४२२ | ९१०४ | १३२६२ | ७९५० |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | ४६९ | ५२८६ | १८११ | ६२४३ |
| विचरण गुणक (C.V.) | १११.१० | ५८.०५ | १३.७१ | ७८.५३ |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | ४६.८७ | २६.४२ | ०.१०४ | २०.४४ |
| 'I' मूल्य | ०.९४७*** | ०.९२०*** | ०.०२९*** | ०.८८९*** |
| राखीव निधी: | | | | |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | ३८७ | ६६७३ | ७२५२१ | २९४०९ |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | २८६ | ५०४९ | ५५३५० | ४७४६० |
| विचरण गुणक (C.V.) | ७३.९७ | ७५.६७ | ७६.३२ | १६१.४१ |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | २७.७७ | ३४.३३ | २५.५३ | २७.१२ |
| 'I' मूल्य | ०.९९७*** | ०.९९४*** | ०.९९९*** | ०.९९७*** |
| ठेवी: | | | | |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | ५५०९० | २३१४२३ | १३३३०५९ | ५९११३२ |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | २८१६२ | .९५६६९ | ८६८०५४ | ७८४८१६ |
| विचरण गुणक (C.V.) | ५१.१२ | ३९ | ६५.११ | १३२.५८ |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | ११.३१ | १३.८० | १८.८४ | १६.२१ |
| 'I' मूल्य | ०.९९७*** | ०.९९८*** | ०.९९३*** | ०.९९८*** |

### तक्ता क्र. २ क्रमशः

### राष्ट्रीयीकृत बँकांची प्रगती (१९७९-२०११)

| घटक/साधने | कालावधी | | | |
|---|---|---|---|---|
| कर्ज उभारणी: | १९७९ ते १९८९ | १९९० ते १९९९ | २००० ते २०१० | १९७९ ते २०११ |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | ३०२५ | ८७९१ | ८०५६५ | ३३९०४ |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | १८८२ | ३२६७ | ८१३१८ | ६०८६३ |
| विचरण गुणक (C.V.) | ६२.२२ | ३७.१६ | १००.९३ | १७९.५१ |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | २४.१३ | -४.४४ | ४१.५६ | १५.४१ |
| 'I' मूल्य | ०.९८३*** | ०.३६८*** | ०.९६१*** | ०.९०६*** |
| थकबाकी: | | | | |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | - | ३००७२ | १००८३४ | ६८६६९ |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | - | ९७०९ | ६४९८३ | ५९६०६ |
| विचरण गुणक (C.V.) | - | ३२.२८ | ६४.४४ | ८६.८० |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | - | १०.९९ | १७.९४ | ११.५७ |
| 'I' मूल्य | - | ०.९५४*** | ०.९६७*** | ०.९६१*** |
| अग्रिमे: | | | | |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | ३२०८५ | ११६६०७ | ८९२९७६ | ३८१३३३ |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | १५२४६ | ३७५२० | ६८९५३९ | ५७६६०७ |
| विचरण गुणक (C.V.) | ४२.५२ | ३२.१७ | ७७.२१ | १५१.२० |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | १७.९५ | १०.५२ | २४.६४ | १६.५६ |
| 'I' मूल्य | ०.९९४*** | ०.९८२*** | ०.९९६*** | ०.९९१*** |
| पत पुरवठा : | | | | |
| समांतर माध्य(Mean)कोटी रु. | २६२८७ | १११९५७ | ७७०७११ | ३३२२१ |
| प्रमाप विचलन (Std.Dev.) | १३३६९ | ४१३२० | ६०२०८१ | ४९९४५० |
| विचरण गुणक (C.V.) | ५०.८५ | ३६.९२ | ७८.११ | १५०.३३ |
| संयुक्त अभिवृध्दी दर (CGR) | १८.३९ | १२.८२ | २२.०२ | १६.७५ |
| 'I' मूल्य | ०.९९६*** | ०.९९६*** | ०.९००*** | ०.९८७*** |

*टीप:* ****एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळी दर्शवितात.*

***पाच प्रतिशत अर्थपूर्णता पातळी दर्शवितात.*

**तक्ता क्र. २ मध्ये भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांची सविस्तर स्थिती दर्शविली आहे.**

संख्या १४ होती. १९८० ते १९९३ या काळात ती २० इतकी स्थिर राहिली. ती १९९४ मध्ये कमी होऊन १९ झाली सद्यस्थितीत ती २० आहे.

**भांडवल:**

भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या वसूल भांडवलात १९८० ते १९९३ या काळात सरासरी वार्षिक ७९५० कोटी रु. ने वाढ झालेली दिसून येते. या ३२ वर्षांच्या काळात वार्षिक २०.४४ प्रतिशत या संयुक्त अभिवृध्दी दराने भांडवलात धनात्मक वाढ झाली असून ती एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळीला महत्तम असल्याचे जाणवते. थोडक्यात, राष्ट्रीयीकृत बँकेच्या वसूल भांडवलात गत ३२ वर्षांच्या काळात अनेक उच्चावचने दिसून येतात.

**राखीव निधी:**

भारतातील राष्ट्रीयीकृत बँकेच्या राखीव

निधीत १९७९ ते २०११ या काळात सरासरी वार्षिक २९४०१ कोटी रु.नी वाढ झाली असून या ३२ वर्षांच्या राखीव निधीत वार्षिक २७.९२ प्रतिशत या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ नोंदवली असून ही वाढ एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळीला महत्तम असल्याचे जाणवते. थोडक्यात, मागील ३२ वर्षांच्या कालावधीत राखीव निधीत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते.

### ठेवी:

भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या ठेवीत १९७९ ते २०११ या काळात वार्षिक ५९१९३२ कोटी रु.नी वाढ झालेली दिसून येते. या काळात वार्षिक १६.२१ प्रतिशत या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ झालेली असून ती एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळीला विशेष असल्याचे जाणवते. थोडक्यात गत ३२ वर्षांच्या काळात ठेवी सन १९७९ मध्ये १९९११ कोटी रु. होत्या त्या २०११ मध्ये ३१२७१२२ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते.

### कर्ज उभारणी:

भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या कर्ज उभारणीत १९७९ ते २०११ या ३२ वर्षांच्या काळात कर्ज उभारणीत १५.४१ प्रतिशत या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ झाली असून ही वाढ एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळीला महत्तम असल्याचे दिसून येते. थोडक्यात, कर्ज उभारणीत सातत्याने वाढ होताना जाणवते.

### थकबाकी:

भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या थकबाकीत १९९० ते २०१० या २१ वर्षांच्या काळात वार्षिक ६८६६९ कोटी रु.नी वाढ होत असून या ३२ वर्षांच्या काळात कर्ज उभारणीत १५.४१ प्रतिशत या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ झाली असून ही वाढ एक प्रतिशत अर्थपूर्णता पातळीला महत्त्वपूर्ण असल्याचे जाणवते. १९९० मध्ये राष्ट्रीयीकृत बँकांची एकूण थकबाकी १८९०० कोटी रुपये होती ती २०११ मध्ये २३३१४५ कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली. यावरून थकबाकीत सतत वाढ होत असल्याचे दिसून येते.

### अग्रिमे:

भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या अग्रिम राशीत १९७९ ते २०११ या काळात वार्षिक ३८१३३३ कोटी रु.नी वाढ झालेली असून या काळात वार्षिक १६.५६ प्रतिशत या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ होताना दिसते जी अर्थपूर्णतेच्या एक प्रतिशत पातळीला महत्त्वपूर्ण असल्याचे जाणवते. थोडक्यात, अग्रिम राशीत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते.

### पतपुरवठा:

भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या पतपुरवठ्यात १९७९ ते २०११ या ३२ वर्षांच्या काळात वार्षिक ३३२२२१ कोटी रु.नी वाढ झालेली असून त्यात वार्षिक १६.७५ प्रतिशत या संयुक्त अभिवृध्दी दराने धनात्मक वाढ होत असल्याचे दिसून येते. जी एक प्रतिशत पातळीला महत्त्वपूर्ण आहे. थोडक्यात, राष्ट्रीयीकृत बँकांच्या पतपुरवठ्यात १९७९ ते २०११ या ३२ वर्षांच्या काळात अनुक्रमे १०५१३.८५ कोटी रुपयांवरून

२१५९८०२.६८ कोटी रुपये अशी विक्रमी वाढ झालेली आहे.

### लोकसंख्या गटानुसार अनुसूचित व्यापारी बँकांच्या शाखा (१९६९-२०११):

सन १९४७ ते १९६९ या कालावधीतील भारतातील बँकांचा शाखा विस्तार मंद होता. ग्रामीण व निमशहरी भागात बँकांचा शाखा विस्तार झाल्यास बचत व गुंतवणुकीस प्रोत्साहन मिळेल हे सर्वसामान्यांना सुध्दा वाटत होते. यासाठी खासगी उद्योगपतींच्या अथवा बड्या प्रस्थापितांच्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. परिणामी ग्रामीण व निमशहरी भागात बँकांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली. ग्रामीण भागातील बचती गोळा करण्यात बँकांनाही बऱ्यापैकी यश आले.

ग्रामीण भागातील शाखांचे प्रमाण १९६९ ते १९९२ या काळात २२ टक्क्यांवरून ५१ टक्क्यांपर्यंत वाढत गेले. सामान्यपणे १९६९ मध्ये दर ६५,००० लोकसंख्येला एक बँक कार्यालय तर १९९२ या वर्षी दर १५००० पेक्षा कमी लोकसंख्येला एक बँक कार्यालय आढळते. भारतात व्यापारी बँकांच्या एकूण शाखांपैकी सन १९९८ मध्ये ५१% शाखा ग्रामीण भागात दिसून येतात.

सन १९६९ नंतर राष्ट्रीयीकृत व अन्य बँकांनी शाखा विस्ताराचा वेग वाढविला. विशेषत: ग्रामीण, निमशहरी व बँकिंगच्या सोयी नसलेल्या प्रदेशात शाखा उघडण्यास अग्रक्रम देण्यात आला.

राष्ट्रीयीकरणानंतर शाखा विस्ताराच्या दृष्टीने ओरिसा, आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड, राजस्थान, त्रिपुरा, उ.प्रदेश, प.बंगाल या राज्यात शाखा विस्तारात चांगलीच वाढ झाली. शाखा विस्ताराच्या कामी अग्रणी बँक योजनेने प्रशंसनीय काम केले आहे. जगातील कोणत्याही राष्ट्रात या वेगाने शाखा विस्तार झालेला दिसत नाही.

### भारतातील बँकिंग क्षेत्रातील १९८० ते १९९० नंतरचे बदल:

भारतीय बँकिंग - एक दृष्टिक्षेप या विषयाचा आवाका खूप मोठा आहे. त्या अनुषंगाने काही महत्त्वपूर्ण बाबींचा विषयावर प्रकाश टाकण्यासाठी विचार करण्यात आला आहे.

भारतीय बँक प्रणालीचा प्रवास विविध अवस्थातून झाला आहे. सन १९६९ पूर्वी म्हणजे राष्ट्रीयीकरणापूर्वी बँका केवळ नफा मिळविण्याच्या हेतूने प्रेरित होत्या. राष्ट्रीयीकरणानंतर सामाजिक दायित्वाच्या भूमिकेतून कार्य करण्याची जबाबदारी बँकांवर आली. परिणामस्वरूप बँकिंग शाखा व्यवसायाचा झपाट्याने विकास झाला. पण गुणात्मकतेचा बँकांना विसर पडला. स्वातंत्र्यानंतर विशेषत: विकासाच्या अवस्थेत मोठ्या प्रमाणावरील औद्योगिकीकरणासाठी भांडवल पुरवठा करताना बँका नफ्याच्या अभिलाषेने अमर्याद स्वरुपात पतनिर्मिती करू लागल्या त्यातून चलनवाढीसारख्या समस्यांनी अर्थव्यवस्था हादरावयास सुरुवात झाली. परिणामस्वरूप रिझर्व्ह बँकेला ती जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी बँकांसंबंधीच्या कायद्याची आवश्यकता भासली.

साधारणत: बँकांवरील सामाजिक नियंत्रणाची संकल्पना विसाव्या शतकात उदयास

आली. कल्याणकारी राज्याची संकल्पना अस्तित्वात आणण्यासाठी जनतेचे कल्याण साधण्याची जबाबदारी शासनावर आली. राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत शासन देशाच्या पंचवार्षिक योजनांना अनुरूप उपाय योजना करू लागले. असा प्रवास बँकांचा सुरू असताना ग्रामीण व शहरी भागातील अनेक बँका आजारी पडू लागल्या. त्यांच्या तोट्यात सातत्य वाढले. एकूणच भारतीय बँक व्यवसायाची घसरण होत आहे. हे पाहून रिझर्व्ह बँकेने पुढील पाऊल उचलले.

### प्रा.सुखमय चक्रवर्ती समिती(१९८२):

मुद्राविषयक धोरणाच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी व भारतीय बँकिंगच्या विविध समस्यांचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली.

समितीच्या मते तत्कालीन बचतीचा दर २३ असला तरी सरकारी क्षेत्राच्या गुंतवणूकीसाठी अपुरा आहे. त्याचप्रमाणे उत्पादनाच्या अपेक्षित वाढीच्या दरानुसार पतसंस्थेतील उद्दिष्टे गाठण्यासाठी अपेक्षित दरवाढ असावी. प्रा.चक्रवर्ती समितीची मौद्रिक उद्दिष्टांची शिफारस अमलात आली. समितीने असेही सूचविले होते की, सरकारी कर्जरोख्यात व्याजदर कमी आहे तो लोकांना, बँकांना, बँकेवर कंपन्यांना आकर्षित करू शकत नाही. त्यानुसार समितीने अशी शिफारस केली की, शासनाच्या कर्जरोख्यांवरील उत्पन्न हे अधिक असावे राजकोषीय विपत्राच्या वटवळीचा दर (Discount Rate) वाढवावा. याशिवाय बँकिंगच्या विविध समस्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रा.चक्रवर्ती समितीने सूचविलेल्या अन्य शिफारशींकडे दुर्लक्ष केल्यामुळे भारतीय बँकिंग व्यवस्थेची परिस्थिती आणखी घसरत गेली व भारतीय बँकांच्या समस्येत वाढ होत गेली.

### सन १९९० नंतरचे बदल:

सन १९९१ मध्ये डावे व उजवे यांच्यात बरेच दिवस खलबल झाली. परंतु जागतिक रेट्यामुळे भारतात आर्थिक सुधारणांना सुरुवात झाली. आर्थिक सुधारणांना प्रारंभ झाल्यानंतर जागतिक पातळीवरील स्पर्धा सांभाळत असताना बँकिंग क्षेत्रात घोटाळ्यांच्या मालिकांनी देशातील बँकिंग व्यवस्थेला घेरले. (उदा.हर्षद मेहता, केतन पारेख) ज्यामुळे अनेक राष्ट्रीयीकृत बँकांची स्थिती दोलायमान झाली. सहकारी बँकांनी सहकार शब्दाच्या मूळ अर्थाला तिलांजली दिली. तसेच सरकारी मालकी, कर्मचार संघटनांचा वाढता प्रभाव, संगणक तंत्रज्ञान स्वीकृत करण्यास कर्मचाऱ्यांचा विरोध, शिवाय भारताला कर्जपुरवठा करणाऱ्या जागतिक बँकेनेही असे सुनविले की, भारतीय बँकांनी आंतरराष्ट्रीय मानदंडाचे पालन करावे. या सर्व परिस्थितीचा अभ्यास करून बँकिंग विभागाने एका समितीची नियुक्ती केली.

### श्री. एम. नरसिंहम् समिती-I (१९९२):

समितीने आपल्या अहवालात आर्थिक क्षेत्रातील सुधारणांचा आग्रह धरला. रिझर्व्ह बँकेकडून राष्ट्रीयीकृत बँकांच्या व्यवहाराबाबत सातत्याने आदेश देण्यात येत होते. बँकांकडील अर्धी रक्कम 'कॅश रिझर्व्ह आणि लिक्विड असेटचे प्रमाण' या अंतर्गत नियम करून काढून घेतली जात होती. सरकारी अर्थव्यवस्थेतील तूट भरून काढण्यासाठी ही रक्कम वापरली जात होती. यातून समितीने असे सूचित केले की, रिझर्व्ह बँकेने राष्ट्रीयीकृत बँकांना खुल्या अर्थव्यवस्थेत काम

करून दिले पाहिजे. ठेवी व कर्ज यांच्या व्याजाचे दर बँकांनी स्वत:च्या अधिकारात घेतले पाहिजे व मार्गदर्शनात्मक आदेशाचे प्रमाण कमी व्हावे, यानुसार सुरुवातीस बँकांना तोटा सहन करूनही बुडित कर्जासाठी मोठ्या प्रमाणावर तरतुदी कराव्या लागल्या. नंतर नरसिंहम समितीच्या सूचनेप्रमाणे खासगी बँकांचा प्रवेश व ज्यामुळे चांगली ग्राहक सेवा देण्यास सुरुवात झाली.

### श्री. एम. नरसिंहम् समिती-II (१९९८):

पहिल्या नरसिंहम समितीने सूचविलेल्या शिफारशींची कितपत अंमलबजावणी झाली व आर्थिक क्षेत्रातील सुधारणांचा आढावा घेण्यासाठी पुन्हा श्री.नरसिंहम समिती गठित करण्यात आली. समितीने स्पष्टपणे सांगितले की, खुल्या धोरणाचा पाठपुरावा करून जागतिक स्तरावरील बँक व्यवहारातील नियम आपल्या बँकांनी काटेकोरपणे अमलात आणावे. ज्यात समितीने असा आग्रह धरला की, बँकांनी अनुत्पादक मत्तेचे प्रमाण शून्यावर आणण्याचा कसोशीने प्रयत्न करावा. शासनाने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील भागीदारी कमी करावी, अतिरिक्त कर्मचाऱ्यांचा बोजा कमी करण्यासाठी सेवानिवृत्ती योजना सुरू करावी. ज्या बँकांचे विलिनीकरण शक्य नाही त्या बंद कराव्यात व सार्वजनिक क्षेत्रातील बँका सक्षम बनविण्यासाठी काही बँकांचे विलिनीकरण करावे.

भारतीय बँकिंग व्यवस्थेत निर्माण झालेले दोष कमी करण्यासाठी, बँकांची कार्यक्षमता उंचावण्यासाठी काही शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली. पण बँकिंग क्षेत्रात मिळणारा अफाट नफा खासगी कंपन्यांना आकर्षिक करीत आहे. राष्ट्रीयाकृत बँकांच्या स्पर्धेत विदेशी व खासगी कंपन्या स्पर्धक आहेत. या स्पर्धेत टिकण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांनी सजग (Update) राहणे आवश्यक आहे.

### खासगी क्षेत्रातील नवीन बँका:

जेव्हा भारतास स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतीय बँक पध्दती खासगी क्षेत्रात प्रगतीच्या दिशेने जात होती. परंतु शासनाच्या राष्ट्रीयीकरणाच्या धोरणामुळे खासगी बँकिंग व्यवसाय संकुचित होत गेला. ज्या बँकांच्या ठेवी १९६९ मध्ये ५० कोटी रु. पेक्षा कमी होत्या त्या खासगी बँका भारतीय नाणेबाजारात टिकून राहिल्या आहेत.

आर्थिक सुधारणांचा प्रारंभ १९९१ मध्ये झाला. त्यानुसार वित्तीय क्षेत्रातील सुधारणांना अग्रक्रम देण्यात आला. श्री.नरसिंहम समितीच्या शिफारशी प्रामुख्याने वित्तीय क्षेत्रातील सुधारणांशी निगडित होत्या. त्यानुसार सन १९९३ पासून श्री.नरसिंहम समितीच्या शिफारशींनुसार रिझर्व्ह बँकेने खासगी क्षेत्रात नवीन बँका सुरू करण्यास अनुमती दिली. या बँका अनुसूचित बँका असून यांना रिझर्व्ह बँक ॲक्ट व बँकिंग नियमन कायदा लागू आहे. या बँकांनासुध्दा प्राधान्यक्रम क्षेत्रात अन्य बँकांप्रमाणे कर्ज द्यावे लागते. या नवीन खासगी बँकांना जुन्या कमी कार्यक्षम बँकांचे व्यवसाय मिळत आहेत. सार्वजनिक बँकांचा कालावधी विचारात घेता नवीन खासगी बँका सार्वजनिक बँकांचे ग्राहक खेचून आणण्यात यशस्वी ठरत आहेत. सध्याच्या स्थितीत नवीन खासगी बँकांत आयसीआयसीआय बँक आघाडीवर आहे. त्या

नंतर यूटीआय बँकेचा क्रम लागतो. भांडवल पर्याप्तता निकष बँकांसाठी अतिशय आवश्यक आहे. त्यानुसार हे प्रमाण एकूण ठेवीच्या १५% असावे त्या दृष्टीने या बँकांची स्थिती निश्चितपणे समाधानकारक आहे.

वर्तमान स्थितीत सार्वजनिक बँका या नवीन खासगी बँकांच्या स्पर्धात्मक स्थितीत कमी पडत आहेत. आपल्या कार्यपध्दतीत आमूलाग्र बदल करीत आहेत. तात्पर्य, २० पेक्षा अधिक देशातील खासगी बँका भारतात आल्या असून भारतातील १४ पेक्षा अधिक राज्यात शाखा विस्तार केला आहे. फक्त त्यांच्या कार्यपध्दतीत एकच दोष दिसतो तो म्हणजे सर्वसामान्य जनतेशी व्यवहार न करता उच्चभ्रू लोकांशी व महानगरांशी निगडित आहेत. नवनवीन कल्पना व सेवा या बाबतीत या बँका अग्रस्थानी आहेत.

## आव्हान बॅसल-३:

बँकिंग क्षेत्राच्या विकासासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे आंतरराष्ट्रीय पातळीवर बॅसल येथे ठरविण्यात आली होती. बॅसल समिती जागतिक बँकिंगमध्ये सतत सुधारणा करणारी योजना आहे. आणि त्यात वेळोवेळी गरजेनुसार बदल केले जात आहेत.

जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतीय बँकिंग प्रणाली आंतरराष्ट्रीय तत्त्वाशी जोडली जाणे आवश्यक असल्याने, रिझर्व्ह बँकेने बँकांच्या संपत्तीशी भांडवलाचे आवश्यक असलेले प्रमाण असंपादणीय कर्ज ठरविणे, या कर्जावरील व्याज उत्पन्नात घेण्यासंबंधी निकष निश्चित करणे व बँकांच्या आर्थिक स्थितीचा विचार करून वेळोवेळी बदल केले.

सन १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानंतर भारतीय बँकिंग जागतिक बँकिंगशी जोडले जाऊन बॅसल मानके लागू करावीत असा रेटा सुरू झाला. या आधी बॅसल-१ व बॅसल-२ या राबविण्यात आल्या आहेत. बॅसल-३ सुधारणेचा पहिला अहवाल २००९ मध्ये जाहीर करण्यात आला. बॅसल-३ मध्ये जोखीम व रोखता व्यवस्थापन यावर भर देण्यात येणार आहे. १ एप्रिल २०१३ पासून बँकांना ही प्रणाली लागू होणार आहे. बॅसल-३ चा मुख्य गाभा असा आहे की, राष्ट्रीयीकृत बँकांना पूर्वीपेक्षा भांडवलात वाढ करावी लागणार आहे. एका बाजूस जोखीम भारांक वाढेल तर दुसऱ्या बाजूला समभाग वाढल्यामुळे गुंतवणुकीचा परतावा कमी होईल. भांडवल व गंगाजळी यांचे प्रमाण ८% पेक्षा कमी होता कामा नये.

भारतात एकूण भांडवल रचनेत राष्ट्रीयीकृत बँकांचे श्रेणी-१ च्या भांडवलाचे प्रमाण ९.३ % आहे. तर १९९३ मध्ये स्थापन झालेल्या नवीन खासगी बँकांचे प्रमाण ११.९% आहे तर १४ राष्ट्रीयीकृत बँकांचे हे प्रमाण ९.५% पेक्षा कमी दिसते.

भारतातील विदेशी बँकांचा विचार केला तर दोन विदेशी बँका जागतिक पातळीवर सक्षम आहेत. सन २०१२ च्या स्थितीचा आढावा घेतला असता, बँक ऑफ अमेरिका व सिटी बँक यांचा मालमत्तेवरील परतावा १.९१% व १.६३% असा आहे. राष्ट्रीयीकृत बँकांत आंध्र बँक १.५९%, पंजाब नॅशनल १.२०% अलाहाबाद बँक १.१२%, स्टेट बँक ०.९४% आहे. नव्या खासगी बँकांत एचडीएफसी १.२९% व आयसीआयसीआय बँक१.२९% या एक

टक्क्यापेक्षा जास्त परतावा कमवितात.

थोडक्यात जगातील सर्वच वित्तीय संस्थांना बॅसल-३ चे आव्हान आहे. बँकांना भांडवली पाया मजबूत करतानाच आपल्या मालमत्तेची द्रव्यता राखणे आवश्यक राहील. राष्ट्रीयीकृत बँकांचीसंख्या हळू हळू कमी करण्यात येईल. लहान लहान व कमी कार्यक्षम बँकांच्या विलिनीकरणाचा प्रयोग होईल. आपल्या बँका विदेशात जातील व विदेशातील बँका नव्या दमाने भारतात बँकिंग व्यवसाय थाटतील. एकंदरीत भारतीय बँकांसाठी हे एक आव्हानच आहे.

## बँकिंग क्षेत्र - नवीन आव्हाने:

अलिकडील काळात बँक व्यवसायाचा विस्तार जागतिक स्तरावर होत असून जागतिकीकरणामुळे व खासगीकरणामुळे बँकिंग व्यवसायात वाढ झाली आहे. जनतेला बँकिंग व्यवसायाची सवय निर्माण झाल्यामुळे बँकेमार्फत व्यवहार करणाऱ्या लोकांचे प्रमाणही वाढले आहे.

आता बँकिंग खूपच वेगवान झाले आहे. एकविसाव्या शतकात वेगाने धावणाऱ्या जगाशी बँकेने हात मिळवणी केली आहे. बदलत्या काळाची पावले बँकांनीही ओळखली आहेत. आपल्या सभोवतालच्या जगाची गती पकडून काळाबरोबर राहण्यासाठी निरनिराळे प्रयत्न केले आहेत. या गत चार ते पाच वर्षात बँकिंगने कात टाकली आहे. त्यामुळे आपण सर्वांनी अतिआधुनिक बँकिंग बरोबर अद्ययावत राहणे काळाची गरज आहे.

१. विद्यमान स्थितीत बँकांजवळील ठेवींच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. गेल्या सहा दशकातील भारतातील व्यापारी बँकांजवळील ठेवींच्या वाढीकडे पाहिल्यास ही वाढ भरघोस दिसत असली तरी शाखांच्या वाढीचा विचार करता ही वाढ अल्प वाटते. कारण ठेवींमध्ये फक्त १६ ते १७ % एवढीच वाढ झाली आहे. दोन वर्षांपूर्वीच्या दरम्यान बँकांना नवीन ठेवी सहज मिळू शकत, सध्या बँकांकडे नवीन ठेवी गोळा होण्याचा वाढीचा दर घसरत आहे. सन २०१०-११ मध्ये १६% होता तो गेल्या २०११-१२ या आर्थिक वर्षात व्याज दर वाढीचा कल दिसत असताना फक्त १३% झाला आहे. बँकांचे ठेवीचे प्रमाण घटत आहे म्हणूनच *सीडी रेशिओ* कर्जाचे ठेवीशी असलेले प्रमाण ०.७८ झाले आहे.

सन २०११-१२ या गत वर्षात बँकांनी रिझर्व्ह बँकेला पाठवावयाच्या माहितीत २३ मार्चच्या स्थितीत कर्ज १७% वाढले तर ठेवी १३% नी वाढल्या.म्हणून बँकांना रिझर्व्ह बँकेवर अवलंबून रहावे लागले. तर ३० मार्च या शेवटच्या सप्ताहात बँकांतील ठेवीचे प्रमाण वर्षभरातील वाढीच्या २३% आहे. ही वाढ एका आठवड्यात कशी शक्य आहे. याचाच अर्थ बँकांनी आपले ताळेबंद सुधारण्यासाठी जास्त दराने बाजारातून ठेवी उचलल्या. शेवटी रिझर्व्ह बँकींग उद्योगाची सर्वोच्च शिखर संस्था म्हणून असे करण्यापासून बँकांना आवर घालायला हवा होता.

२. थकित कर्ज ही भारतीय बँकांपुढे मोठी समस्या ठरली आहे. बँकांनी थकित

कर्जाच्या वसुलीसाठी आपले प्रयत्न आणखी वेगवान करावेत व त्यासाठी वसुली तंत्रातही सुधारणा करावी, असे सरकारने बँकांना एप्रिल २०१२ रोजी कळविले. बँकांची थकित कर्जाची रक्कम२००८-०९ मध्ये ६८,२२० कोटी रु. होती. २००९-१० मध्ये ८१,८१३ कोटी रु., २०१०-११ मध्ये ९४,०८४ कोटी रु. तर २०११-१२ मध्ये हे प्रमाण ९७,२२२ कोटी रु. इतके होते. म्हणजेच गत वर्षात २०११-१२ मध्ये देशातील बँकांचे एकत्रित थकित कर्जाचे प्रमाण २५.५ टक्क्यावर पोहोचले आहे. एकीकडे विदेशात काळ्या पैशाची गुंतवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याची भाषा केंद्र सरकार करीत असले तरी खुद्द देशातच लोकांचा घामाचा पैसा बुडविणाऱ्यांवर मात्र कुठलीही कारवाई केली जात नाही. गेल्या तीन वर्षांपासून एकही पैसा न भरणाऱ्या एकट्या भारतीय स्टेट बँकेच्या बुडीत कर्जाची रक्कम १९ हजार ८९१ कोटी रु. आहे. असे आरटीआय कार्यकर्ते संजय थूल यांनी भारतीय स्टेट बँकेस माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती सर्वांना चक्रावून सोडणारी आहे.

३. सद्यस्थितीत राष्ट्रात बचतीचे प्रमाण कमी होत आहे, यास कारण असे की, बचत व गुंतवणूकीवर मिळणारा परतावा ७ ते ९% इतका आहे. या तुलनेत भाववाढीचा दर दोन आकड्यात आहे. परिणामी बचतीवर मिळणारे उत्पन्न कमी आहे. सन २०१०-११ मध्ये बचतीचा दर २५.८% असताना तो सध्या २२.५% इतका आहे. खरे पाहता ही बचत बँकांच्या ठेवीमध्ये असते त्यामुळे व्याज दर कपातीचा त्यावर परिणाम होतो. रिझर्व्ह बँकेला असे वाटते की, व्याज दर कपातीने भाववाढीवर परिणाम होणार नाही. तात्पर्य रिझर्व्ह बँक स्वत: एकटी काहीच करू शकत नाही. त्याकरिता शासकीय निर्णय पूरक असणे आवश्यक आहे. मरगळलेल्या अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन शक्य करण्यासाठी माजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी असे नमूद केले होते की, भारतीय अर्थव्यवस्थेची स्वत:ची अशी काही वैशिष्ट्ये आहेत, म्हणून सिंगापूर, चीन व हाँगकाँग या निर्यातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थांशी तुलना करू नये. याउलट देशांतर्गत मागणी व देशांतर्गत बचतीवर भर दिला जावा. थेट विदेशी गुंतवणूक हेच सर्व समस्यांवर उपाय असे चित्र उभे केले जात आहे ते अचूक नाही.

४. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी कृषिप्रधान असणारा देश सेवाप्रधान राष्ट्र बनले आहे. सन १९५०-५१ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील कृषिक्षेत्राचा हिस्सा ५३.१%, १९६०-६१ मध्ये २९.६%, २०००-०१ मध्ये २२.३%, २०१०-११ मध्ये १४.५%, २०११-१२ मध्ये १३.९% इतका कमी होता. सन १९५०-५१ मध्ये उद्योग क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा १६.६%. १९६०-६१ मध्ये २०.५%, १९७०-७१ मध्ये २४.०%, १९८०-८१ मध्ये २५.९%, १९९०-९१ मध्ये २७.७%, २०००-०१ मध्ये २७.३%,

२०१०-११ मध्ये २७.८%, २०११-१२ मध्ये २७.०% इतका होता. सन १९५०-५१ मध्ये सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ३०.३%, १९६०-६१ मध्ये ३०.८%, १९७०-७१ मध्ये ३३.८%, १९८०-८१ मध्ये ३८%, १९९०-९१ मध्ये ४२.७%, २०००-०१ मध्ये ५०.४%, २०१०-११ मध्ये ५७.७%, २०११-१२ मध्ये ५९.०% अशी उत्तरोत्तर वाढ झाली आहे.

वरील तिन्ही क्षेत्रांच्या सांख्यिकीय आकडेवारीवरून असे लक्षात येते की, कृषि क्षेत्राची सातत्याने घसरण जाणवते. उद्योग व सेवा क्षेत्राच्या वाढीमुळे राष्ट्रीय उत्पादनातील कृषिक्षेत्राचा वाटा घसरलेला दिसतो. उद्योगक्षेत्रातील वाढ अल्पावधीत चढउतार नोंदविते. तर सेवा क्षेत्राची वाटचाल प्रगतीदायक आहे. पण सेवा क्षेत्राच्या उत्पन्नात वाढ होऊनही रोजगार निर्माण झाला नाही. कृषीचा वाटा घसरूनही त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात घट नाही. असे असतानाही औद्योगिक क्षेत्राकडून कर्जाची बँकांकडे वाढलेली मागणी, औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशनाची वाढ या जमेच्या बाजू आहेत. तर येत्या हंगामात शेतीचे उत्पादन ५%हून अधिक वाढ दर्शविते. परंतु ३०% पेक्षा कमी झालेले बचतीचे प्रमाण चिंताजनक आहे. असेच प्रमाण राहिले तर याचा परिणाम दीर्घ मुदतीच्या औद्योगिक गुंतवणूकीवर होईल. नोव्हेंबर २०११ पासून खुल्या बाजारातून रोखे खरेदी करून रिझर्व्ह बँकेने दोन लाख कोटी अर्थव्यवस्थेला पुरविले आहेत. या व्यतिरिक्त सव्वा टक्क्यांची रोख राखीव दरामध्ये कपात झाली आहे. याकडे सुध्दा अत्यंत बारकाईने पाहणे उचित ठरेल.

५. राष्ट्रीयीकरणानंतर कृषिप्रधान अर्थव्यवस्थेला संजीवनी देण्यासाठी कृषि व कृषिसंलग्न व्यवसायांना मोठ्या प्रमाणात कृषिकर्ज दिली जात आहेत. कृषि हा मान्सूनवरील अवलंबित भाग आहे, कृषि कर्जातील धोका लपलेला असतो. तीन वर्षापूर्वी शासनाने ७०,००० कोटी रुपयांची कर्जमाफी करून ही रक्कम तीन वर्षात बँकांना दिली. प्रत्येक वेळी शासनास व पैसे पुरविणाऱ्या करदात्यास हे परवडणारे नाही.

६. बाराव्या पंचवार्षिक योजनेत पायाभूत सुविधांसाठी प्रस्तावित केलेली ५१.४६ लाख कोटी रुपये गुंतवणूक अर्थव्यवस्थेस दिशा देणारी ठरेल.

७. ग्लोबल वार्मींगप्रमाणे ग्लोबल बँकिंगचा विचार पुढे आला आहे. स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंदोर, बँक ऑफ राजस्थान, युनायटेड वेस्टर्न बँक व सांगली बँक यांच्या विलिनीकरणानंतर आग्रहण व विलिनीकरणावर भर देण्यात आला. आर्थिक मंदीमुळे अमेरिकेत एका पाठोपाठ मोठ्या ६६ बँका कोसळल्या. सप्टेंबर २००८ मध्ये विविध देशातील वित्तीय बाजारपेठा त्याशिवाय एक शतकापेक्षा अधिकचा इतिहास असणाऱ्या लेहमन ब्रदर्स,

सिटी बँक, मॉर्गन स्टॅनले या संस्थाही कोसळल्या यातून लक्षात आले की, विस्तार व आकाराचा बँकिंगवर फारसा प्रभाव जाणवला नाही.

८. भारतीय बँकांना जागतिक स्तरावर अनेक मोठ्या बँकांशी स्पर्धा करावयाची असल्याने बँकांना स्वत:च्या आकारमानाचे भान ठेवणे आवश्यक आहे.

९. भारतातील बँकिंग व्यवसायाचा आढावा घेतला असता जागतिक व्यापार संघटनेची स्थापना याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. यापूर्वीच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक करारात सेवा क्षेत्राचा समावेश नव्हता परंतु या करारात त्याचा समावेश करण्यात आला.

१०. आधुनिकीकरणासाठी तंत्रज्ञान आता बँकांत मोठ्या प्रमाणात वापरले जाऊ लागले आहे. राष्ट्रीयीकृत बँकांनी १७००० कोटी रुपये खर्च केले. याचा अर्थ भविष्यात बँकांना फार मोठी गुंतवणूक करावी लागेल. म्हणजेच संगणकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या भविष्यातील प्रश्नांचे अचूक आकलन बँकिंग प्रशासनाने करून घेण्याची गरज आहे.

११. भारतात अनादि काळापासून बँकिंग व्यवसाय अस्तित्वात असतानाही देशात आर्थिक क्षेत्रात रोखीने होणाऱ्या व्यवहाराचे प्रमाण गेल्या काही दिवसांमध्ये सातत्याने वाढले आहे. रिझर्व्ह बँकेने संघटित क्षेत्रामार्फत कडक नियंत्रणे आणून विनिमय विपत्रांच्या वापरात वाढ केल्यास बहुचर्चित भ्रष्टाचार आटोक्यात येऊ शकेल. भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या १४% हिस्सा रोखीने होणाऱ्या व्यवहारांचा आहे. यासाठी मोबाईल बँकिंग, कोअर बँकिंग, ऑनलाईन बँकिंग या माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांमार्फत रोकड व्यवहार कमी होऊ शकतात.

### समारोप:

रिझर्व्ह बँकेच्या कामगिरीचा आढावा घेतला असता, रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँकांच्या बाबतीत तत्त्ववेत्त्याची व मार्गदर्शकाची भूमिका अत्यंत परिणामकारकपणे पार पाडलेली आहे. गत ७५ वर्षात रिझर्व्ह बँकेने क्षमता, निष्ठा व व्यावसायिकता यात मोठे नाव मिळविले आहे.

देशातील बँकिंग उद्योग एका नव्या वळणावर येऊन ठेपला आहे. प्रारंभी खासगी व्यापारी बँकिंग नंतर राष्ट्रीयीकरण-शेती व ग्रामीण विकासासाठी सहकारी बँकिंग-विदेशी मार्गाने पुन्हा खासगी बँकिंगकडे-अलिकडे विशिष्ट कार्य करणारी वित्तीय क्षेत्रातील संस्था हे रूप बदलून ग्राहकांना सर्व प्रकारचे वित्तीय सहाय्य व सेवा देणारी सर्वव्यापक बँकिंग ही संकल्पना जगभरात मूळ धरीत आहे. त्याला अनुसरून विकास बँका व व्यापारी बँका परस्परांच्या क्षेत्रात काम करण्यास प्रवृत्त झाल्या आहेत. विकास बँका व व्यापारी बँका आता एकमेकांच्या स्पर्धेत उतरत आहेत. देशातील सर्वच बँका व विकास बँका या वित्त संस्थांवरील सरकारी मालकी हळू हळू कमी होत आहे. नफा या निकषावर ग्राहकांना दर्जेदार सेवा

पुरविण्याच्या दृष्टीने बँका धोरणे आखत आहेत. हे बदल औद्योगिक वृध्दीत व विकासाच्या उद्दिष्टांना कितपत फायदेशीर ठरतील याच अंदाज बांधता येणार नाही.

एकंदरित आपल्याकडे राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी बँका, जुन्या व नव्या खासगी बँका, विदेशी बँका या आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत हे मंदीच्या स्थितीत सिध्द झाले. सहकारी बँकांचे क्षेत्र मर्यादित असले तरी त्याचे एक विश्व आहे या विश्वाची व्याप्ती वाढविणे ही गरज ठरणार आहे. स्टेट बँक किंवा काही सहकारी बँका ज्या उमेदीने स्पर्धेत आघाडी घेत आहेत हे कौतुकास्पद आहे.

एके काळी बँका श्रीमंतांची मक्तेदारी म्हणून ओळखल्या जात. शेतकरी व सर्वसामान्य लोक बँकेचे नाव घेण्यास देखिल कचरत. पण आता राष्ट्रीयीकरणानंतर बँकांचा संबंध बऱ्यापैकी जीवनशैलीशी जोडला गेला आहे. अर्थव्यवस्थतील सर्व पायाभुत क्षेत्रांच्या उन्नतीसाठी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाने बळकटी आली. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाने ग्रामीण, शहरी, निमशहरी, डोंगराळ व आदिवासी भागात १५००० लोकवस्तीच्या ठिकाणीही शाखांचा विस्तार झाला आहे.

विद्यमान स्थितीत राष्ट्रीयीकृत बँकांचा शाखा विस्तार म्हणजे शाखांची संख्या ८०००० च्या पुढे आहे. सन २००८ मध्ये अमेरिका व युरोपमध्ये जे अरिष्ट कोसळले त्यात ४५० लहान-मोठ्या बँका व विमा कंपन्या संपुष्टात आल्या. या पार्श्वभूमीवर गेल्या ३ ते ४ वर्षात बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक अरिष्टांच्या चक्रव्युहात सापडली नाही हे आता सरकारही मान्य करीत आहे.

तात्पर्य, बदल येण्यापूर्वी बदलणे हे बदल आल्यानंतर बदलण्यापेक्षा जास्त हितकारक असते. म्हणून बँकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन बदलत्या परिस्थितीवर ताबा मिळवणे हेच काम आपल्या राष्ट्रीयीकृत बँकांनी गत चार दशकात केल्यामुळे आमचा बँकिंग उद्योग ताठ मानेने उभा राहिला आहे.

# नियोजन काळातील भारताचे जलधोरण

**प्रकाश बा. तितरे**, भद्रावती,
सहायक प्राध्यापक,
विवेकानंद महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ९८८१५९७८२०

---

**प्रस्तावना:**

जल नैसर्गिक संसाधन आहे आणि ते जीवन, जीविका, खाद्य सुरक्षा आणि निरंतर विकासाचा आधार आहे. जगातील १७.५ टक्के लोक भारतामध्ये राहतात. जगातील केवळ ४ टक्के जल संसाधन व जमिनीचे क्षेत्र फक्त २.४२ टक्के वाट्याला आले आहे. याबरोबरच वेळ आणि प्रदेशांचा विचार केल्यास असमान वितरण आहे. त्यामुळे देशाच्या कोणत्या न कोणत्या प्रदेशात पूर परिस्थिती किंवा कोरड्या दुष्काळाला सामोरे जावे लागते. भारतात लोकसंख्या वेगाने वाढत आहे त्यामुळे गरजाही वाढत आहे. जल संसाधनाची उपलब्धता, भविष्यात उपयोग, योग्य पाण्याची कमी यामुळे अनेक घटकांमध्ये जल विवाद वाढण्याची शक्यता आहे. लोकांमध्ये पाण्याची उपलब्धता कमी तसेच जीवन रक्षक आणि आर्थिक विकासात महत्व या बाबत जागरूकता कमी असल्यामुळे पाण्याचे व्यवस्थापन बरोबर होत नाही, त्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो किंवा अयोग्य वापर होतो. या करीता राष्ट्रीय जल धोरण ठरवून अनमोल जल नैसर्गिक संसाधनाचा योग्य उपयोग करण्यात येतो. जलाच्या संदर्भात आवश्यक धोरण, कायदा आणि विनियमन बनविण्याचा अधिकार भारतीय संविधानाने राज्य सरकारला दिला आहे परंतु जल सबंधी सामान्य सिध्दांत व राष्ट्रीय पातळीवर धोरण ठरवून समन्वय साधण्याचे कार्य केंद्र सरकारलाच करावे लागते या संदर्भात भारतात राष्ट्रीय जल धोरण १९८७, २००२ व २०१२ मध्ये घोषीत करण्यात आले.

भारतात १८५८ मध्ये मोठा दुष्काळ पडला तेंव्हा सिंचन व त्या संबंधी धोरण ठरवावे या बाबत चर्चा सुरू झाली. त्यावेळी मोठया प्रमाणात कालवे तयार करण्याचे काम हातात घेण्यात आले तसेच विशाल निर्माण कार्यावर लक्ष ठेवण्याकरीता नहर महानिरीक्षकाची नियुक्ती केली गेली. भारत सरकारच्या

१९१९ च्या अधिनियमानुसार जलसिंचाई एक प्रादेशिक विषय बनला आणि भारत सरकारची भूमिका फक्त सल्ला देणे, समन्वय साधणे आणि प्रादेशिक जलविवाद सोडविणे इतकाच मर्यादीत राहीला. 'इन्सचेप' समितीच्या शिफारसी नुसार १९२३ मध्ये लोक निर्माण विभाग सोबत उद्योग विभाग जोडले गेले. त्याला उद्योग आणि श्रम विभाग असे नाव देण्यात आले. हा विभाग या सर्व कामाबरोबरच जलसिंचन व विद्युत संबंधी सुध्दा काम पाहात होते. सचिवालय पुनर्गठीत समितीच्या सिफारशीनुसार निर्माण कार्य, खाण आणि विद्युत नावाने एक विभाग स्थापन करण्यात आला तो जलसिंचन आणि विद्युत विषयाची देखरेख करीत होता.

भारतात १९५१ मध्ये राष्ट्रीय संसाधन आणि वैज्ञानिक अनुसंधान या नावाने एक नवीन मंत्रालय बनवण्यात आले. या मंत्रालयाने निर्माण कार्य, खाण आणि विद्युत मंत्रालयाकडून 'सिंचन आणि विद्युत' विषय देण्यात आले. जलसिंचन व त्या सोबत विद्युतची देखभाल करण्याकरीता ऑगस्ट १९५२ मध्ये जलसिंचन आणि विद्युत नावाने एक नवीन मंत्रालयाचे गठन करण्यात आले. अनपेक्षित पूर लक्षात घेवून तो रोखण्याकरीता पूर नियंत्रण कार्यक्रमाला प्राथमिकता देवून कार्यान्वित करण्याकरीता एक पूर नियंत्रण बोर्डाचे गठन करण्यात आले. देशामध्ये मोठया प्रमाणात भविष्यात जलसिंचन विकास कार्यक्रमाच्या प्रश्नावर विचार करण्याकरीता १९६९ मध्ये जलसिंचन आयोगाची स्थापना करण्यात आली. १९७४ मध्ये केंद्र आयोजित क्षेत्र विकास कार्यक्रमाची (सीएडीसी) सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमालाच दहाव्या योजना काळात केंद्र प्रायोजित क्षेत्र विकास व जल प्रबंधन कार्यक्रम (सीएडीडब्ल्युएम) असे नवीन नाव देण्यात आले.

अर्जेन्टाइना मध्ये मार डेल प्लाटा येथे १९७७ मध्ये आयोजित संयुक्त राष्ट्र संघ आयोजित संमेलन विश्‍व जल संसाधनाचे व्यवस्थापनामध्ये आंतरराष्ट्रीय सहयोग आणि समन्वय वाढविणे या बाबत पहिले पाऊल टाकले. त्यानंतर १९८० व १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय जल धोरण संगठनेची गरज आहे हे मान्य करण्यात आले. विश्व जल परिषदेची स्थापना करण्याकरीता अनेक बैठका घेण्यात आल्या. या परिषदेची सदस्यता जल सबंधी रूची असणाऱ्या कोणत्याही संघठनांसाठी खुली ठेवण्यात आली आहे. जल संबंधी जागरूकता निर्माण करणे आणि जीवनातील पाण्याचा विविध अंगाने प्रभावी संरक्षण, सुरक्षा, विकास, व्यवस्थापन तसेच प्रयोग करणे हे विश्‍व जल परिषदेचे मिशन आहे.

आंतरराज्यीय नदी जल विवाद अधिनियम १९५६ मध्ये पारित करण्यात आला. या अधिनियमानुसार आंतरराज्यीय विवाद सोडविण्यात येते. सरकारीया आयोगाच्या शिफारसीनुसार आंतरराज्यीय परिषद द्वारा केलेल्या शिफारशीच्या आधारावर आंतरराज्यीय जल विवाद अधिनियम १९५६ मध्ये संशोधन करण्यात आले. भारत सरकारने १९८३ मध्ये राष्ट्रीय जल संसाधन परिषदेची स्थापना केली. या परिषदेचे अध्यक्ष प्रधानमंत्री होते. राष्ट्रीय जल धोरण तयार करणे व वेळोवेळी त्याची समिक्षा करणे. जल संसाधन संबंध प्रकल्प तसेच विकास योजना वर विचार व समिक्षा करणे, जल योजनांची शिफारस करणे, तसेच पर्यावरण नियंत्रण व आर्थिक विकास करण्याकरीता जल योजनांना प्रोत्साहन देणे इत्यादी कार्य राष्ट्रीय जल संसाधन परिषदेची आहेत.

जल संसाधन मंत्रालय देशातील जल संसाधनाच्या विकास आणि विनिमयनाकरीता धोरण आणि कार्यक्रम तयार करते. प्रादेशिक नियोजन, समन्वय, धोरणात्मक प्रकल्पांचे तांत्रीक परीक्षण व तांत्रीक आर्थिक मूल्यांकन, विशिष्ट प्रकल्पांकरीता केंद्रीय सहायता उपलब्ध करणे, विदेशी सहायता मिळविणे, आंतरराज्यीय जल विवादांचा निपटारा करण्यात सहायता करणे, लघुसिंचन,कमांड क्षेत्र विकास आणि भूजल संसाधनांचा विकास या संबंधी नियोजन, मार्गदर्शन व धोरण तयार करण्याचे कार्य जल संसाधन मंत्रालय करीत असते.

सिंचनाच्या योजनांचे वर्गीकरण सामान्यत: मोठया, मध्यम आणि छोटया योजना असे करण्यात येते. सुरवातीला भांडवलाचा आधार घेवून ५ कोटी रूपयांपेक्षा जास्त खर्च लागणारे मोठे प्रकल्प, २५ लाख रूपयांपेक्षा जास्त परंतु ५ कोटी रूपयांपेक्षा कमी खर्च लागणारे मध्यम प्रकल्प तर २५ लाख रूपयांपेक्षा कमी खर्च लागणारे छोटे प्रकल्प असे विभाजन केले जात होते. १९७८-७९ पासून मात्र नियोजनमंडळाने यात बदल केला असून ज्या प्रकल्पांचे सिंचन क्षेत्र (CCA-Culturable Command Area) १०,००० हेक्टर्सपेक्षा जास्त आहे त्या मोठे प्रकल्प, २००० ते १०,००० हेक्टर्सच्या दरम्यान सिंचन क्षेत्र असणारे मध्यम प्रकल्प आहेत, तर २००० हेक्टर्सपेक्षा कमी सिंचन क्षेत्र असणाऱ्या प्रकल्पांना छोटे किंवा लघु प्रकल्प म्हणतात.

## भारतात सिंचनाचे महत्त्व:

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात पाणी पुरवठयाच्या सोयीत वाढ झाली असली तरी अद्यापही बरीचशी शेती पर्जन्यावर अवलंबून आहे. या पर्जन्याचे मोसमाच्या दृष्टीने किंवा प्रदेशांच्या दृष्टीने असणारे वितरण सुध्दा असमान आहे. भारतात पावसाचे स्वरूप अनियमित आहे. त्यामुळे शेती उत्पादन अनिश्चित राहते. सिंचनाच्या व्यवस्थतेमुळेच पावसाच्या अनियमिततेपासुन मुक्ति मिळू शकते. सखोल लागवडीकरीता, उत्पादकता वाढविण्याकरीता, रोजगारात वाढ करण्याकरीता, शेती व्यवसायीक दृष्टीकोणातून करण्याकरीता, शेती उत्पादनातील जोखीम कमी करण्याकरीता, सरकारी उत्पन्नात वाढ करण्याकरीता, जलवाहतुकीच्या साधनांत वाढ करण्याकरीता तसेच दुष्काळाला नियंत्रीत करण्याकरीता भारतात सिंचनाचे महत्व अनन्य साधारण आहे. डॉ. गाडगीळ यांच्या अभ्यासात असे दिसून आले की, सिंचनामुळे शेतकऱ्यांना शेती, पशुपालन, अवजारे यामध्ये अधिक गुंतवण करणे शक्य होते. अनेक प्रगत देशांच्या शेतीची उत्पादकता हेच दर्शविते की सिंचनाच्या सोयी हे शेतीचे वरदान आहे.

## नियोजनकाळात सिंचन व पूरनियंत्रणावर खर्च व सिंचनक्षमता :

केंद्र सरकारने विविध पंचवार्षिक योजना मध्ये सिंचन व पूरनियंत्रण कार्यक्रमावर मोठ्या प्रमाणात खर्च करून देशात सिंचन क्षमता वाढविण्याचे सतत प्रयत्न केले आहे.

पुढे दिलेल्या तक्त्यावरून असे लक्षात येते की, विविध पंचवार्षिक योजना मध्ये सिंचन व पूरनियंत्रणावर होणाऱ्या खर्चात व निर्मित सिंचनक्षमतेत सतत वाढ होत गेली आहे. सर्व योजनांमध्ये हा खर्च एकूण खर्चाशी असणारे प्रमाण ८ ते १० प्रतिशत या दरम्यान आढळते.

### तक्ता: योजनानिहाय सिंचनक्षमता

| योजना | खर्च (कोटी रूपये) | संचयी निर्मित सिंचनक्षमता (लाख हेक्टर) |
|---|---|---|
| पहिली योजना | ४५० | २६२ |
| दुसरी योजना | ५२० | २९० |
| तिसरी योजना | ६६५ | ३३६ |
| चवथी योजना | १३५४ | ४४२ |
| पाचवी योजना | ३८७६ | ५२० |
| सहावी योजना | १०९२९ | ६५२ |
| सातवी योजना | १६५९० | ७६५ |
| आठवी योजना | ३२५२५ | ८६३ |
| नववी योजना | ५५४२० | ९३९ |
| दहावी योजना | १०३३१५ | १०२७ |
| अकरावी योजना | २३४७५९ | उपलब्ध नाही |

*स्त्रोत : आर्थिक समीक्षा २०११-१२, सांख्यिकीय परिशिष्ट*

**जल संसाधनांच्या विकासाकरीता केंद्र सरकारचे प्रयत्न :**

भारत सरकार सरकारी खर्च करून सिंचन क्षमतेत वाढ करीत आहे. तसेच शेतकऱ्यांना सिंचन क्षमता निर्माण करण्यात मदत करीत आहे.

१. केंद्रीय भूमिगत जल बोर्ड : भूमिगत जल संबंधी ही सर्वोच्च संस्था आहे. या बोर्डाची स्थापना १९५२ मध्ये केली गेली. भूमिगत जल संबंधी सर्वेक्षण करणे, जल संभावना शोधून काढणे त्यांचे मुल्यांकन करणे, भूमिगत जलाची गुणवत्ता ठरविणे व त्याबाबत मानीटरिंग करणे इत्यादी कार्य करीत आहे. भारतात भूमिगत जल संबंधी विकास करण्याकरीता धोरण, रणनिती आणि कार्यक्रम केंद्रीय भूजल बोर्ड बनवीत आहे.

२. राष्ट्रीय जल विकास एजन्सी : या एजन्सीची स्थापना जुलै १९८२ मध्ये करण्यात आली. नदी पासून मिळणाऱ्या पाण्याचा सदुपयोगाची संभावनांचा शोध घेवून पाणी आधिक्य असलेल्या क्षेत्राकडून कमी असलेल्या क्षेत्राकडे पोहचविणे हे या एजन्सीचे कार्य आहे.

३. केंद्रीय जल आयोग : जल ससाधनांच्या विकासाकरीता १९९५ मध्ये एक सर्वोच्च तकनीकी संस्थेची स्थापना करण्यात आली. हा आयोग जल संसाधनांचा उपयोग, संरक्षण आणि नियंत्रणाच्या उद्देशाने योजना बनविणे व समन्वय साधून विकास करणे. पूर नियंत्रण आणि बहुउद्देशीय नदी घाटी प्रकल्पांचे आयोजन, अनुसंधान, प्रबंधन आणि

मूल्यांकन या संबंधी आयोग महत्वपूर्ण कार्य करीत आहे.

४. त्वरीत सिंचन लाभ कार्यक्रम : केंद्र सरकारने अपूर्ण सिंचन योजना पूर्ण करण्याकरीता सहायता हेतू १९९६-९७ मध्ये त्वरित सिंचन लाभ कार्यक्रम सुरू केला आहे. ३१ मार्च २०११ पर्यंत २९० प्रकल्प या कार्यक्रमांतर्गत विचारात घेतले असून १३४ पूर्ण केलेले आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्य सरकारांना केंद्रीय ऋण सहायता (सीएलए) वित्त मंत्रालय द्वारा निर्धारीत व्याज दराने ऋण देण्यात येते. २० समान हप्त्यात राज्यसरकारला व्याजासहीत ऋण परत करावे लागते.

५. जल विज्ञान परियोजना : जागतिक बॅंकेच्या मदतीने भारत सरकार सोबत ऋण करार अंतर्गत एस.डी.आर. ७५.१ मिलियन ची जल विज्ञान परियोजना (चरण एक) लागू केली गेली. तसेच द्विपक्षीय करारानुसार तांत्रीक सहायता करीता नेदरलैन्ड सरकार कडून १४.६४ मिलियन यूरोचे अनुदान सहायता मिळविली. भूजल आणि भूगर्भ जल विभागाद्वारे १३ राज्यांत लागू करण्यात आली. जल विज्ञान परियोजना (चरण दोन) चा एकूण परियोजना लाभ १३५.०१ मिलीयन अमेरीकन डॉलर अंदाज आहे. चरण दोन एप्रिल २००६ पासून सुरू करण्यात आला आहे.

६. अनुसंधान आणि विकास कार्यक्रम : जल संसाधना संदर्भात अनुसंधान आणि विकास कार्यक्रम भारतात जल संसाधन मंत्रालया अंतर्गत राबविण्यात येत आहे. विद्यापीठ, आईआईटी मान्यताप्राप्त प्रयोगशाळा, केंद्रीय व राज्य सरकारचे जल सिंचन विभाग व गैर सरकारी संघटन यांना अनुदानाच्या रूपाने जल संसाधन इंजीनियरींगमध्ये अनुसंधान कार्याला चालणा देण्याकरीता या कार्यक्रमांतर्गत सहायता देण्यात येते.

७. जल गुणवत्ता मूल्यांकन प्राधिकरण : राष्ट्रीय जल संसाधनाच्या प्रदुषणा संबंधी समस्या लक्षात घेवून मे २००१ मध्ये जल गुणवत्ता मूल्यांकन प्राधिकरण स्थापन करण्यात आले. केंद्र आणि राज्य संस्थामध्ये समन्वय साधने तसेच जल संसाधनांची गुणवत्ता सुधारण्याकरीता या प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे.

८. जल क्षेत्राची दुरूस्ती, नवीकरण आणि पुर्नस्थापन : भारत सरकार ने २००५ मध्ये केंद्र व राज्य यांच्या ३:१ अनुपात मध्ये ३०० करोड रूपयाच्या प्रायोगिक योजनेला स्वीकृती दिली. ही योजना देशातील २६ जिल्ह्यांमध्ये लागू केली. या नंतर या योजनेचा विस्तार देशभर करण्यात आला आहे. या योजनेचा उद्देश कमी झालेली जल साठवण क्षमता शोधणे व त्यात वाढ करणे हा आहे.

९. बाढ आणि केंद्र प्रायोजित योजना : राष्ट्रीय बाढ आयोग द्वारा १९८० च्या रिपोर्ट नुसार देशातील एकूण भौगोलिक क्षेत्र ३२९ मिलियन हेक्टर असून त्यामधील ४० मिलियन हेक्टर पूरसदृश आहे. नहर निर्मिती, तटबंदी, शहर रक्षण कार्य व धरणाची उंची वाढवीणे इ.पूर नियंत्रणाकरीता केले जाते. केंद्र सरकार पूर नियंत्रणाकरीता राज्यांना

सहायता करीत आहे.

१०. भूमि जल संवर्धन पुरस्कार आणि राष्ट्रीय जल पुरस्कार : जल संसाधन मंत्रालयाने २००७ मध्ये १८ भूमि जल संवर्धन पुरस्कार सुरू केले होते. त्यात राष्ट्रीय जल पुरस्काराचा समावेश आहे. या पुरस्कारामागचा उद्देश गैरसरकारी संघटन, ग्राम पंचायतच्या माध्यमाने पावसाचे पाणी साठवून भूमी जल संवर्धन करण्याकरीता नवनवीन उपाय अंमलात आणण्याकरीता प्रेरीत करणे हा होता.

११. आंतरराष्ट्रीय सहयोग: जल संसाधन विकासाकरीता भारत सरकार व नेपाळ सरकार विविध स्तरावर प्रयत्न करीत आहे. महाकाली नदीवर (भारतात शारदा नदी) वर पंचेश्वर बहुउद्देशीय प्रकल्प बाबत कार्य सुरू आहे. या प्रकल्पामुळे पूर नियंत्रण, विद्युत व सिंचनाचे लाभ वाढतील. तसेच सप्त कोसी उच्च बांध बहुउद्देशीय प्रकल्प आणि सुन कोसी भंडारण सह अपवर्तन योजना या बाबत सुध्दा नेपाळ सरकार सोबत करार झालेला आहे. या बरोबरच भारत-भूतान सहयोग, भारत-बांगलादेश सहयोग, भारत-चीन सहयोग, भारत-पाकिस्तान सहयोगाच्या माध्यमाने जल परियोजना तयार करण्यात आलेल्या आहेत व अनेक धोरणात्मक चर्चा सुरू आहे.

१२. भारतातील नद्या जोडणी प्रकल्प : राष्ट्रीय नदीजोड प्रकल्प हा अनेक समस्यांनी भरलेला, अतिखर्चिक आणि आर्थिक, सामाजिक, राजकीय, पर्यावरण आशा अनेक क्षेत्राशी संबंधीत असा एक महाप्रकल्प आहे. लोकांच्या मनात मोठया अपेक्षा असल्या तरी हा प्रकल्प पूर्ण झाला तर चमत्कारच ठरेल. हा प्रकल्प महत्वाच्या नद्या व उपनद्या यावर करण्यात येणार असून सिंचन, वीजनिर्मिती, पूरनियंत्रण व पिण्याचे पाणी या सर्व सदंर्भात मदत होणार आहे. या प्रकल्पाला अनेक स्तरातून विरोधही आहे. कारण या प्रकल्पाचा खर्च प्रचंड आहे, अनेक वर्ष लागणार आहे त्यामुळे प्रकल्पाचा खर्च अनेक पटीने वाढणार आहे, सुपीक जमीन पाण्याखाली जाण्याची भीती आहे, विस्थापितांचा प्रश्न आहे, पाण्याचा अपव्यय होण्याची शक्यता आहे तसेच राज्याराज्यात जल विवाद होण्याची मोठी शक्यता आहे.

१३. बहुउद्देशीय नदी घाटी प्रकल्प : भारतात नदयांची भरमार आहे. असे म्हटले जाते की जगातील सर्व नदयांमध्ये जवळे जल उपलब्ध आहे त्याच्या १० टक्के भारतात उपलब्ध आहे. परंतु नदयांमधील अधिकतर जल समुद्रात वाहून जाते. नदयांमधील जल नियंत्रीत करून त्याचे अनेक प्रकारे उपयोग करण्याकरीता भारताने अमेरिकेचे अनुकरण करीत बहुउद्देशीय नदी घाटी योजना बनविलेल्या आहे या योजनामुळे सिंचनक्षेत्रात वाढ होते, पूरनियंत्रण व भूमि संरक्षणास मदत होते, जल विद्युत शक्तिंचा विकास होतो, मत्स्यपालन करता येते, जल वाहतुकीस मदत, पर्यटनाला प्रोत्साहन मिळते, शहरी क्षेत्राकरीता स्वच्छ जल पुरविता येते, रोजगार वाढ करता येते असे अनेक फायदे या योजनांचे आहे.

### भारतातील प्रमुख नदी घाटी योजना :

भाक्रा नांगल प्रकल्प (पंजाब, हरीयाणा आणि राजस्थान), दामोधर घाटी योजना (पश्चिम बंगाल आणि बिहार), हीराकुंड योजना (ओरीसा), कोसी योजना (बिहार), रिहंद बांध किंवा गोविंद वल्लभ सागर योजना (उत्तर प्रदेश), नागार्जुन सागर योजना (आंध्र प्रदेश), राजस्थान नहर योजना (राजस्थान), चम्बल प्रकल्प (मध्य प्रदेश), गंडक प्रकल्प (उत्तर प्रदेश आणि बिहार), तुंगभद्रा प्रकल्प (आंध्र प्रदेश आणि कर्नाटक), काकरापार प्रकल्प (गुजरात), फरक्का प्रकल्प (पश्चिम बंगाल), ताबा प्रकल्प (मध्य प्रदेश), कृष्णा प्रकल्प (महाराष्ट्र), रामगंगा प्रकल्प (उत्तरांचल)

वरील नदी घाटी प्रकल्पा बरोबरच अनेक प्रकल्पावर काम चालू आहे. त्यामध्ये व्यास प्रकल्प (पंजाब, हरीयाणा आणि राजस्थान), मयूराक्षी (पश्चिम बंगाल), माही (गुजरात), भीमा (महाराष्ट्र), घट प्रभा (कर्नाटक), तवा (मध्य प्रदेश), किसायू बांध प्रकल्प (उत्तरप्रदेष, हरीयाणा, हिमाचल प्रदेश), भद्रा (कर्नाटक), अपर कृष्णा (कर्नाटक) व मल प्रभा (कर्नाटक) इत्यादी.

अशा अनेक बहुउद्देशीय नदी घाटी योजना किंवा प्रकल्प भारतात आहेत किंवा पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. अशा बहुउद्देशीय नदी घाटी योजनांची प्रमुख समस्या ही आहे की, या तयारकरण्याकरीता मोठी गुंतवणूक करावी लागते वेळही अधिक लागतो त्यामुळे नियोजित गुंतवणुकीत त्या पूर्ण होत नाहीत परिणामतः सरकारवरील भार वाढतो.

### भारतातील सिंचना संबंधी समस्या :

१. सिंचनावरील खर्च आणि त्यापासून लाभ : प्रकल्प स्थापनेकरीता वित्तीय उत्पादन क्षमतेचा विचार करावा लागतो. सिंचनावर प्रचंड खर्च केला जातो परंतु त्यापासून मिळणारा लाभ मात्र अपेक्षितरित्या मिळत नाही. अनेक राज्यामध्ये प्रकल्पामधील चालू खर्च भरून काढणेसुध्दा शक्य होत नाही, अनेक प्रकल्प असेही आहेत की त्या प्रकल्पांवर तोटा सुध्दा सहन करावा लागतो असा अंदाज आहे.

२. सिंचन क्षमतेचा अपुरा वापर : पंचवार्षीक योजनांच्या आकडेवारीवरून असे लक्षात येते की, एकूण सिंचन क्षमतेपेक्षा वापर कमी होत असलेले दिसून येते. जसे दहाव्या योजनेत एकूण सिंचन क्षमता १०२.७७ दशलक्ष हेक्टर असून एकूण वापरलेली क्षमता ८७.२३ दशलक्ष हेक्टर एवढी आहे. त्यामुळे जल संसाधनांचा अपव्यय होतो.

३. सिंचन सुविधाचे असमान वितरण : भारतात विविध राज्यात सिंचन सुविधाचे असमान वितरण आहे. पंजाब, हरीयाणा, उत्तरप्रदेश, आंध्र प्रदेश व तामिळनाडू मध्ये सिंचनाची व्यवस्था चांगली आहे तर इतर राज्यात अजुनही पाहिजे त्या प्रमाणात सिंचन सुविधा नाही.

४. वित्तीय समस्या : सिंचनाचे मोठे प्रकल्प नियोजित वेळात पूर्ण होत नाही. मोठ्या प्रकल्पांकरीता लागत व्यय भाववाढीमुळे वाढत जातो. त्यामुळे अनेक योजना पूर्ण होण्यात वित्तीय व इतर अनेक अडचणी निर्माण होतात.

५. जल अपव्यय : नहराच्या द्वारे होणाऱ्या सिंचन व्यवस्थेत शेतकरी पाणी काटकसरीने वापरीत नाही. त्यामुळे सिंचित भूमीमध्ये क्षार आणि लवण च्या मात्रा वाढतात व उत्पादनात घट होते.

६. सिंचनाचे उच्च दर : अनेक राज्यात सिंचनाचे दर मोठया प्रमाणात वाढविण्यात आले आहे. त्याचा भार गरीब शेतकरी उचलू शकत नाही.

७. भूमिगत जल साधनांचा कमी वापर : भूमिगत जल साधनांचा वापर विहीरी व टयुबवेल च्या सहाय्याने केला जातो. भूमिगत जल साधनांचा वापर पाहिजे त्या प्रमाणात होत नाही कारण शेतकऱ्याकडे भांडवल गुंतवण्याकरीता नाही.

८. प्रशिक्षणाचा अभाव : शेतकऱ्यांना सिंचना बाबत तांत्रीक ज्ञान नसल्यामुळे व प्रशिक्षण नसल्यामुळे सिंचन सुविधाचा उपयोग योग्य पध्दतीने होत नाही. परिणामतः पाण्याचा अपव्यय होतो.

९. पीकउत्पादन पध्दतीत बदल : शेतीत कायमस्वरूपी पाणीपुरवठा होत असेल तर शेतकरी पारंपरिक पिकांपेक्षा अपारंपरिक जास्त उत्पादन देणारी पिके घेतात. अन्नधान्याच्या उत्पादना ऐवजी रोख पिके घेतात. सातत्याने असे होत असल्यास अन्नधान्याची टंचाई निर्माण होईल.

१०.रोगांचा प्रादुर्भाव : सततच्या सिंचनामुळे जमीन पाण्याखाली राहिल्यास मानवी जीवनास अहितकारी असलेल्या वनस्पतींची उगवण होते आणि त्याद्वारे निर्माण होणाऱ्या किटकांमुळे वेगवेगळे रोग पसरतात. त्या भागात रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.

११.क्षारयुक्त जमिनीची निर्मिती : सिंचनामुळे वर्षात अनेक पिके काढता येतात. जमीन नेहमीच पाण्याखाली राहते. त्यामुळे सुपीकता कमी होवून जमीन क्षारयुक्त किंवा खाऱ्या जमिनीची निर्मिती होते.

## शिफारशी:

१. भारतात अनेक क्षेत्रात पाणी पुरवठा कमी होतो. लोकसंख्या वाढ, शहरीकरण आणि जीवन शैलीत बदल या कारणामुळे पाण्याच्या मागणीमध्ये सतत वाढ होत आहे. त्यामुळे जल सुरक्षा संदर्भात अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्या दूर करण्याकरीता राष्ट्रीय धोरण महत्वाचे ठरले आहे. नियोजन काळात केंद्र व राज्य सरकारांनी वित्तीय गुंतवणूक करून व अनेक उपाय योजना राबवून या संदर्भात भरीव कार्य केले आहे. तरी पण अजूनही बरेच कार्य बाकी आहे.

२. जल एक दुर्लभ संसाधन आहे व विविध उपयोगात पाण्याचा वापर योग्य प्रमाणात व योग्य प्रकारे व्हावा या संदर्भात जागरूकता निर्माण करायला पाहिजे.

३. सिंचनावर होणारा खर्च आणि त्यापासून होणारा लाभ यामध्ये अंतर आहे. प्रकल्प स्थापनेकरीता वित्तीय उत्पादन क्षमतेचा विचार करावा.

४. मोठया खर्चाने व प्रयत्नाने सिंचन क्षमता निर्माण केली जाते त्या क्षमतेचा पूर्ण वापर करण्याकरीता सरकारी पातळीवर प्रयत्न करावयास पाहिजे.

५. भारतात विविध राज्यात सिंचन सुविधाचे असमान वितरण झाले आहे. प्रादेशिक समानतेच्या दृष्टीने प्रयत्न केंद्र सरकारने करावयास हवे.

६. प्रकल्प नियोजित वेळात पूर्ण होत नाही. त्यामुळे वित्तीय समस्या निर्माण होते. नियोजित वेळातच प्रकल्प पूर्ण व्हावा या करीता धोरणात्मक प्रयत्नांची गरज आहे.

७. जल वापराबाबत शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्याची गरज आहे. तसेच सिंचनाच्या वापराबाबत संशोधनाची गरज आहे.
८. मोठ्या प्रकल्पाकरीता वित्तीय भांडवल व वेळ मोठ्या प्रमाणात लागतो. त्यामुळे लघु किंवा मध्यम जलसिंचन व्यवस्थेला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.
९. राष्ट्रीय नदीजोड प्रकल्प हा अनेक समस्या निर्माण करणारा व अतिखर्चिक आहे. त्यामुळे त्याबाबत पुनर्विचार होणे आवश्यक आहे.
१०. आंतरराष्ट्रीय नद्यांच्या संदर्भात राष्ट्रीय हित लक्षात घेऊन द्विपक्षीय विचारविमर्श करून आंतरराष्ट्रीय सहयोग मिळविण्याकरीता केंद्र सरकारने प्रयत्न करायला पाहिजे.

संदर्भसूची :


१. मिश्रा जयप्रकाश, कृषीअर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, पृ. १४४
२. कायंदे गंगाधर वि., कृषी अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक - १३ पृ. ५.९, ५.१७
३. वार्षिक संदर्भग्रंथ, भारत २०११
४. आर्थिक समीक्षा २०११-१२, सांख्यिकीय परिशिष्ट
५. National Water Policy-Government of India, Ministry of Water Resources-1987, 2002 & 2012
६. India Infrastructure Report 2011, Water: Policy and Performance for Sustainable Development, Infrastructure Development Finance Company, Oxford University press.
७. http://wrmin.nic.in/



**ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES**
***DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE***

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2012 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31st August 2013. For further details, contact the undersigned on this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C., Jalgaon-425001.*
*( Mob.9422618410)*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# सहकारी तत्त्वातील संक्रमण

**महादेव गुरुलिंग पाटील**, मिरज
कन्या महाविद्यालय, जिल्हा सांगली
भ्रमणध्वनी: ९४२३३८३०१८

सहकार हा शब्द आज परवलीचा शब्द बनला आहे. भारतात नव्हे तर आज जगातील सर्व देशात सहकार हा जिवनाचा मार्ग बनला आहे. संपूर्ण जगात सूर्य जेथेपर्यंत पोहोचला नाही, त्याही पलिकडे सहकार पोहोचला आहे. थोडक्यात सहकार हा सर्वव्यापी व सर्वदूर असल्याचे आढळते. सहकार भारतीय ग्रामीण जीवनाचे अंगच बनले आहे. देशातील विविध धर्म, पंथ, रूढी, परंपरा, चाली रीती, भाषा, संस्कृती असणाऱ्या गरीब व श्रीमंत वर्गास एकत्र कसे रहावे व जगावे याचा संदेशच सहकारामुळे मिळतो असे म्हणावे लागेल.

सहकार co-operation हा शब्द मुळ लॅटीन शब्द को-ऑपररी co-operari या शब्दापासून आला असल्याचा उल्लेख आढळतो. येथे co याचा अर्थ एकत्र असा होतो तर operari ऑपररी याचा अर्थ काम करणे होतो. तेव्हा दोन्ही शब्दाचा एकत्रीत अर्थ सर्वांनी किंवा एकत्रीत किंवा परस्पर मदतीने कार्य करणे असा होतो. मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजात तो एकोप्याने राहतो. एकमेकाच्या सुख-दुःखात सहभागी होऊन जीवन व्यतीत करतो. म्हणून सहकार मनुष्य जातीला नवीन नाही. याबाबत वेल्स म्हणतात की, "Nature is a great friend of co-operation."

**सहकाराचा उगम:**

विना सहकार नाही उद्धार, एकमेका सहाय्य करू अवघे धरु सुपंथ ही विधाने आपण नेहमी ऐकतो. या दोन्ही वाक्याचा अर्थ सर्वांनी मिळून कार्य केल्यास स्वतः, समाज व राष्ट्राचा विकास होतो.

मानवाच्या अर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीची प्रेरणा व कारण सहकार आहे. कारण आदिमानवापासून वर्तमान काळापर्यंत सहकार प्रवृत्तीमुळे मानवाने आपली प्रगती घडवून आणल्याचे दिसते, सुरुवातीला निसर्गाची कोडी समजून घेणे, आपत्तीला तोंड देणे, नैर्सर्गिक साधन सामग्रीचा शोध घेणे, उत्पादन तंत्र कौशल्य विकसीत करणे, शत्रूशी सामना करणे इ.

कार्यात मानवाने सहकाराचा वापर केल्याचे दिसते. म्हणून थोर विचारवंत प्लेटो म्हणतात की, सहकाराशिवाय मानवी विकास अशक्य आहे.

आक्रमक व कटू स्पर्धेतून मानवाची आर्थिक व सामाजिक प्रगती होत नाही हे इतिहासाने सिद्ध केले आहे. सहकार युक्त विधायक स्पर्धा मानवाच्या प्रगतीस पोषक असते. आधुनिक प्राणी शास्त्रज्ञांनी देखील मानव आक्रमक नसुन एकमेकांस सहकार्य करणारा प्राणी असल्याचे मान्य केले आहे. थोडक्यात मानवाचा वैयक्तीक व सार्वजनिक जीवनाचा स्थायी भाव सहकार आहे. सुरुवातीला सहकाराची बिजे धार्मिक कल्पना, धार्मिक परंपरा, सामाजिक चालीरिती व परंपरा यातून रोवली गेली. भारतासारख्या देशात परस्पर सहाय्य, सामुदायीक कार्ये, सामाजिक मालमत्ता इ. विचार प्राचिन ग्रंथातून अढळतात. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात देखील सहकाराविषयी मौलीक विचार मांडलेले आहेत. भारताचे पारंपारीक ग्रामीण जीवन हे सहकाराचे उत्तम उदाहरण आहे.

## आधुनिक सहकाराचा उगम व विकास:

आधुनिक काळातील सहकार कल्पनेचा व्यवहारात उपयोग करण्याचे श्रेय रॉश्डेलच्या विणकराकडे जाते. ब्रिटन या देशात सन १७६० ते १८४० या कालावधीत औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन रचनेत अमुलाग्र बदल, यांत्रीकीकरण, जलद उत्पादन, आकर्षक वस्तूचे उत्पादन, गुणवत्तापूर्ण वस्तू, किमान उत्पादन खर्चात होऊ लागल्या, त्यामुळे ब्रिटनची खुप वेगाने प्रगती झाली. औद्योगिक क्रांतीच्या बळावर ब्रिटनने संपूर्ण जगावर आपला साम्राज्य विस्तार केला. औद्योगिक क्रांतीची काळी बाजू म्हणजे मालक व मजूर अशी परस्पर विरोधी रचना कामगारावरील अन्याय, अत्याचार, स्त्री व बालमजुरांचे शोषण, सक्ती, जबरदस्ती, मारहाण इ. होय. औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलदार वर्ग प्रबळ बनला, कामगार वर्ग दुर्बल झाला. कामगाराची हलाकी, अत्याचार वाढून अत्यंत क्लेशदायक वातावरण निर्माण झाले. यातून एक आशेचा किरण निर्माण झाला. रॉबर्ट ओवेन हा कामगार १७९१ ला न्यू लॅनार्क या गिरणीचा योगायोगाने मालक झाला. ओवेन यांनी आपल्या कामगारांसाठी न्यू *हार्मनी* नावाची सामुदायीक वसाहत स्थापन केली व आपल्या कामगार हीताचे निर्णय घेतले परंतु रॉबर्ट ओवेन लवकर म्हणजे १७९७ ला मृत्यू पावला. पुढे रॉबर्ट ओवेन यांचे कार्य विल्यम किंग या ओवेन यांच्या अनुयायाने सुरु केले. किंग यांनी १८२७ मध्ये ब्रिटन को-ऑपरेटीव्ह बिनेवॉलंट असोसिएशन व को-ऑपरेटीव्ह ट्रेड युनियन असोसिएशन संस्था सुरु केल्या. यामधून सहकारी ज्ञानाचा प्रसार केला.

रॉबर्ट ओवेन व विल्यम किंग यांच्या प्रयत्नामुळे हळू हळू इंग्लंड मध्ये सहकारी चळवळ सुरु होण्यास वातावरण तयार झाले. त्यातून रॉश्डेल या गावात १५ ऑगस्ट १८४४ मध्ये २८ विणकरांनी एकत्र येवून प्रत्येकी १ पौंड इतके भांडवल घालून *रॉश्डेल इक्वीटेबल पयोनिअर्स* नावाची पहिली ग्राहक संस्था सुरु केली. या संस्थेमार्फत चहा, साबण, आटा, साखर, मेणबत्त्या इ. गरजेच्या वस्तूंची रास्त दराने विक्री केली, त्यामुळे सभासदांचा खुप फायदा झाला. रॉश्डेलच्या विणकरांनी संस्था चालविण्यासाठी जे नियम केले होते त्यास सहकार तत्त्वे म्हणून पुढे मान्यता मिळाली. यातूनच सहकारी तत्त्वांचा उगम झाल्याचे दिसून येते.

जॉर्ज डेव्हीस यांच्या मते, सहकारी संघटन प्रकाराचे अस्तित्व व कार्यपद्धती ठरविण्याच्या नियमाचा संच म्हणजे सहकारी तत्त्वे होय.

रॉश्डेल तत्त्वे :

१. खुले सभासदत्व
२. लोकशाही कारभार
३. भांडवलावर नियंत्रीत व्याज
४. व्यवहाराच्या प्रमाणात नफा वाटणी
५. रोखीने व्यवहार
६. निर्भेळ व दर्जेदार वस्तूचा पुरवठा
७. सभासद शिक्षण
८. राजकीय व धार्मिक तटस्थता

रॉश्डेल ग्राहक संस्थेच्या समकालीन म्हणजे सन १८५० ते १८६० या दशकात नैसर्गिक परिस्थिती, दुष्काळ, लोकांचा कर्जबाजारीपणा या पार्श्वभूमीवर सहकारी पतपुरवठा चळवळ सुरु होण्याचे वातावरण निर्माण झाले. यातून सर रफायझन यांच्या प्रयत्नाने ग्रामीण भागासाठी तर शुल्झ डेलिस यांच्या प्रयत्नाने नागरी भागासाठी नागरी सह. पतपुरवठा संस्था सुरु झाल्या. या संस्थांनी सभासदांना अल्प व दीर्घ मुदतीच्या कर्जपुरवठ्याचे कार्य केले. यामुळे जर्मनीतील अनेक लोकांची खुप सोय झाली, लोकांच्या गरजा भागू लागल्या, थोडक्यात जर्मनी येथे पतपुरवठा चळवळ सुरु झाली व पुढे ती विकसीत झाली. रफायझन व शुल्झे संस्थांनी देखील संस्थेकरीता कांही नियम केले होते त्यांना पुढे सहकार तत्त्वे मानले जाऊ लागले.

रफायझन तत्त्वे : (ग्रामीण पतसंस्था)

१. स्वावलंबन
२. मर्यादित कार्यक्षेत्र
३. राखीव निधी
४. वर्गणी न भरता सभासदत्व
५. अमर्यादीत जबाबदारी
६. केवळ सभासदांशी व्यवहार
७. स्वेच्छेने संचलन कार्य

शुल्झे डेलिस तत्त्वे : (नागरी पतसंस्था)

१. मदत घेऊन स्वावलंबन
२. मोठे कार्यक्षेत्र
३. व्यवहाराच्या प्रमाणात अधिक्य वाटणी
४. भागावर व्याज
५. मर्यादित जबाबदारी / देयता
६. अधिक्यावरील १० टक्के रक्कम राखीव निधीत वर्ग करणे

सन १८९५ मध्ये इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स नावाने जागतिक पातळीवर सहकारी संघटन निर्माण झाले. सध्या जगातील १४३ हून अधिक देश याचे सभासद आहेत. ही संस्था जागतिक पातळीवर सहकारी संस्थांचा अभ्यास करून सहकारी चळवळ वाढविण्यासाठी प्रयत्न करते. तिचे मुख्य कार्यालय लंडन येथे असून विभागीय कार्यालये नवी दिल्ली व टांझानियातील मोशी येथे आहेत.

२० व्या शतकात पहिले महायुद्ध, आर्थिक मंदी अशी जागतिक संकटे आली या पार्श्वभूमीवर सन १९३७ मध्ये इंटरनॅशनल को-ऑप अलायन्स ने सहकार तत्त्वांची पुनर्मांडणी खालील प्रमाणे केलेली आहे.

१९३७ ची ICA ची तत्त्वे:

१. खुले सभासदत्व.
२. लोकशाही नियंत्रण
३. व्यवहाराच्या प्रमाणात नफा वाटणी
४. भांडवलावर मर्यादित व्याज

५. राजकीय तटस्थता

६. रोखीने व्यवहार

७. शिक्षण प्रसार

सन १९३९ ते १९४५ या कालावधीत दुसरे जागतिक महायुद्ध झाले. ब्रिटनच्या साम्राज्याची घसरण सुरु झाली. अनेक आशियाई व युरोपियन देश ब्रिटन पासून स्वतंत्र झाले. १९४५ मध्ये युनो, नाणेनिधी, विश्व बँक इ. जागतिक पातळीवर संस्था स्थापन झाल्या. यामुळे इंटरनॅशनल को-ऑपरेटीव्ह अलाईन्स या संस्थेने १९६६ मध्ये समाजवादी समाजरचना, नियोजित विकासाचे प्रयत्न या पार्श्वभूमीवर सहकारी तत्त्वांची पुर्नमांडणी केली आहे.

१९६६ ची ICA ची तत्त्वे

१. खुले व ऐच्छिक सभासदत्व

२. लोकशाही व्यवस्थापन

३. भांडवलावर मर्यादित व्याज

४. अधिक्याचे व्यवहाराच्या प्रमाणात वाटप

५. सहकारी शिक्षण

६. सहकारातंर्गत सहकार

१९८० नंतर संपूर्ण जगात सार्वजनिक क्षेत्राचे अपयश, अकार्यक्षमता, गुणवत्तेचा अभाव यामुळे जागतिक धोरणात बदलाची गरज निर्माण झाली. म्हणून १९९१ मध्ये विदेशी व्यापार व देवाण-घेवाण इ. साठी गॅट करार जगातील विविध देशांनी स्विकारला. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या स्वरुपाचे नविन आर्थिक धोरण स्विकारणे भाग पडले. या पार्श्वभूमीवर सन १९९५ मध्ये ब्रिटन मधील मँचेस्टर शहरात इंटरनॅशनल को-ऑपरेटीव्ह अलायन्सचे अधिवेशन पार पडले. सदर अधिवेशनात सहकार तत्त्वांची पुनर्मांडणी करावी लागली.

१९९५ ची मँचेस्टरची तत्त्वे:

मुख्य तत्त्वे-

१. ऐच्छिक व खुले सभासदत्त्व

२. संस्थेवरील लोकशाही नियंत्रण

३. सभासदांचा आर्थिक सहभाग

४. स्वायत्तता व स्वातंत्र्य

५. शिक्षण, प्रशिक्षण व माहिती

६. सहकारातंर्गत सहकार

७. समाजाबद्दल कर्तव्य किंवा निष्ठा

गौण तत्त्वे-

१. स्वावलंबन

२. रोख व उधारीचे व्यवहार

३. राजकीय व धार्मीक तटस्थता

४. काटकसरीचे तत्त्व

५. सेवा तत्त्व

६. समता तत्त्व

७. एकता व बंधुत्त्व

८. प्रसिद्धी

९. प्रामाणिक व्यवहार

१०. स्थानिक स्वायत्तता

संदर्भ सूची:

१. रायखेलकर-डांगे, *सहकार*

२. चौगुले-पठाण, *सहकार तत्त्वे व व्यवहार*

३. Kulkarni S. K., *Co-operation*

४. जोशी सी. जे., *सहकार*

५. *सहकार सुगंध* अंक

# भारतातील भाववाढ व चलन धोरण

मधुकर शिंदे, उरुण इस्लामपूर,
(विश्वस्त व माजी अध्यक्ष, म.अ.प.)
अर्थशास्त्र विभाग,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
ता. वाळवा, जिल्हा सांगली.
भ्रमणध्वनी: ९८९०११४८९६

---

भारतात अलिकडच्या काळात सन २००८-०९ या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत घाऊक किंमत निर्देशांकात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सन २००८-०९ या वर्षाच्या पहिल्या तिमाहीतअन्नपदार्थांच्या किंमती वाढल्या व भाववाढीला चालना मिळाली. ती २००९-१० या वर्षात कायम राहिली. या भाववाढीला जागतिक बाजारपेठेतील परिस्थिती तसेच देशांतर्गत परिस्थिती कारणीभूत ठरली. सन २००८-०९ या वर्षात जागतिक बाजारपेठेतील इंधन तेल व इतर वस्तूंच्या किंमती वाढल्या, तसेच भारतात त्या वर्षी मान्सूनचा पाऊस कमी पडला त्यामुळे शेती उत्पादनात घट होऊन अन्नधान्य व इतर शेती वस्तूंच्या किंमती वाढल्या. पुरवठ्याच्या बाजूत अडथळे निर्माण झाल्यामुळे भारतात भाववाढ झाली. भारतामध्ये घाऊक किंमत निर्देशांकाच्या (Wholesale Price Index) सहाय्याने भाववाढीचे मोजमाप केले जाते. सन २००८-०९ या वर्षात देशातील घाऊक किंमत निर्देशांकात मोठे बदल घडून० आले.

तक्ता-१ भारतातील घाऊक किंमत निर्देशांकातील बदल दर्शवितो. तक्ता-१ दर्शवितो की, सन २००७-०८ ते २००९-१० या काळात सर्व वस्तूंचा घाऊक किंमत निर्देशांक २१५.९ वरून २४२.७ वाढला. घाऊक निर्देशांकातील ही वाढ +१२.१४ राहिली. याच काळात प्राथमिक वस्तूंचा घाऊक निर्देशांक २२४.८ वरून २४७.३० असा वाढला. ही वाढ २१.७० होती. उत्पादित वस्तूंचा घाऊक निर्देशांक १८८ वरून २०३.१० वाढला. घाऊक निर्देशांकातील ही वाढ +११.४८ इतकी दिसून येते. इंधन तेल, उर्जा, वीज, वंगन वगैरे वस्तूंचा घाऊक

तक्ता क्रमांक १

भारतातील घाऊक किंमत निर्देशांकाचा कल.

(२००४-०५=१००)

| वस्तू गट | भार | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | वाढीचा दर % |
|---|---|---|---|---|---|
| १) सर्व वस्तू | १००.०० | २१५.९ | २३३.९० | २४२.७ | + १२.४१% |
| २) प्राथमिक वस्तू | २२.०० | २२४.८ | २४७.३० | २७३.६ | + २१.७०% |
| ३) उत्पादित वस्तू | ६३.८ | १८८.० | २०३.१० | २०९.६० | + ११.४८% |
| ४) इंधन, उर्जा, वीज व वंगन तेल | १४.२ | ३२७.२ | ३५१.३० | ३४३.१० | + ४.२५ % |
| सरासरी | | | | | १२.४६% |

*स्रोत : ESI २००९-१० व २०१०-११*

निर्देशांक ३२७.२ वरून ३४३.१० इतका वाढला, या निर्देशांकातील ही वाढ +४.२५% होती. अशा रितीने सन २००७-०८ ते २००९-१० या तीन वर्षाच्या काळात भरतात सर्व वस्तूंच्या किंमतीतील वाढ +१२.४१%, प्राथमिक वस्तूंची भाववाढ +२१.७०%, उत्पादित वस्तूंची भाववाढ +११.४८%, तर इंधन तेल, ऊर्जा, वीज, वंगने वगैरे वस्तूंची भाववाढ +४.२५% इतकी झाली. वरील तीन वर्षात देशातील सर्वसाधारण भाववाढ +१२.४०% झाली.

सन २००८-०९ या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत जागतिक बाजारातील भाववाढीच्या परिस्थितीमुळे भारतातील भावाढ १२.८०% पर्यंत वाढली. या वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत जागतिक बाजारपेठेतील पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती कमी झाल्या, त्यामुळे भारतातील भाववाढ कमी झाली. पुढील वर्षाच्या २००९-१० च्या पहिल्या सहामाहीत या किंमती स्थिर राहिल्या, परंतु त्या तौलनिकदृष्ट्या सन २००८-०९ च्या किंमतीच्या जवळपास होत्या. सन २००९-१० च्या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत घाऊक निर्देशांक भाववाढ कमी होत गेली. जूलै ऑगस्ट २००९ च्या दरम्यान ती उणे (-Ve) झाली. परंतु ही परिस्थिती फार काळ टिकली नाही. सप्टेंबर २००९ पासून पुन्हा भाववाढ सुरू झाली व तिने वेग घेतला. ही भाववाढ अन्नपदार्थ, प्राथमिक वस्तू, उत्पादित वस्तू, बिगर अन्नपदार्थ वस्तूंच्या किंमती वाढल्या व भाववाढ सर्व क्षेत्रात पसरली.

तक्ता २, वरून दिसून येते की, सन २००१ ते २००७ या काळात देशातील भाववाढ सरासरी ५.१४% इतकी होती सन २००७-०८ मध्ये ती कमी होऊन ४.७% वर आली. सन २००८-०९ या संपूर्ण वर्षात ती वाढून ८.४% इतकी झाली. तर एप्रिल ते डिसेंबर २००८-०९ या आर्थिक वर्षात भारतातील भाववाढीने दोन अंकी भाववाढीचा आकडा पार केला व ती १०.२०% इतकी झाली सन २००९-१० च्या एप्रिल ते डिसेंबर या आर्थिक वर्षात भाववाढ पुन्हा कमी होऊन ती १.६३% वर आली. त्यानंतर ऑगस्ट २०१० मध्ये पुन्हा भाववाढ १५% वर

तक्ता क्र.२ : सर्वसाधारण भाववाढ

| वर्षे | सर्व वस्तूंची भाववाढ % |
|---|---|
| २००१-०७ (सरासरी भाववाढ) | ५.१४% |
| २००७-०८ | ४.७% |
| २००८-०९ | ८.४% |
| २००८-०९ (एप्रिल ते डिसेंबर) | १०.२०% |
| २००९-१० (एप्रिल ते डिसेंबर) | १.६३% |
| ऑगष्ट २०१० | १५% |
| मार्च २०११ | १०.०५% |
| २० ऑगष्ट २०११ | १०.०५% |
| ऑगष्ट २०११ (संपूर्ण महिना) | ९.७८% |

*स्त्रोत : ESI २००८-०९, २००९-१० व २०१०-११.*

गेली. मार्च ते ऑगस्ट २०११ या दरम्यान भाववाढ १०.०५% झाली. तर ऑगस्ट २०११ या संपूर्ण महिन्यात ती ९.७८% इतकी झाली. रिझर्व्ह बँकेने भाववाढ कमी करण्यासाठी जे उपाय योजले त्यामुळे ऑगस्ट २०१० मध्ये १५% असणारी भाववाढ ऑगस्ट २०११ या एक वर्षाच्या कालावधीत ९.७८% वर स्थिर झाली. परंतु त्यापेक्षा ती कमी झाली नाही. रिझर्व्ह बँकेचे उद्दिष्ट देशातील भाववाढ ४ ते ५% दरम्यान आणणे आज देखील साध्य झालेले नाही. अनेक उपायानंतर देखील ती १०% च्या आसपास फिरत आहे. काही विचारवंताच्या मते भारताला उच्च आर्थिक वृद्धीदर राखावयाचा असेल तर देशातील भाववाढीचा दर १०% इतका राखायला हवा (Tolerable Level).

अलिकडच्या काळातील गेल्या ४ वर्षातील प्रमुख वस्तू गटातील भाववाढ तक्ता क्र.३ दर्शवितो.

तक्ता क्र.३

प्रमुख वस्तू गटातील भाववाढ

| वर्ष | प्राथमिक वस्तू | इंधने, ऊर्जा, वीज व वंगने | उत्पादित वस्तू |
|---|---|---|---|
| २००७-०८ | ७.६१ | ०.९३ | ४.९७ |
| २००८-०९ | १०.०६ | ७.४६ | ८.०९ |
| २००९-१० | १६.४६ | ११.११ | ०.३५ |
| २०१०-११ (जून-जूलै) | १२.२२ | १२.८५ | ७.४९ |
| सरासरी | ११.७९ | ८.११ | ५.२२ |

*स्त्रोत : ESI २००९-१० व २०१०-११*

सन २००७-०८ ते २०१०-११ या काळात प्राथमिक वस्तूंची भाववाढ अनुक्रमे ७.६१%, १०.०६% व १६.४६% व १२.२२% अशी राहिली. तर इंधन, ऊर्जा, वीज व वंगने या पदार्थांची भाववाढ अनुक्रमे ०.९३%, ७.४६%, ११.१९% व १२.८५% होती. उत्पादित वस्तूंची भाववाढ याच काळात अनुक्रमे ४.९७%, ८.०९%, ०.३५% व ७.४९% होती. तर या ४ वर्षांच्या काळातील सरासरी भाववाढ वस्तू, इंधन ऊर्जा, वीज व वंगने आणि उत्पादित वस्तू अनुक्रमे ११.७९%, ८.११% व ५.२२% अशी राहिली. सर्वात जास्त भाववाढ प्राथमिक वस्तूंमध्ये दिसून येते तर उत्पादित वस्तूंची भाववाढ तुलनेने कमी राहिली. प्राथमिक वस्तूमध्ये अन्नपदार्थ, तांदूळ, गहू, डाळी, भाज्या, बटाटे, कांदे, फळे, दुध, अंडी, मांस, मासे, चहा, मसाल्याचे पदार्थ वगैरेंचा समावेश होतो. तर उत्पादित वस्तूंमध्ये साखर, वनस्पती तेल, सुर्यफूल तेल, शेंग तेल, तांदूळ, चहा, कॉफी इत्यादींचा समावेश होतो. याचाच अर्थ असा होतो की, अन्नधान्य व अन्नपदार्थ वस्तूंच्या मध्ये मोठ्या प्रमाणात किंमती वाढल्या. यातील बहूसंख्य वस्तू शेती क्षेत्राशी निगडीत आहेत.

प्राथमिक वस्तू व उत्पादित वस्तूमध्ये प्रामुख्याने अन्नपदार्थांशी संबंधीत वस्तूमध्ये मोठ्या प्रमाणात भाववाढ झाल्याचे दिसून येते. पुढील तक्ता क्र.४ वरील गटातील अन्न व बिगर अन्न पदार्थांच्या किंमतीतील वाढ दर्शवितो.

**तक्ता क्र.४**

**अन्न पदार्थ व बिगर अन्न पदार्थांच्या किंमतीतील वाढ**

| वर्ष | प्राथमिक वस्तू गट | | उत्पादित वस्तू | |
|---|---|---|---|---|
| | अन्न पदार्थ | बिगर अन्न पदार्थ | अन्न पदार्थ | बिगर अन्न पदार्थ |
| २००८-०९ | ८.०२ | ११.१७ | १०.०४ | ६.३० |
| २००९-१० | १५.२१ | २२.३१ | १५.४९ | ५.३४ |
| फेब्रुवारी १० | २१.८५ | - | - | - |
| २०१०-११ (एप्रिल-डिसेंबर) | १६.६८ | - | - | - |
| मे २०१० | २१.३७ | - | - | - |

*स्त्रोत : ESI २००९-१० व २०१०-११.*

तक्ता क्र. ४ वरून दिसून येते की, प्राथमिक वस्तू गट व उत्पादित वस्तू गटात अन्न पदार्थांची भाववाढ तुलनेने जास्त झाल्याचे दिसून येते. सन २००८-०९ ते मे २०११ या काळात प्राथमिक वस्तू गटातील अन्न पदार्थांची भाववाढ ८.०२% वरून २१.३७% इतकी झाली. तर सन २००८-०९ ते २००९-१० या काळात बिगर अन्नपदार्थांची भाववाढ ११.१७% वरून २२.३१% झाली. उत्पादित वस्तू गटात याच काळात अन्न पदार्थांची भाववाढ १०.०४% वरून १५.४९% तर बिगर अन्न पदार्थ वस्तूंची भाववाढ ६.३०% वरून ५.३४% झाली. या गटात तुलनेने बिगर अन्न पदार्थांची भाववाढ कमी राहिली. अशा रितीने भारतात प्रामुख्याने प्राथमिक वस्तू गट व

उत्पादित वस्तू गटात तुलनेने जास्त भाववाढ घडून आली. भारतातील अलिकडच्या काळात प्राथमिक वस्तू गट व उत्पादित वस्तूगटांचा विचार करता दोन्ही मिळून भाववाढ १९.७७% इतकी (२००८-०९ ते २००९-१०) होती. ती एकूण वार्षिक भाववाढीच्या ६६.५६% इतकी होती.

सर्व वस्तू गटांच्या भाववाढीचा विचार करता तुलनात्मकदृष्ट्या इतर गटांपेक्षा प्राथमिक वस्तूंची भाववाढ जास्त राहिली. पुढील तक्ता क्रं. ५ डिसेंबर २००९ ते डिसेंबर २०१० या कालावधीतील प्राथमिक वस्तू अन्न पदार्थ व उत्पादित वस्तू अन्न पदार्थाची भाववाढ दर्शवितो.

तक्ता क्र. ५

अन्न पदार्थ वस्तंची भाववाढ (टक्के)

| वस्तू गट व वस्तू | डिसेंबर २००९ | डिसेंबर २०१० | ऑगस्ट २०११ |
|---|---|---|---|
| गट अ) प्राथमिक वस्तू | १४.८८ | १६.४६ | १८.० |
| प्राथमिक अन्न पदार्थ | १९.७७ | १३.५५ | - |
| तांदूळ | १२.३३ | १.१६ | - |
| गहू | १२.०४ | -५.०९ | -१.०४ |
| डाळी | ४१.५८ | -१०.८९ | -१.५६ |
| भाज्या | ३९.२२ | २४.१४ | +२२.४२ |
| बटाटे | १२३.८५ | -२६.५७ | +१३.३८ |
| कांदे | २७.४१ | ४५.८२ | +५७.०० |
| फळे | ९.८३ | २०.४४ | +२२.८२ |
| दुध | १३.३६ | १८.२१ | - |
| अंडी, मांस, मासे | २७.१६ | ११.२३ | १२.६२% |
| मसाले व मसाल्याचे पदार्थ | - | ३३.५० | - |
| चहा | २१.४५ | -५.४० | - |
| (गट ब) उत्पादित वस्तू अन्न पदार्थ | २६.४० | ०.३५ | ७.७९ |
| साखर | ५३.९८ | -९.११ | - |
| खाद्य तेले | - | ११.४६ | - |
| चहा, कॉफी | २१% | ७.१४ | - |

*स्त्रोत : ESI २००९-१० व २०१०-११*

डिसेंबर २००९ ते डिसेंबर २०१० व ऑगस्ट २०११ या काळात प्राथमिक वस्तूंची भाववाढ १४.८८% वरून १६.४६% व ऑगस्ट २०११ मध्ये ती १८% झाली. तसेच डिसेंबर २००९ ते डिसेंबर २०१० या काळात प्राथमिक अन्न पदार्थाची भाववाढ १९.७७ वरून १३.५५% अशी कमी झाली, परंतु फेब्रुवारी २०१० रोजी आतापर्यंतची सर्वात जास्त भाववाढ २१.९०% घडून आली. प्राथमिक अन्नपदार्थामध्ये प्रामुख्याने सन २००९ मध्ये डाळी (४१.५८%), भाज्या

(३९.२२%), बटाटे (१२३.८५%) कांदा (२७.४१%), अंडी, मांस व मासे २७.१६% चहा २१.४५% तर उत्पादित वस्तू अन्न पदार्थ गटात सन २००९ मध्ये अन्न पदार्थ वस्तूंची भाववाढ २६.४०% होती. त्यामध्ये साखरेच्या किंमती ५३.९८% वाढल्या. तर चहाच्या किंमती २१% ने वाढल्या.

डिसेंबर २०१० या वर्षात प्राथमिक वस्तूंची भाववाढ १६.४६% होती. तर प्राथमिक अन्नपदार्थांची भाववाढ १३.५५% होती. या वर्षात प्रामुख्याने कांदा (४५.८२%), मसाल्याचे पदार्थ ३३.५०% तर प्राथमिक अन्न पदार्थांची भाववाढ १३.५५% होती. भाज्या (२४.९४%), फळे (२०.४४%) अंडी, मांस, मासे (१९.२३%), दुध (१८.२१%) जास्त भाववाढ दिसून येते. तर तांदूळ, गळू, डाळी, बटाटे व चहाच्या किंमती कमी झाल्या. उत्पादित वस्तू अन्न पदार्थांची भाववाढ या वर्षात कमी झाली, ती ०.३५% इतकी राहीली. तर खाद्य तेले व चहाची भाववाढ ७.९४% होती.

ऑगस्ट २०११ या वर्षात प्राथमिक वस्तूची भाववाढ १८.०% होती. त्यामध्ये भाज्या (२२.४२%), बटाटे (१३.३८%), कांदा (५७%), फळे (२२.८२%), अंडी, मांस मासे (१२.६२%) अशी भाववाढ दिसून येते. तर उत्पादित वस्तू अन्न पदार्थ गटात ७.७९% भाववाढ दिसून येते. म्हणजे सन २००८ ते २०११ या काळात प्राथमिक वस्तू अन्न गट व उत्पादित वस्तू अन्न गटांत भाववाढ मोठी घडून आली, त्यामुळे सर्व सामान्य माणसाला त्याची झळ बसली. ऑगस्ट २०११ अखेर डाळी व गव्हाच्या किंमतीत गेल्या वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे १.५६% व १.०४% घट झाली.

**वैशिष्ट्ये:** अलिकडच्या काळातील भाववाढीचे वैशिष्ट्ये म्हणजे घाऊक किंमत निर्देशांकाऐवजी उपभोक्ता किंमत निर्देशांक (Consumer's Price Index) विचारात घेतल्यास ही भाववाढ अधिक असल्याचे दिसून येते. खालील तक्ता क्र. ६ विविध निर्देशांकानुसार भाववाढ दर्शवितो.

तक्ता क्र. ६
विविध निर्देशांकानुसार भाववाढ

| वर्ष | घाऊक निर्देशांक (WPI) | उपभोक्ता किंमत निर्देशांक औद्योगिक कामगार (CPI-IW) | उपभोक्ता किंमत निर्देशांक शेतमजूर (CPI-AL) | उपभोक्ता किंमत निर्देशांक, ग्रामीण कामगार (CPI-AL) |
|---|---|---|---|---|
| २००८-०९ | ८.४ | ९.१० | १०.२ | १०.२ |
| २००९-१० | ७.५(P) | १५.०० | १७.२ | १७.० |
| २०१०-११ (डिसेंबर पर्यंत) | ८.४३(P) | ९.४७ | ७.९९ | ८.०१ |

*स्त्रोत : ESI २००९-१० व २०१०-११.*
*P = Projected*

घाऊक किंमत निर्देशांकाशी तुलना करता उपभोक्ता किंमत निर्देशांक औद्योगिक कामगार, शेतमजूर व ग्रामीण मजूरासाठी सन २००८-०९ ते २००९-१० या काळात जास्त राहिले. याचा अर्थ सद्य परिस्थितीतील भाववाढीचा जास्त प्रतिकूल परिणाम प्रामुख्याने ग्रामीण कामगार व शेतमजूर आणि औद्योगिक कामगारांवर झाला.

**भाववाढीची कारणे:** सद्य परिस्थितीतील भाववाढीस आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत परिस्थिती कारणीभूत ठरली. या भाववाढीचे वर्णन पुरवठा प्रेरीत भाववाढ (Supply Driven Inflation) असे करण्यात येते. हा मागणी प्रेरीत भाववाढीचा (Demand Pul Inflation) प्रकार आहे.

तक्ता क्र. ७

जागतिक लोकसंख्या

| वर्ष | जागतिक लोकसंख्या वाढ |
|---|---|
| १९६० | ३ अब्ज |
| १९९९ | ६ अब्ज |
| २०११ | ७ अब्ज |

१. अन्नधान्य व अन्न पदार्थाचा कमी पुरवठा - जागतिक पातळीवर अन्न धान्याची टंचाई निर्माण झाली. कारण रशियात गव्हाच्या उत्पादनात घट झाली, इंडोनेशिया व ऑस्ट्रेलियात पूरामुळे पिके बुडाली, तर अर्जेंटिनात अवर्षण पडले व अमेरिकेत मक्याचे उत्पादन घटले. त्यामुळे जागतिक बाजारात अन्न धान्याची टंचाई निर्माण झाली. दुसऱ्या बाजूला जागतिक लोकसंख्या वाढली, दरवर्षी ७८ लक्ष लोकसंख्याची जागतिक लोकसंख्येत भर पडते आहे. तसेच भारत व चीन या वेगाने विकसित होत असलेल्या देशातून अन्नधान्याची मागणी वाढली. जागतिक पातळीवर अन्नधान्याचा वापर बायोफ्युअलसाठी सूरू झाला. परिणामी जागतिक बाजारात अन्नधान्याच्या किंमती वाढून भाववाढ झाली. तिचा परिणाम भारतात अन्न पदार्थाच्या किंमती वाढण्यात झाला.

२. लोकसंख्या वाढ व अन्न धान्य उत्पादन वाढ यातील तफावत -

भारताची लोकसंख्या सन २००१ मध्ये १०२.७ कोटी इतकी होती. ती २०११ च्या जनगणनेनुसार १२१ कोटी इतकी झाली. दर वर्षी १८ ते १९ दशलक्ष लोकसंख्येची भर पडते. त्यामुळे अन्नधान्याची मागणी वाढत आहे. भारतात लोकसंख्या वाढीचा दर अन्नधान्याच्या

तक्ता क्र. ८

लोकसंख्या व अन्नधान्य वाढीचा दर

| वर्ष | लोकसंख्या वाढीचा दर | अन्नधान्य वाढीचा दर | दरडोई अन्नधान्याची उपलब्धता (कि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|
| १९७१ | २.४८ | २.५१ | १७१.१ |
| १९८१ | २.५० | २.२४ | १७१.१ |
| १९९१ | २.३८ | २.८९ | १६६.० |
| २००१ | २.१३ | १.६० | १५१.९ |

*स्त्रोत : Gom (२००५) PFF (२००१), http://agri.coop.nic.in.*

वाढीच्या दरापेक्षा जास्त राहिल्यामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊन भाववाढ झाली. खालील तक्ता क्र.८ भारताची लोकसंख्या व अन्नधान्य वाढीचा दर यादोहोतील तफावत दर्शवितो.

तक्ता क्र. ८ वरून दिसून येते की, सन १९७१ ते २००१ या काळात देशातील लोकसंख्यावाढीचा दर २.४८ वरून २.१३% असा घटत गेला, त्याचवेळी देशातील अन्नधान्यवाढीचा दर देखील २.५१% वरून १.६०% असा घटत गेला. सन १९९१ हे दशक वगळता अन्नधान्यवाढीचा दर लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा कमी राहिल्याचे दिसून येते. त्यामुळे अन्नधान्याच्या मागणी-पुरवठ्यात असमतोल निर्माण होऊन दरडोई अन्नधान्याची उपलब्धता १७१.१ कि.ग्रॅम वरून १५१.९ कि.ग्रॅ. अशी घटत गेली. परिणामी अन्नधान्याची भाववाढ घडून आली. अन्न पदार्थ गटातील वस्तूंच्या किंमतवाढीला त्या वस्तूंच्या उत्पादनातील घट कारणीभूत ठरली.

**साखर** - साखर उत्पादन चक्रिय आहे. सन २००८-०९ या वर्षात त्या अगोदरच्या वर्षापेक्षा २६३ लक्ष टनावरून १४६ लक्ष टन असे कमी झाले. तर साखरेची मागणी २३० लक्ष टन कायम राहिली. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेच्या किंमती वाढल्या, त्यामुळे भारतात साखरेच्या किंमतीत वाढ घडून आली.

**डाळी** - भारत कायम डाळींची टंचाई असणारा व डाळींचा आयातदार देश आहे. गेल्या ३ वर्षात डाळींचे देशांतर्गत उत्पादन १४ ते १४.८ दश लक्ष टनाच्या आसपास राहिले. तर मागणी १७ ते १८ दश लक्ष टन आहे. मागणी-पुरवठ्यातील तफावतीमुळे डाळींच्या किंमती वाढल्या.

**तांदूळ** - सन २००८-०९ मध्ये तांदळाचे उत्पादन ९९.१५ दश लक्ष टन होते, ते २००९-१० या वर्षात कमी होऊन ८६.१५ दश लक्ष टन इतके झाले. तांदूळ उत्पादनात १२.९३ दश लक्ष टनाची घट झाली परिणामी तांदळाच्या किंमती वाढल्या.

**गहू** - सन २००८-०९ या वर्षात गव्हाचे उत्पादन २२.६९ दश लक्ष टन होते ते २००९-१० या वर्षात २५.८८ द.ल.टन इतके झाले. गव्हाचे उत्पादन वाढल्यामुळे गव्हाच्या किंमती कमी झाल्या.

**भाज्या** - मान्सूनची कमतरता, काही ठिकाणी अवेळी पावसामुळे भाजी वर्गिय पिकांचे झालेले नुकसान उदा. नाशिक जिल्ह्यात गेल्या वर्षी पाऊस लांबल्यामुळे शेतातील कांदा कुजला, कांदा उत्पादनात घट झाली व कांद्याच्या किंमती वाढल्या. कांदा १५ रू. किलोवरून ८० रू. किलो असा झाला. दक्षिणेतील राज्यात पूर आले. त्यामुळे भाजी पिकांचे नुकसान झाले व भाज्यांची भाव वाढ घडून आली. सन डिसेंबर २००९ मध्ये भाव ५२% पेक्षा जास्त वाढला. तो मागील वर्षापेक्षा ९% ने वाढला.

**दूध** - देशात दुधाची टंचाई नाही, परंतु पशूखाद्यांच्या किंमती वाढल्यामुळे उत्पादन खर्च वाढून दुधाच्या किंमती वाढल्या.

**चहा** - सन २००८-०९ मध्ये भारत व इतर चहा उत्पादक देशात चहाच्या उत्पादनात घट झाली. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात चहाच्या किंमती अगोदरच्या वर्षापेक्षा ५५% ने वाढल्या. परिणामी देशांतर्गत उत्पादनातील घट व आंतरराष्ट्रीय बाजारातील भाववाढ भारतात चहाच्या किंमती वाढण्यास कारणीभूत ठरली.

**खासगी उपभोगात झालेली वाढ** - भारतातील

### तक्ता क्र. ९

भारतातील खाजगी उपभोगातील वाढ (%)

| वर्ष | खाजगी उपभोग |
|---|---|
| २००१ | ३.४ |
| २००२ | ६.० |
| २००३ | २.९ |
| २००४ | ५.९ |
| २००५ | १.७ |
| २००६ | ८.५ |
| २००७ | ८.३ |
| २००८ | ९.३ |
| २००९ | ७.७ |
| २०१० | ८.६ |
| वाढ | +१५२ |

स्त्रोत : ET -२२/०६/२०११

देशांतर्गत उत्पादनातील वाढ, ६ वा वेतन आयोग, शेतकऱ्यांची कर्जमाफी वगैरे कारणामुळे लोकांच्या उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे त्यांचा उपभोग वाढला. वरील तक्ता क्र.९ भारतातील खाजगी उपभोगातील वाढ दर्शवितो.

सन २००१ ते २०१० या काळात २००३ व २००५ या दोन वर्षांचा अपवाद वगळता भारतातील खाजगी उपभोग सातत्याने वाढत गेला आहे. सन २००१ या वर्षाशी तुलना करता २०१० या वर्षामध्ये खाजगी उपभोग +१५२% वाढला. त्याचा परिणाम देशांतर्गत मागणी जास्त राहून भाववाढ घडून आली. भारतातील लोकांच्या उत्पन्नात झालेल्या वाढीमुळे उपभोक्ते कमी मूल्य असणाऱ्या वस्तू गटांकडून (कनिष्ठ वस्तू) उच्च मूल्य वस्तू गटाकडे वळले, त्यामुळे भाज्या, फळे, मसाले दुग्धजन्य पदार्थांची मागणी वाढून भाववाढ झाली.

**पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतीतील वाढ:** जागतिक पातळीवर कच्चे तेल व पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमतीत वाढ झाली. त्यामुळे भारतात देखील पेट्रोल, डिझेल व गॅस किंमतीत वाढ झाली. त्याचा परिणाम भारतात भाववाढ होण्यात झाला. खालील तक्ता क्र.१०, जागतिक पातळीवरील पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमतीत झालेली वाढ दर्शवितो.

### तक्ता क्र. १०

जागतिक बाजारपेठेत पेट्रोलजन्य तेलाच्या किंमतीतील वाढ (प्रती बॅरल डॉलर)

| वर्षे | तेलाच्या किंमती |
|---|---|
| २००९ | ६१.८० |
| २०१० | ७९.०० |
| २०११ | १०७.२० |
| वाढीचा दर | +७३.४६ |

स्त्रोत : इकॉनॉमिक टाईम्स, २२/०६/२०११.

सन २००९ ते २०११ या तीन वर्षांच्या काळात जागतिक बाजारपेठेत पेट्रोलियमजन्य पदार्थांच्या किंमती प्रती बॅरल ६१.८० डॉलर वरून १०७.२० प्रती बॅरल अशा वाढल्या त्यामुळे भारतात डिझेल, पेट्रोल व गॅसच्या किंमती वाढल्या. भारतात २०१०-११ या एका वर्षात १७ रू. प्रती लिटरने वाढविल्या. पेट्रोल किंमत ५७ रूपयावरून १५ सप्टेंबर २०११ रोजी प्रती लिटर ७४ रू. वाढविली. तर गॅसची किंमत प्रती सिलेंडर ५० रू. वाढविली, त्याचा परिणाम सर्वसाधारण भाव वाढीत झाला.

**शेती क्षेत्राची दुर्दशा -** भारतातील अन्न पदार्थांची भाववाढ शेती वस्तूच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यामुळे घडून आली. शेतीची

अल्प उत्पादकता, बिनकिफायशिरपणा व उणे नफा वजा खर्च-उत्पादन विश्लेषण, आदानांच्या किंमतीतील वाढ राज्य व केंद्रसरकारचा शेती क्षेत्रातील घटता खर्च, न परवडणाऱ्या किमान आधारभूत किंमती, मान्सूनचा लहरीपणा व शेती क्षेत्रातील वाढती जोखीम, केंद्र व राज्य सरकारांचे दुर्लक्ष वगैरे कारणामुळे गेल्या दशकात ८० लक्ष शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून दिले. या कारणामुळे शेती उत्पादन घटले व शेती वस्तूंची टंचाई निर्माण होऊन शेती वस्तूंची भाववाढ झाली.

**मानसशास्त्रीय घटकः** ६ व्या वेतन आयोगामुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ, अन्न पदार्थांच्या किंमतीतील वाढ वगैरे कारणामुळे लहान व्यावसायिक, विक्रेते यांच्या मानसिकतेत बदल झाला. त्यानी आपल्या वस्तूंच्या व व्यावसायिक किंमती वाढविल्या त्यामुळे भारतात सर्वसाधारण भाववाढीला चालना मिळाली.

**पैशाच्या पुरवठ्यात झालेली वाढः** भारतात अलिकडच्या काळात विविध कारणामुळे पैशाच्या पुरवठ्यात वाढ घडून आली. त्यामुळे पैशाचे मूल्य कमी होऊन भाववाढ झाली. पैशाचा पुरवठा वाढल्याने लोकांचे उत्पन्न वाढले, विविध वस्तूंची मागणी वाढली व भाववाढ झाली. पुढील तक्ता क्र.११ भारतीय अर्थव्यवस्थेतील अलिकडच्या काळातील वाढ दर्शवितो.

सन २००६-०७ ते २००९-१० या ४ वर्षाच्या काळात भारतात M1 पैशाचा पुरवठा +५३.८१ दराने वाढला तर **M3** पैशाचा पुरवठा + ९८.०४ दराने वाढला. पैशाच्या पुरवठयातील वाढ भाववाढीला कारणीभूत ठरली.

**उपाय :** रिझर्व्ह बँकेला आपल्या चलन धोरणात भाववाढ नियंत्रणाबरोबरच पैशाच्या पुरवठयाचे व्यवस्थापन व नियंत्रण करणे तसेच उत्पादक कार्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध करणे त्यामुळे आर्थिक वाढीचा दर विशिष्ट राखणे यासाठी प्रयत्न करावे लागत आहेत. भारतातील भाववाढ कमी करण्यासाठी RBI ने विविध उपाय योजले. त्यामध्ये चलनविषयक धोरण, आर्थिक धोरण, प्रशासकीय

तक्ता क्र.११ :भारतातील अलिकडच्या काळातील पैशाच्या पुरवठ्यातील वाढ

| वर्षे | पैशाचा पुरवठा M1 (को.रु.) | M3 |
|---|---|---|
| २००६-०७ | ९६६०८९ | ३३१६०९३ |
| २००७-०८ | ११५०९५३ | ४००६७२२ |
| २००८-०९ | १२५३१८४ | ४७६४०११ |
| २००९-१० | १४८५९११ | ५५७९५६७ |
| २०१०-११ | - | ६४७१८१० |
| २०११-१२ | - | ७९३५०९० |
| वाढीचा दर | +५३.८१ | +९८.०४ |

स्त्रोत : RBI - Bulletin - July 2008 व Dec.2009

तक्ता क्र. १२

| कालावधी | CRR-वाढ | एकुण - CRR |
|---|---|---|
| डिसेंबर २०१० | - | ५.०० |
| २९ जानेवारी २०१० | ०.७५ | - |
| | + | |
| १३ फेब्रुवारी २०१० | ०.५० | ५.५० |
| २७ फेब्रुवारी २०१० | +०.२५ | ५.७५ |
| २०१०-२०११ | ०.२५ | ६.०० |
| ३० ऑक्टो. २०१२ | -१.७५ | ४.२५ |

स्त्रोत : ESI, २००९-१० व २०१०-११

धोरण वगैरेंचा समावेश होतो. या उपायामध्ये अल्पकालीन व मध्यमकालीन उपायांचा समावेश होतो. यापैकी चलनविषयक धोरणामध्ये पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्यासाठी बँकाच्या राखीव निधी गुणोत्तर (CRR), कायदेशीर रोखता निधी गुणोत्तर (SLR) तसेच व्याजदरात वाढ करण्यासाठी रेपो रेट व रिव्हर्स रेपो रेट व (RRR) मध्ये बदल करण्यात आले आहेत. राखीव निधी गुणोत्तर (CRR), कायदेशीर रोखता निधी गुणोत्तर (SLR) तसेच रेपो रेट व रिव्हर्स रेपो रेट मध्ये वाढ करून

तक्ता क्र. १३

कायदेशिर रोखता निधी

| वर्ष | SLR - (%) |
|---|---|
| ८ नोव्हेंबर २००८ | २४% |
| ७ नोव्हेंबर २००९ | २५% |
| १५ डिसेंबर २०१० | २५% |
| १६ डिसेंबर २०१० | २४% |
| २०११-- | २५% |
| ऑक्टो. २०१२ | २५% |

स्त्रोत : RBI - Bulletin 2010-11

अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी करून देशातील भाववाढ नियंत्रित करण्याचा प्रयत्न चालविला आहे. रिझर्व्ह बँकेने सी.आर.आर. मध्ये वरील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे वाढ केली आहे.

डिसेंबर २०१० मध्ये बँकाचा CRR ५% होता. २९ जानेवारी २०१० मध्ये त्यात दोन टप्प्यात ०.७५% वाढ केली. तो १३ फेब्रुवारी २०१० रोजी ०.५०% ने व २७ फेब्रुवारी २०१० रोजी ०.२५% ने वाढ केली. त्यामुळे व्यापारी बँकाचा CRR २७ फेब्रुवारी २०१० रोजी ५.७५% इतका झाला. पुन्हा २०१०-११ या वर्षात ०.२५% ने वाढविला व तो ६.००% इतका केला आहे. यामागे R.B.I. ची अशी भूमिका आहे की बँकाचा CRR वाढल्यामुळे त्यांना कर्ज देण्यासाठी कमी पैसा उपलब्ध होईल, परिणामी पैशाचा पुरवठा कमी राहून भाववाढ आटोक्यात येईल. CRR वाढविल्यामुळे अर्थव्यवस्थेत ३६००० को रू. पैशाचा पुरवठा कमी झाला.

पैशाचा पुरवठा कमी व्हावा म्हणून रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँकाच्या SLR मध्ये देखील

२५% वरून २४% अशी घट केली. मागील तक्ता SLR मधील बदल दर्शवितो.

सन २००८ च्या आर्थिक मंदीला तोंड देण्यासाठी SLR कमी करून २४% केला. त्यानंतर आर्थिक मंदी संपून २००९-१० या वर्षात भाववाढीची चाहूल लागताच RBI ने SLR वाढवून २५% केला व पैशाचा पुरवठा कमी करण्याचा प्रयत्न केला. परंतु पैशाचा पुरवठा कमी होऊन त्याचा आर्थिक वाढीवर प्रतिकूल परिणाम होऊ नये यासाठी अर्थव्यवस्थेत पुरेशी रोखता असावी म्हणून रिझर्व्ह बँकेने पुन्हा SLR १% ने कमी करून २४% केला. तर २०११ मध्ये वाढवून तो २५% वर आणला.

**रेपो व रिव्हर्स रेपो रेट -**

रिझर्व्ह बँकेने अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी करून भाववाढ कमी करण्यासाठी एका वर्षाच्या कालावधीत १२ वेळा रेपो व रिव्हर्स रेपो दरात वाढ केली. त्यामुळे २१ एप्रिल २००९ ते सप्टेंबर २०११ या काळात रेपो रेट ४.७५% वरून ८.२५% व रिव्हर्स रेपो रेट ३.२५% वरून ७.२५% इतके वाढविण्यात आले. पुढील तक्ता क्र. १४ रेपो व रिव्हर्स रेपो रेट मधील वाढ दर्शवितो.

रेपो व रिव्हर्स रेपो दरातील वाढीमुळे व्याजदर वाढून बँकाची कर्जे महाग होतील व त्यामुळे कर्जाची मागणी कमी होईल. परिणामी पैशाचा पुरवठा कमी होऊन भाववाढ कमी होईल, अशी रिझर्व्ह बँकेची अपेक्षा आहे.

रिझर्व्ह बँकेने सीआरआर, कायदेशिर रोखता निधी गुणोत्तर रेपो व रिव्हर्स् रेपो रेट मध्ये बदल केले असले तरी तिचे चलनविषयक धोरण देशातील भाववाढ ५% पर्यंत कमी करण्यात यशस्वी झालेले नाही. आज देखील भाव वाढ ९.४८% म्हणजे १०% च्या जवळपास आहे. कारण रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरणात परस्परविरोधी उपाय दिसून येतात. आजच्या रिझर्व्ह बँकेच्या चलन धोरणाची तीन उद्दिष्टे आहेत.

१. भाववाढ कमी करणे.
२. आर्थिक वाढीचा दर १०% राखणे.
३. आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे.

भाववाढ कमी करण्यासाठी पैशाचा पुरवठा कमी केला पाहिजे तर आर्थिक वाढीचा दर उच्च राखण्यासाठी अर्थव्यवस्थेत पुरेसा पैशाचा पुरवठा राखला पाहिजे. पैशाचा पुरवठा कमी झाल्यास भाववाढ कमी होऊन, आर्थिक

तक्ता क्र. १४

रेपो व रिव्हर्स रेपो दरातील बदल (%)

| कालावधी | रेपोरेट | रिव्हर्स रेपो रेट |
|---|---|---|
| २१ एप्रिल २००९ | ४.७५% | ३.२५% |
| २५ जानेवारी २०११ | ६.५% | ५.५% |
| सप्टेंबर २०११ | ८.२५% | ७.२५% |
| ३० ऑक्टोबर २०१२ | ८.००% | ७.००% |

स्त्रोत : ESI, २००९-१० व २०१०-११

वाढीचा दर देखील कमी होतो तर पैशाचा पुरवठा वाढविल्यास आर्थिक वाढीचा उच्च दर प्रस्थापित होण्यास मदत होते, तर भाववाढ कमी होत नाही. रिझर्व्ह बँकेला ही दोन्ही उद्दिष्टे एकाच वेळी साध्य करावयाची असल्याने 'धरलं तर चावतंय व सोडलं तर पळतय' अशी रिझर्व्ह बँकेची अवस्था झाली आहे.

रिझर्व्ह बँकेने आपल्या चलनविषयक धोरणात सन २००९-१० मध्ये ५७००० को.रू. रोख्यांची खरेदी केल्यामुळे ५७००० को.रू. पैशाचा पुरवठा वाढला. तसेच SLR २५ % वरून २४% कमी केल्यामुळे पैशाचा पुरवठा वाढत आहे. त्यामुळे एकाच वेळी पैशाचा पुरवठा कमी करणे व वाढविणे यामुळे रिझर्व्ह बँकेचे चलनविषयक धोरण भाववाढ कमी करण्यात यशस्वी झाले नाही.

तसेच सरकारने शेती क्षेत्राकडे फारसे लक्ष दिलेले नाही. केंद्र सरकार आपल्या अंदाजपत्रकातील फक्त ४% रक्कम शेतीवर खर्च करते तर महाराष्ट्र सरकार फक्त ३% च्या जवळपास अंदाजपत्रकीय रक्कम शेतीवर खर्च करते. अस्मानी व सुलतानी संकटामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. भारताची लोकसंख्या वाढत असल्याने लोकांची अन्नपदार्थांची मागणी वाढत आहे. त्यामुळे आजच्या काळात अन्नपदार्थांची भाववाढ होत आहे. तसेच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डी. सुब्बाराव यांनी Inflation Bond ची कल्पना मांडली आहे. या बाँडमधील गुंतवणूक जसजशी भाववाढ वाढत जाईल त्या प्रमाणात गुंतवणूक व व्याजदर वाढत जाऊन गुंतवणूकदारांचे उत्पन्न वाढेल व भाववाढीमुळे लोकांचे होणारे नुकसान टळून लोकांना दिलासा मिळेल अशी अपेक्षा आहे.

रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरणातील CRR, कर्जरोख्यांची खरेदी विक्री - कायदेशिर रोखता निधी गुणोत्तर, रेपो व रिव्हर्स् रेपो दर ही साधने चलन क्षेत्रापुरतीच मर्यादित ठरतात. भाववाढीला कारणीभूत ठरणाऱ्या इतर क्षेत्रातील घटकांवर प्रभाव टाकू शकत नाहीत. त्यामुळे रिझर्व्ह बँक भारतातील भाववाढ विशिष्ट मर्यादेत सिमित करू शकली नाही. थोडक्यात भाववाढ नियंत्रणासाठी रिझर्व्ह बँकेच्या चलन धोरणावर मर्यादा पडतात. म्हणून आजची अन्नधान्य व अन्नपदार्थ, भाज्या, फळे वगैरे शेती क्षेत्राशी निगडीत वस्तूंची भाववाढ रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने लक्ष देऊन शेती विकासाला चालना द्यावी अन्यथा भारताला भविष्यात देखील भाववाढीला तोंड द्यावे लागेल. १२३४५६७

**संदर्भ :**


१. 'R.Dutt and KPM' Sundharam, *"Indian Economy"* S. Chand & Co. - New Delhi 2011.
२. *Economic Survey of India* - 2009-10
३. *Economic Survey of India* - 2010-11
४. 'R. Sthanumoorthy' *"Maharashtra Economy"*, The IDFAI University, Press Hyderbad - 2006.
५. Economic Times - Various Issues in June to Sept. 2011
६. Times of India - Various Issues June to Sept. 2011
७. RBI Bulletin- Various Issues.
८. दै. *लोकसत्ता* - ३ सप्टेंबर २०११

# केन्द्रीय अर्थसंकल्प २०१३-१४: एक दृष्टीक्षेप

**संजय तुपे, नाशिक,**
विभाग प्रमुख, बँकींग अॅण्ड फायनान्स,
बी.वाय.के.वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९९६०२७८८९९
ई-मेल: bomsanjay@gmail.com

जागतिक व देशांतर्गत आर्थिक घसरणीच्या पार्श्वभूमीवर २०१३-१४ चा अर्थसंकल्प अर्थव्यवस्थेला संजीवनी देणारा नक्कीच नसून तो २०१४ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूका डोळ्यासमोर ठेऊन सादर केलेला राजकीय अर्थसंकल्प निश्चितच आहे असे अनुमान काढता येईल. २०१३-१४ चा अर्थसंकल्प सादर करताना हुशारीने अर्थमंत्र्यांनी मतदान बँक गृहीत धरून देशातील महिला वर्ग, युवक व ग्रामीण जनता व शहरातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना खूष करण्याचा प्रयत्न केला आहे. महिलांच्या सुरक्षेबाबत 'निर्भया फंड' रु.१००० कोटींची तरतूद करून मुली व महिलांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न योग्यच म्हणावा लागेल. सर्वात जास्त तरुण असलेल्या लोकसंख्येच्या देशात तरुणांना रोजगार देणे व त्यांना रोजगारक्षम करणे यासाठी रुपये १००० कोटींची तरतूद योग्य असली तरी त्यात राजकारण जास्त दिसते आहे. कॅश ट्रान्स्फर योजना प्रायोगिक तत्त्वांवर सध्या ५१ जिल्ह्यात सुरू करण्यात आली असून पुढील काही महिन्यात योजनेची व्याप्ती उरलेल्या जिल्ह्यात सुरू करून 'आपला पैसा पुन्हा आपल्याच हातात' या निवडणुकीच्या घोषवाक्याने लाभार्थींच्या थेट खात्यात जाईल व सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गळती थांबेल अशा भव्य आशावादाने प्रेरित झालेल्या युपीए सरकारचे भवितव्य जून २०१४ मध्ये निश्चित होईल. महिला विकास आरोग्य व बालक विकास कार्यक्रमांसाठी भरघोस तरतूद १ लाख ७४ हजार कोटी रुपये करण्यात आली असली तरी या कार्यक्रमांचे यश राज्य सरकारकडून होणाऱ्या अंमलबजावणीवर अवलंबून आहे. महिलांसाठी स्वतंत्र बँक सुरू करण्यासाठी केलेली १००० कोटी रुपयांची तरतूद योग्य असली तरी अशा बँकेची गरज किती? यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे. आरोग्य आणि

शिक्षण या दोन प्राथमिक गरजांची व्याप्ती वाढविण्याचा एक भाग म्हणून नवीन राष्ट्रीय हेल्थ मिशनसाठी केलेली २१ हजार कोटी रुपयांची तरतूद व राष्ट्रीय आरोग्य शिक्षण व संशोधन संस्थांची अपुरी संख्या लक्षात घेऊन सहा नवीन संस्था सुरू करण्याचे प्रयत्न योग्यच आहेत. मनुष्यबळ सक्षमीकरण व शिक्षणासाठी भरीव तरतूद करताना मागील वर्षापेक्षा १७% जास्त खर्च करण्याचा इरादा आहे. सर्व शिक्षण अभियान, माध्यमिक शिक्षा अभियान, मागासलेल्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप्स, मध्यान्ह खाद्य योजना व नालंदा विद्यापीठाला अतिउत्कृष्ट विद्यापीठ करण्याचे प्रयत्न योग्य असले तरी शालेय व माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचे सुतोवाच अर्थसंकल्पात नाही. आज मितीला ६०% पेक्षा अधिक शालेय विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही.

### ग्रामविकास:

ग्रामीण विकास हा अर्थव्यवस्थेच्या नीतिचा एक अविभाज्य भाग आहे. भारतातील जवळपास ८०% लोकांचे ग्रामीण भागातील वास्तव्य गृहीत धरून ग्रामीण विकासाला झुकते माप देताना पिण्याचे पाणी, मलनिस्सारण, पाणी शुद्धीकरण, बालकांचे कुपोषण कमी करणे इत्यादी योजना नवीन नाहीत. मात्र ग्रामीण भागातील शाश्वत पिण्याचे पाणी वर्षभर मिळेल याची खात्री देता येत नाही. ग्रामीण विकास कार्यक्रम अंमलबजावणीसाठी जवळपास ८० हजार कोटी रुपयांची तरतूद असली तरी ग्रामीण भागाचे प्रश्न सुटेल अशी आशा करावयास नको. प्रशासनाच्या सुधारणा, सरकारी नोकरांची गल्लेभरू वृत्ती व राजकारण्यांची घबाड गोळा करण्याची प्रवृत्ती यामुळे ग्रामीण विकासाचा मुद्दा अनेक वर्ष केवळ तरतुदी करून सुटू शकला नाही. त्यामुळे या वर्षीच्या अर्थसंकल्पातून तो सुटेल अशी भाबडी आशा करावयास नको.

### कृषी विकास:

कृषी विकासाला चालना देणाऱ्या भांडवली योजनांची गरज असताना केवळ जुजबी तरतुदी करून मा. अर्थमंत्र्यांनी कृषीक्षेत्राकडे साफ दुर्लक्ष केलेले दिसते. कृषी वित्त पुरवठ्याच्या तरतुदीपोटी ७ लाख कोटी रुपये राखून ठेवले असले तरी एकंदर बेसेल तीनची अंमलबजावणी, एन.पी.ए. कमी करण्याच्या प्रयत्नात बँकां कृषी व्यवसायाला सक्षमपणे कर्जपुरवठा करतील याबद्दल शंकाच आहे. देशातील प्रमुख राष्ट्रीय बँकांना भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी १४ हजार कोटी देण्याची घोषणा राष्ट्रीय बँकांना बळकटी आणेल. देशातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांना एटीएम सुरू करण्याचा प्रयत्न ग्रामीण भागातील रोखतेचे प्रमाण वाढविण्याबरोबर बँक नोकरवर्गावरील ताण कमी करण्यास मदत करील. पूर्वेकडील राज्यात हरितक्रांतीसाठी केलेली १००१ कोटीची तरतूद,पीक व्यवस्थापन व संरक्षणासाठी संशोधन संस्थांची स्थापना, बायोटेक्नॉलॉजी संशोधन संस्था, अवर्षण प्रवणक्षेत्र विकास कार्यक्रम, राष्ट्रीय खाद्यान्न कोष इत्यादी योजना कृषी विकासाला पूरक असल्या तरी पाणी संचय व कालवे विकासाच्या योजनांचा अभाव अर्थसंकल्पात दिसतो.

### पायाभूत सुविधा निर्माण:

अर्थव्यवस्थेला संजीवनी प्राप्त करून देणाऱ्या दोन प्रमुख क्षेत्रांपैकी पायाभूत सुविधा क्षेत्राची घोर निराशा केली असली तरी काही

किरकोळ प्रयत्न केलेले दिसतात. त्यात प्रामुख्याने जवाहरलाल नेहरू शहरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत १४ हजार कोटी रुपयांची मदत देशातील शहरांच्या पायाभूत निर्माण वर खर्च केले जाणार आहेत. या रकमेतील प्रमुख हिस्सा शहरी प्रवासी वाहतूक सक्षमीकरणासाठी खर्च करून १०,००० पेक्षा जास्त बसेस पहाडी राज्यांमध्ये चालू करण्याचे प्रयत्न योग्य वाटतात. अर्थात प्रगत राज्यातील प्रमुख शहरांचे वाहतुकीचे प्रश्न बिकट होत असताना लोकसंख्या कमी असलेल्या राज्यांमध्ये बसेस चालविणे योग्य ठरणार नाही. पायाभूत सुविधामध्ये गुंतवणूक होण्यासाठी ५० हजार कोटी रुपयांचे करमाफ कर्जरोखे, ग्रामीण पायाभूत सुविधा महामंडळाचे भांडवल २० हजार कोटी वाढविणे, कृषी मालाची होणारी ३०% पेक्षा जास्त नासाडी रोखण्यासाठी ५ हजार कोटीची तरतूद, रस्ते प्राधिकरणाची स्थापना व ३००० किलोमीटर पर्यंतचे रस्तेबांधणी इत्यादी तरतुदी पायाभूत सुविधेला चालना देण्यास पुरेशा नाहीत. वीज, कोळसा, जहाज, बंदर, विमान वाहतूक इत्यादी क्षेत्रातील गुंतवणूक वाढीसाठी नवीन योजना जाहीर केल्या नाहीत. विमान वाहतूक क्षेत्रात ४९% पर्यंत परकीय भांडवलांची परवानगी यापूर्वीच देऊन विमान वाहतूक क्षेत्र सक्षम करण्याचे ठरविले आहे. इंडस्ट्रीयल कॉरिडॉर स्थापन करण्याचे सुतोवाच यापूर्वीच्या अर्थसंकल्पात केलेले होते. पुन्हा त्यावर चर्चा करून आपण नव्याने काहीतरी करतो आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे.

**उद्योग क्षेत्र विकास:**

लघु व मध्यम उद्योगांच्या विकासासाठी सिडबी या संस्थेचे पुनर्वित्त क्षमता दहा हजार कोटी रुपयांनी वाढविण्यात आली आहे. इंडिया मायक्रो वित्त फायनान्स महामंडळासाठी १०० कोटी रुपयांचे भागभांडवल देण्यात येऊन लघुवित्त चळवळ सक्षम करण्याचा प्रयत्न जुजबी वाटतो. वस्त्रपार्क उभारणी, तंत्रज्ञान पार्क, दुमरूस डिझाईनची स्थापना इत्यादी उपक्रम नव्याने करण्याचे सांगितले असले तरी पूर्वी याबाबत प्रयत्न झालेले आहेत. निर्यात वाढीसाठी कुठलीही ठोस योजना जाहीर करण्यात आलेली नाही.

भांडवल बाजार व वित्त क्षेत्र बळकटीकरण व विकासाचे प्रयत्न किरकोळ असून याबाबत सरकार अजून करू शकले असते. पोस्टल बँक, कोअर बँकींग करण्याची योजना योग्य असली तरी पोस्टातील कर्मचारी वर्ग, जागा, तंत्रज्ञानाच्या अडचणीमुळे पोस्टात कोअर बँकींग कितपत यशस्वी होईल याबद्दल शंकाच वाटते. परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांना झुकते माप देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. चालू खात्यावरील खर्चाशी मेळ घालताना होणारी दमछाक कमी करण्याचा प्रयत्न एफआयआय, एफडीआय व इसीबी करीत असल्याने अर्थमंत्र्यांनी त्यांचे लाड पुरविलेले दिसतात. लघु व मध्यम उद्योग त्यांच्या समभागाची नोंदणी एस एम ई शेअर बाजारात घेण्यासाठी त्यांना सार्वजनिक भाग भांडवल इश्यु आणण्याबाबत सूट दिली आहे. ही बाब त्यांच्या विकासाला पोषक असली तरी लघु गुंतवणूकदारांच्या दृष्टीने हितावह नाही. पंचायत राज, नभोवाणी बाबतच्या तरतुदी वरवरच्या वाटतात.

**समग्र व्यवस्थापन:**

यूपीए सरकारचा हा शेवटचा अर्थसंकल्प

असताना मा. अर्थमंत्र्यांनी नोकरदार, गुंतवणूकदार व उद्योग जगताला खूष करणारा अर्थसंकल्प देण्याची संधी गमावली व यूपीएच्या २०१४ च्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. आर्थिक अडचणी व जागतिक आर्थिक मंदी यामुळे काही तरी वेगळे करण्यास वित्तमंत्र्यांना वाव नव्हता. राजकोषीय तूट जी. डी. पी. च्या ५.२% पर्यंत सिमीत ठेवली असली तरी आकडेवारीबद्दल साशंकता आहे. कारण तेल कंपन्यांना सबसिडीपोटी द्यावयाच्या रकमेची तरतूद २०१२-१३ च्या (ॲक्च्युअल बजेट) मध्ये नाही. घसरता गुंतवणूक दर, रोडावलेली व्यक्तीगत बचतक्षमता व खर्च क्षमता गृहीत धरता कर संकलनाचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होणार नाही. असे असताना २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात ४.८% राजकोषीय तुटीचा अंदाज करणे केवळ आकड्यांचा खेळ वाटतो याचबरोबर योजना व भांडवली खर्च कमी करण्याचा सरकारचा इरादा यातून सिद्ध होतो. मागील वर्षात (२०१२-१३) मध्ये जवळपास ३०% योजना खर्च कमी करून पुन्हा तो चालू वर्षासाठी २९.४% वाढविला असे स्पष्टीकरण देणे यात सरकारची विश्वासार्हता पणाला लागणार आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांची पुनर्रचना करण्याचे धाडस अर्थमंत्री दाखवू शकले नाहीत, ते केवळ अर्थव्यवस्थेची विकास रुळावरून घसरलेल्या गाडीमुळे अन्यथा नोकरदार वर्गाला खूष करण्याची संधी त्यांनी सोडली नसती. महागाईचा दर नियंत्रणात आल्याची ग्वाही मंत्रीमहोदय देत असली तरी अन्नधान्य वस्तुंच्या किंमती, खाद्यतेल, इंधन, जळण, प्रवास इत्यादींच्या किंमती भडकल्यामुळे आम आदमी व मध्यमवर्गीयांचे जगणे कष्टप्राय झाले आहे. येणाऱ्या वर्षात किंमती नियंत्रणात आणून सामान्यांच्या जगण्याला हातभार लावला तरच आम आदमी यूपीए ला हात देऊ शकेल, अन्यथा दोन हात दूर राहण्याचा प्रयत्न करील. एकूणच निराश व मळभ आलेल्या आर्थिक वातावरणात ८%नी अर्थव्यवस्था वाढेल असा युक्तीवाद करणे पोकळ आशावाद वाटतो.

संदर्भ:


१) मिनिस्ट्री ऑफ फायनान्स (२०१३) *इंडियन बजेट २०१३-१४*, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स, न्यू दिल्ली.

२) मिनिस्ट्री ऑफ फायनान्स (२०१३) *इंडियन इकॉनॉमिक सर्व्हे २०१३*, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स, न्यू दिल्ली.

३) दी इकॉनॉमिक्स टाईम्स, (२०१३) *दी इकॉनॉमिक टाईम्स*, मुंबई, १ मार्च, २०१३.

# एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे कुपोषण निर्मूलनातील योगदान


**साबळे एन. एस., संगमनेर,**
संगमनेर महाविद्यालय, जिल्हा अहमदनगर.
भ्रमणध्वनी: ७५८८६०६६५५

**सापनर बी. एन., नाशिक,**
के.टी.एच.एम. महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ९४२२२७११०८


स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून केलेल्या विविध प्रयत्नांचे फलस्वरूप भारताने विविध क्षेत्रात प्रगतीचा आलेख उंचावत नेला आहे असे असले तरी बालकल्याण संबंधीच्या विविध समस्या अद्यापही बऱ्याच मोठया प्रमाणात आहेत. यामध्ये प्रामुख्याने कुपोषण, उपासमार, बालकांचे आजार, अनारोग्य, 'अ' जीवनसत्वाचा अभाव आणि मुलांची शाळेतील गळती इत्यादींचा समावेश होतो.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने माता व बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी व कल्याणासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबविले आहेत. असे असतांना देखील त्यांच्या विकासात अनेक समस्या अद्यापही दिसून येत आहेत. त्यामुळे भावी शिक्षणाचा कणा समजल्या जाणाऱ्या पूर्वप्राथमिक शिक्षणाचा पाया अधिक मजबूत करण्यासाठी तसेच ६ वर्षाखालील मुलांचा अत्यंतिक कुपोषणाचा व सौम्य कुपोषणाचा दर कमी करणे, देशाच्या मानवी साधनसंपदेचे संवर्धन करणे, कोवळ्या बालवयातच मुलांच्या शरीराच्या, मनाच्या आणि सामाजिक जाणीवेच्या विकासाचा भरभक्कम पाया घालणे, अर्भक मृत्यू, बालमृत्यू, मुलांचे आजार, विकृतीचे प्रमाण कमी करणे आणि शाळापूर्व शिक्षणातील मुलांची गळती कमी करणे, मुलांच्या आरोग्याकडे व पोषणाकडे विशेष लक्ष देणे, पूरक पोषक आहाराचा पुरवठा करणे, गरोदर व स्तनदा माता यांना पोषण व आरोग्य शिक्षण मिळवून देणे व मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे

याशिवाय ११ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींना पोषण व आरोग्य विषयक शिक्षण देणे, मातांचे समक्षीकरण घडवून आणणे त्याचबरोबर बालविकासाच्या क्षेत्रामध्ये जनतेचा सामुहिक सहभाग लाभावा आणि बाल विकासाच्या कार्यक्रमाला स्वयंपूर्णता प्राप्त व्हावी या दृष्टीने चालना देणे या विविध हेतूने पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये दिनांक २ ऑक्टोबर १९७५ रोजी एक अत्यंत महत्वाकांक्षी व सर्व समावेशक अशी एकात्मिक बाल विकास सेवा योजना ३३ प्रकल्प प्रायोगिक तत्वावर (ग्रामीण १९ प्रकल्प, आदिवासी व डोंगराळ विभागात १० आणि शहरी विभागात ४ प्रकल्प) निरनिराळया राज्यात सुरू करण्यात येऊन ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींच्या विकासासाठी, कल्याणासाठी विविध सेवा पुरविण्यात येत आहेत. आज संपूर्ण भारतात ही योजना राबविली जात आहे.

२०११ मध्ये Citizens alliance against malnutration च्या विनंतीवरून Naandi Foundation ने देशातील ९ राज्यातील ११२ जिल्ह्याचे सर्वेक्षण करून भूक आणि कुपोषण या विषयावर अहवाल तयार करण्यात आला. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते १० जानेवारी २०१२ मध्ये दिल्ली येथे जाहीर करण्यात आला. पंतप्रधानांच्या मते, एकीकडे राष्ट्रीय आर्थिक विकासाचा दर आणि अन्नधान्याचे उत्पादन वाढत असतांना दुसरीकडे देशात कोटयवधी बालके कुपोषित आहेत. देशातील कुपोषणाचा दर गेल्या सात वर्षात ५३ टक्यावरून ४२ टक्यावर आला आहे. कुपोषणाची टक्केवारी ११ एवढी घसरली आहे. कुपोषण कमी होण्याचा वार्षिक सरासरी दर १.५ टक्के एवढा आहे. असे असले तरी आजही कुपोषणाचे प्रमाण भारतात फार मोठे आहे. कुपोषित बालकांत मुलींचे प्रमाण अधिक असून निरक्षर मातांची ४५ टक्के मुले तर शिक्षित मातांची २७ टक्के मुले कुपोषित आहेत. भारतातील कुपोषित मुलांची टक्केवारी आफ्रिकन देशांच्या (२२ टक्के) दुप्पट असून कुपोषित बालकांच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

प्रस्तुत शोध निबंधाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

१) कुपोषण संकल्पनेचे अध्ययन करणे.
२) महाराष्ट्र राज्यातील कुपोषण स्थितीचा अभ्यास करणे.
३) अहमदनगर जिल्ह्यातील कुपोषण स्थितीचा अभ्यास करणे.
४) महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्ह्यातील कुपोषण स्थितीचे तुलनात्मक विश्लेषण करणे.
५) महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्हा यांच्या कुपोषण विषयक अध्ययनावरून काही तथ्यांचा शोध घेणे.
६) कुपोषण निर्मूलनासाठी काही महत्वपूर्ण उपाययोजना सुचविणे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन निबंध तयार करतांना संशोधकांनी कुपोषणाच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रकाशित साहित्यांचा (संदर्भ ग्रंथ) दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेतला आहे.

कुपोषणाची संकल्पना :-

कुपोषण ही भारतातील बहुव्यापी सामाजिक समस्या आहे. ही समस्या प्रामुख्याने

गरिबी व दारिद्र्य, बेकारी, बालविवाह, दोन मुलांमधील अंतर, साक्षरता दर, स्त्री साक्षरता, आर्थिक व शैक्षणिक स्थिती, सामाजिक चालीरिती, स्थलांतर, अंधश्रध्दा, रूढी व परंपरा, अज्ञान, शेती प्रधान संस्कृती, अन्नधान्य उत्पादन व वितरण, सकस आहार, पायाभूत सेवा सुविधा आणि मोठे कुटूंब या बाबींवर अवलंबून असते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, "विविध प्रमाणात प्रथिने व उष्मांक मुलांमध्ये वाढत्या वयात कमी पडत गेली तर होणारी मनाची व पूर्ण शरीराची स्थिती किंवा अवस्था म्हणजे कुपोषण होय किंवा सर्व अन्नघटक योग्य प्रमाणात, योग्य तऱ्हेने आणि योग्य वेळी न मिळणे म्हणजे कुपोषण होय."

सर्वसाधारणपणे ६ वर्ष वयोगटापर्यंतची बालके कुपोषित आढळतात. जेव्हा बालकांना शरीराला आवश्यक एवढे अन्न, पुरेसे अन्न मिळत नसेल तर त्यांची शारीरिक वाढ खुंटते. तेव्हा त्यांची स्थिती कुपोषणाची वा अपपोषणाची असते. कुपोषणामुळे बालकांचे आरोग्य, स्वास्थ्य, शिक्षण, शारीरिक, नैतिक आणि सामाजिक विकासावर दुष्परिणाम होतो. आजचे बालके उद्याचे देशाचे नागरिक आहेत. याचे महत्व लक्षात घेता कुपोषणाचे प्रमाण कमी करणे गरजेचे आहे.

भारतीय बाल रोग तज्ञांच्या संघटनेने कुपोषण श्रेणीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे केले आहे. त्यासाठी पुढील सुत्राचा वापर केला जातो. बाळाचे त्याच्या वयानुसार असलेले वजन - टक्के

$$= \frac{\text{बाळाचे खरे वजन}}{\text{बाळाच्या वयानुसार असावयास हवे ते वजन}} \times १००$$

वरील सुत्रानुसार

१) ८० टक्के पेक्षा जास्त वजन असेल तर बाळ कुपोषित नाही म्हणजेच सर्वसाधारण बालक
२) ७१ ते ८० टक्के वजन असेल तर कुपोषण श्रेणी एक
३) ६१ ते ७० टक्के वजन असेल तर कुपोषण श्रेणी दोन
४) ५१ ते ६० टक्के वजन असेल तर कुपोषण श्रेणी तीन
५) ५० वा त्यापेक्षा कमी टक्के वजन असल्यास कुपोषण श्रेणी चार. सन २०१० -११ या वर्षापासून कुपोषण श्रेणीचे तीन गटात वर्गीकरण केले जात आहे. त्यात प्रामुख्याने सर्वसाधारण बालके, मध्यम कुपोषित व तीव्र कुपोषित इ.

महाराष्ट्र राज्यातील कुपोषणाची स्थिती :-

सन २००१-०२ ते २०१०-११ या कालावधीतील महाराष्ट्र राज्यातील कुपोषणाची स्थिती पुढे तक्ता क्र. १ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र. १ मध्ये महाराष्ट्र राज्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील विविध श्रेणीतील बालकांची टक्केवारी दर्शविली आहे. अभ्यास कालावधीच्या सुरूवातीला म्हणजेच २००१-०२ मध्ये कुपोषित नसलेल्या सर्वसाधारण बालकांचे प्रमाण ४२.३८ टक्के इतके होते. तर अभ्यासाच्या मध्यापर्यंत २००५-०६ ते ५१.७२ टक्के होते आणि सन २००९-१० पर्यंत ६३.३५ टक्क्यांपर्यंत वाढले आणि अभ्यास कालावधीच्या अखेरीस म्हणजे २०१०-११ मध्ये सर्वसाधारण बालकांचे प्रमाण ७६.५८ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. वरील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, सर्वसाधारण म्हणजेच कुपोषित नसलेल्या बालकांच्या प्रमाणात वाढ करण्यात योजनेला चांगले यश प्राप्त झाले आहे.

## तक्ता क्र. १

## महाराष्ट्र राज्यातील विविध कुपोषण श्रेणीमधील बालकांची एकूण संख्या

(० ते ६ वर्षे वयोगट)

(२००१-०२ ते २०१०-११)

| अ. नं. | तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण बालके | २०६४८५८ (४२.३८) | २७०७४८१ (४५.५३) | २९९७४३४ (४६.५०) | ३१३५८५४ (४७.१८) | ३८८७२२३ (५१.७२) | ४००३८२८ (५४.५३) | ४३३२१३१ (५७.०९) | ४६७५०५१ (६०.७२) | ४८८६७७४ (६३.३५) | ४५५२२८३ (७६.५८) |
| २ | श्रेणी १ | १९८९९०० (३९.८५) | २३०५२२० (३८.७७) | २५६६५८६ (३८.२७) | २५४०५०८ (३८.२३) | २८५०६७७ (३७.९३) | २६५२६७३ (३६.१३) | २६४३५२१ (३४.८४) | २५०५०१४ (३२.५३) | २३८७३३८ (३०.१५) | १२३६११६ (२०.८०) |
| ३ | श्रेणी २ | ८४५१७२ (१७.३६) | ९१५१४८ (१५.३९) | ९६२५७७ (१४.९३) | ९४४५३७ (१४.२१) | ७६१०५४ (१०.१३) | ६७०६११ (९.१३) | ५९८१८६ (७.८८) | ५०९७६९ (६.६२) | ४३१०४६ (५.५९) | १५६०४४ (२.६२) |
| ४ | श्रेणी ३ व ४ | २००६५ (०.४१) | १८२२१ (०.३१) | १९३४२ (०.३०) | २५१८४ (०.३८) | १७२१८ (०.२२) | १५५६३ (०.२१) | १३१४५ (०.१७) | ९८८८ (०.१३) | ८६११ (०.११) | - |
| | एकूण | ४८७२७९५ (१००) | ५९४६०७८ (१००) | ६४८५१३१ (१००) | ६६४६०८३ (१००) | ७५१६१७४ (१००) | ७३४२७६३ (१००) | ७५८७०७४ (१००) | ७६११७२२ (१००) | ७७१३७६१ (१००) | ५९४७५२३ (१००) |

*स्त्रोत: मासिक प्रगती अहवाल मार्च २००१ -०२ ते २०१०-११ format II, ICDS महाराष्ट्र राज्य वेबसाईट*

*टिप:* १. *कंसातील अंक एकूणाशी कुपोषण श्रेणीचे शेकडा प्रमाण दर्शवितात.*

२. *२०१०-११ - १) सर्वसाधारण बालके, २) मध्यम कुपोषित बालके, ३) अधिक कुपोषित बालके.*

३. *२००१- ०२ ते २००९-१० - ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके*

४. *२०१०- ११ पासून पुढे - ० ते ५ वर्षे वयोगटातील बालके*

महाराष्ट्र राज्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील कुपोषण श्रेणी एकच्या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, २००१-०२ मध्ये ३९.८५ टक्के बालके कुपोषण श्रेणी एकमध्ये होती. २००५-०६ पर्यंत हे प्रमाण ३७.९३ टक्के तर २००९-१० मध्ये कुपोषण श्रेणी एकमध्ये ३०.१५ टक्क्यांपर्यंत कमी झाले. यावरून असेही निदर्शनास येते की, महाराष्ट्र राज्यात कुपोषण श्रेणी एकमध्ये घट करण्यात फार कमी प्रमाणात यश प्राप्त झाले आहे.

वरील तक्त्यातील कुपोषण श्रेणी दोनचा विचार केल्यास असे दिसून येते की, महाराष्ट्र

राज्यात सन २००१-०२ या वर्षात सुरूवातीला श्रेणी दोनमध्ये १७.३६ टक्के बालके होती. २००५-०६ मध्ये १०.१३ टक्के तर २००९-१० मध्ये ५.५९ टक्क्यांपर्यंत कमी झाले. यावरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्र राज्यात कुपोषण श्रेणी दोनमध्ये घट करण्यात चांगले यश योजनेला मिळाले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या कुपोषण श्रेणी ३ व ४ चा विचार करता सन २००१ -०२ मध्ये ०.४१ टक्के बालके होती तर २००५-०६ मध्ये ०.२२ टक्के आणि २००९ -१० पर्यंत ०.११ टक्क्यांपर्यंत कमी झाले. वरील आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, कुपोषण श्रेणी ३ व ४

## तक्ता क्र. २
## अहमदनगर जिल्ह्यातील विविध कुपोषण श्रेणीमधील बालकांची एकूण संख्या

(मार्च २००१-०२ ते २०१०-११)

| अ. नं. | तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण बालके | १२५१८१ (५०.६३) | १७२७०१ (५३.२४) | १८४६५८ (५४.०७) | १८८७८८ (५४.२६) | २६१८७४ (६०.१०) | २२८८०० (५९.२४) | २४३१८१ (६०.६२) | २५६११० (६४.१२) | २७५४०० (६७.५१) | २८१५५३ (८४.७५) |
| २ | श्रेणी १ | ९४३५९ (३८.१६) | ११९११४ (३६.७२) | १२६९०८ (३७.१६) | १२८२११ (३६.८७) | १५११२२ (३४.६८) | १३४४३८ (३४.८१) | १३३७७१ (३३.३५) | १२०४२२ (३०.५१) | ११६३८६ (२८.५३) | ४७३३३ (१३.८५) |
| ३ | श्रेणी २ | २७२२५ (११.०१) | ३२१५६ (९.९१) | २९४८४ (८.६३) | ३०३७८ (८.७३) | २२३५७ (५.१३) | २२२४७ (५.७६) | २३२८५ (५.८०) | १७५२५ (४.४४) | १५८४२ (३.८८) | ४७६५ (१.३९) |
| ४ | श्रेणी ३ व ४ | ५०५ (०.२०) | ३८८ (०.१२) | ४४१ (०.१३) | ४७५ (०.१४) | ४०० (०.०९) | ७४४ (०.१९) | ९०८ (०.२३) | ५०३ (०.१३) | ३२१ (०.०८) | - |
| | एकूण | २४७२७० (१००) | ३२४३५९ (१००) | ३४१४९१ (१००) | ३४७९३२ (१००) | ४३५७५३ (१००) | ३७७८०३ (१००) | ४०११४५ (१००) | ३९४६४० (१००) | ४०७९४९ (१००) | ३४१६५१ (१००) |

*स्त्रोत : मासिक प्रगती अहवाल मार्च २००१ -०२ ते २०१०-११ ICDS महाराष्ट्र राज्य वेबसाईट*

*टिप :*
*१. कंसातील अंक एकूणाशी कुपोषण श्रेणीचे शेकडा प्रमाण दर्शवितात.*
*२. २०१०-११   १) सर्वसाधारण बालके २) मध्यम कुपोषित बालके ३) अधिक कुपोषित बालके*
*३. २००१-०२ ते २००९-१०- ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके*
*४. २०१०-११ पासून पुढे - ० ते ५ वर्षे वयोगटातील बालके.*

मधील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे कुपोषण कमी करण्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेला लक्षणीय यश प्राप्त झाले आहे. अभ्यास कालावधीच्या अखेरीस म्हणजेच २०१०-११ या आर्थिक वर्षामध्ये ० ते ५ वर्षे वयोगट विचारात घेऊन कुपोषण श्रेणीचे तीन गटामध्ये मापन केले जात आहे. वरील कालावधीत महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण बालकांचे प्रमाण ७६.५८% इतके होते. तर मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण २०.८०% आणि अधिक कुपोषित बालकांचे प्रमाण २.६२% ऐवढे होते. २०१०-११ चे वरील आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, सर्वसाधारण बालकांची संख्या चांगली असून मध्यम कुपोषित व अधिक कुपोषित बालकांचे प्रमाण कमी असलेले दिसून येते.

**अहमदनगर जिल्ह्यातील कुपोषण स्थिती:**

सन २००१-०२ ते २०१०-११ या कालावधीतील अहमदनगर जिल्ह्यातील कुपोषणाची स्थिती तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविली आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील विविध कुपोषण श्रेणीतील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची एकूण संख्या व टक्केवारी वरील तक्ता क्र. २ मध्ये दर्शविलेली आहे. वरील आकडेवारी वरून असे निदर्शनास येते की, सन २००१-०२ या वर्षात ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची एकूण संख्या २,४७,२७० इतकी होती. त्यापैकी सर्वसाधारण म्हणजेच कुपोषित नसलेल्या बालकांची संख्या १,२५,१८१ एवढी होती. तर कुपोषण श्रेणी एक मध्ये ९४,३५९ बालके, श्रेणी दोनमध्ये २७,२२५ बालके आणि श्रेणी तीन व चारमध्ये एकूण ५०५ बालके होती. अभ्यास कालावधीच्या मध्यापर्यंत २००५-०६ मध्ये ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची एकूण संख्या ४,३५,७५३ इतकी होती. त्यापैकी सर्वसाधारण बालकांची संख्या २,६१,८७४ एवढी होती. तर कुपोषण श्रेणी एकमध्ये १,५१,१२२ श्रेणी दोन मध्ये २२,३५७ बालके आणि श्रेणी तीन व चारमध्ये ४०० इतकी होती.

२००९-१० या आर्थिक वर्षात ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची एकूण संख्या ४,०७,९४९ इतकी होती. त्यापैकी सर्वसाधारण बालकांची संख्या,. २,७५,४०० एवढी होती तर श्रेणी एक मध्ये १,१६,३८६ बालके, 'श्रेणी दोनमध्ये १५,८४२ बालके आणि श्रेणी तीन व चारमध्ये ३२१ बालके होती.

सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून कुपोषण श्रेणीचे मापन तीन गटामध्ये केले जात आहे आणि ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांचा समावेश केला आहे. या नवीन कुपोषण श्रेणीमध्ये प्रामुख्याने, सर्वसाधारण बालके, मध्यम व अधिक कुपोषित बालके यांचा समावेश आहे. वरील कालावधीत ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण बालकांची संख्या ३,४१,६५१ इतकी होती. त्यापैकी सर्वसाधारण बालकांची संख्या २,८९,५५३ एवढी होती तर मध्यम कुपोषित बालके ४७,३३३ आणि अधिक कुपोषित बालकांची संख्या ४,७६५ इतकी होती.

अहमदनगर जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील विविध कुपोषण श्रेणीतील बालकांच्या संख्येवरून असे निदर्शनास येते की, अभ्यास कालावधीच्या सुरूवातीला २००१-०२ मध्ये कुपोषित नसलेल्या सर्वसाधारण बालकांचे प्रमाण ५०-६३ टक्के इतके होते. अभ्यास

कालावधीच्या मध्यापर्यंत २००५-०६ ते ६०.१० टक्के झाले. सन २००९-१० मध्ये ६७.५१ टक्के तर अभ्यास कालावधीच्या शेवटच्या वर्षी म्हणजेच २०१०-११ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात ८४.७५ टक्के बालके ही सर्वसाधारण म्हणजे कुपोषित नसलेली होती. यावरून असेही स्पष्ट होते की, सर्वसाधारण बालकांच्या संख्येत अभ्यास कालावधीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील कुपोषण श्रेणी एकच्या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, २००१-०२ मध्ये ३८.१६ टक्के बालके कुपोषण श्रेणी एक मध्ये होती. २००५-०६ पर्यंत ही संख्या ३४.६८ टक्के तर २००९-१० मध्ये कुपोषण श्रेणी एकमध्ये २८.५३ टक्क्यांपर्यंत कमी झाली. यावरून असे स्पष्ट होते की, कुपोषण श्रेणी एकमधील बालकांची संख्या कमी करण्यात योजनेला बऱ्यापैकी यश आले आहे.

वरील तक्त्यातील कुपोषण श्रेणी दोनचा विचार केल्यास असे दिसून येते की, सन २००१-०२ या वर्षात श्रेणी दोनमध्ये जिल्ह्याच्या एकूण बालकांचा ११.०१ टक्के बालके होती तर २००५-०६ मध्ये ५.१३ टक्के आणि २००९-१० मध्ये ३.८८ टक्के बालके श्रेणी दोनमध्ये होती. यावरून श्रेणी दोन मधील कुपोषण कमी करण्यात योजनेला लक्षणीय यश आल्याचे निदर्शनास येते.

तसेच जिल्ह्याच्या ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या कुपोषण श्रेणी ३ व ४ चा विचार करता सन २००१-०२ मध्ये ०.२० टक्के बालके होती. तर २००५-०६ मध्ये ०.०९ टक्के आणि २००९-१० पर्यंत ०.०८ टक्के इतके कमी झाले. वरील आकडेवारीवरून असेही स्पष्ट

तक्ता क्र. ३

विविध कुपोषण श्रेणीमधील बालकांचे प्रमाण (२००१-०२ ते २०१०-११)

| अ. क्र. | तपशील | महाराष्ट्र राज्य | | | अहमदनगर जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००१-०२ | २००५-०६ | २०१०-११ | २००१-०२ | २००५-०६ | २०१०-११ |
| १ | सर्वसाधारण बालके | ४२.३८ | ५१.७२ | ७६.५८ | ५०.६३ | ६०.१० | ८४.७५ |
| २ | श्रेणी एक | ३९.८५ | ३७.९३ | २०.८० | ३८.१६ | ३४.६८ | १३.८५ |
| ३ | श्रेणी दोन | १७.३६ | १०.१३ | २.६२ | ११.०१ | ५.१३ | १.३९ |
| ४ | श्रेणी तीन व चार | ०.४१ | ०.२२ | - | ०.२० | ०.०९ | - |
| | एकूण | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

*स्रोतः मासिक प्रगती अहवाल, मार्च २००१-०२ ते २०१०-११, फॉरमॅट २ आय.सी.डी.एस. महाराष्ट्र राज्य, वेबसाईट*

*टिपः २०१० -११ पासून १) सर्वसाधारण बालके, २) मध्यम कुपोषित बालके आणि ३) अधिक कुपोषित बालके.*

होते की, कुपोषण श्रेणी ३ व ४ मधील बालकांचे कुपोषण कमी करण्यात योजनेला चांगले यश मिळाले आहे.

अभ्यासाच्या अखेर म्हणजे सन २०१०-११ मध्ये एकूण बालकांची संख्या ३,४१,६५१ इतकी होती. त्यापैकी सर्वसाधारण बालकांचे प्रमाण ८४.७५ टक्के इतके होते. तर मध्यम कुपोषित बालकांचे प्रमाण १३.८५ टक्के होते आणि अधिक कुपोषित बालकांचे प्रमाण १.३९ टक्के इतके झाले म्हणजेच वरील कालावधीत सर्वसाधारण बालकांचे प्रमाण सर्वाधिक असून मध्यम व अधिक कुपोषित बालकांचे प्रमाण कमी करण्यात यश प्राप्त झाले असल्याचे तक्ता क्र.२ वरून दिसून येते.

**महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्ह्यातील कुपोषण स्थितीची तुलना:**

तक्ता क्र. ३ मधील महाराष्ट्र राज्य आणि अहमदनगर जिल्ह्यातील विविध कुपोषण श्रेणीमधील बालकांचे सन २००१-०२ ते २०१०-११ या कालावधीत प्रमाणाचे अवलोकन केल्यास असे आढळते की, एकात्मिक बालविकास सेवा योजनेला सर्व साधारण बालकांचे प्रमाण वाढविण्यात मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले आहे. कारण महाराष्ट्र राज्यात २००१-०२ मध्ये सर्वसाधारण बालकांचे प्रमाण केवळ ४२.३८ टक्के इतके होते. ते २००५-०६ मध्ये ५१.७२ टक्के पर्यंत वाढले आहे. याच कालावधीत अहमदनगर जिल्ह्यात सर्वसाधारण बालकांचे प्रमाणात ५०.६३ टक्क्यावरून ६०.१० टक्के पर्यंत वाढ झाल्याचे आढळते.

कुपोषण श्रेणी एक ची स्थिती अवलोकन केल्यास असे आढळते की, महाराष्ट्र राज्यात सन २००१-०२ मध्ये ३९.८५ टक्के बालके या श्रेणीत होती. सन २००५-०६ पर्यंत हे प्रमाण ३७.९३ टक्के पर्यंत कमी झाले. याच कालावधीत अहमदनगर जिल्ह्यातील कुपोषण श्रेणी एक मधील बालकांची टक्केवारी ३८.१६ वरून ३४.६८ पर्यंत कमी करण्यात योजना यशस्वी झाली आहे.

वरील तक्त्यातील कुपोषण श्रेणी २ ची टक्केवारी लक्षात घेता असे आढळते की, सन २००१-०२ मध्ये महाराष्ट्रात या श्रेणीत कुपोषित बालकांचे प्रमाण १७.३६ टक्के इतके होते. यामध्ये २००५-०६ पर्यंत १०.१३ टक्के पर्यंत घट घडवून आणण्यात योजना यशस्वी झाली आहे. याच काळात अहमदनगर जिल्ह्यात देखील योजनेला मोठे यश मिळाले आहे. कारण श्रेणी दोन मधील कुपोषित बालकांचे प्रमाण ११.०१ टक्के वरून ५.१३ टक्के पर्यंत कमी झाले आहे.

कुपोषण श्रेणी ३ व ४ मध्ये सन २००१-०२ मध्ये महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्ह्यात एकूण बालकांच्या अनुक्रमे ०.४१ टक्के व ०.२० टक्के असे प्रमाण होते. तर २००५-०६ पर्यंत हे प्रमाण अनुक्रमे ०.२२ टक्के व ०.०९ टक्के पर्यंत कमी झाले आहे. या श्रेणीतील कुपोषणाचे निर्मूलन करण्यात महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्हा या दोहोंनाही यश प्राप्त झाले आहे.

सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून ० ते ५ वर्षे वयोगट विचारात घेऊन कुपोषण श्रेणीचे सर्वसाधारण बालके, मध्यम कुपोषित बालके आणि अधिक कुपोषित बालके अशी तीन गटात वर्गीकरण करण्यात येत आहे. सन २०१०-११ मध्ये महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण बालकांचे प्रमाण ७६.५२ टक्के इतके होते. मध्यम कुपोषित २०.८० टक्के तर अधिक कुपोषित बालकांचे

प्रमाण २.६२ टक्के इतके होते. वरील कालावधीत अहमदनगर जिल्ह्यात सर्वसाधारण बालकांचे प्रमाण ८४.७५ टक्के, मध्यम कुपोषित १३.८५ टक्के तर अधिक कुपोषित बालकांचे प्रमाण १.३९ टक्के इतके होते.

महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्हा यांचा तुलनात्मक विचार करता अहमदनगर जिल्ह्यातील योजनेची प्राप्ती अधिक समाधानकारक आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेला एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात लक्षणीय यश मिळाले आहे.

### कुपोषणाची प्रमुख कारणे:

कुपोषणाची कारणे ही लोकसंख्या, आरोग्य, लोकांचे जीवनमान आणि प्रशासकीय बाबतीत निगडीत आहेत. कुपोषण प्रामुख्याने पुढील कारणांमुळे घडून येते.

१) शिक्षणाचा अभाव, अज्ञान व निरक्षरता, दैववादी दृष्टिकोन आणि गैरसमज इ.

२) ६ वर्षापर्यंतच्या बालकांच्या आरोग्य, स्वच्छता व पोषणाकडे पालकांचे होणारे दुर्लक्ष.

३) बाल विवाहाची प्रथा, बाल माता, गरोदर व स्तनदा मातांच्या आरोग्य व पोषणाकडे कुटुंबाचे होणारे दुर्लक्ष.

४) प्रभावी संतती नियमनाचा अभाव व दोन बालकांमधील कमी अंतर आणि दैववादी दृष्टकोन इ.

५) ग्रामीण, डोंगरी व आदिवासी भागात अपूर्ण आरोग्य सेवा सुविधा आणि पिण्याचे दुषित पाणी इ.

६) निकषांपेक्षा कमी अंगणवाडी संख्या व अंगणवाडी क्षेत्राबाहेर जास्त लोकसंख्या.

७) अपुरा व कमी प्रतीचा आहार, आहाराविषयी व मुलांच्या पोषणाविषयी गैरसमजूती, अंधश्रध्दा व अपुरी माहिती.

८) दारिद्रय व बेकारीचे मोठे प्रमाण आणि स्थानिक रोजगाराचा अभाव.

### कुपोषण निर्मूलनासाठी उपाययोजना :

कुपोषण निर्मूलनासाठी पुढील प्रकारच्या उपाययोजना केल्या तर नक्कीच भारतातील कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. काही महत्वाच्या उपाययोजना पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) मुलांच्या वयाला अनुसरून योग्य त्या प्रमाणात सर्व अन्न घटकांचा समावेश असावा.

२) मुलांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी पोषण आहारात विविधता आणणे, आहारात पोषण मूल्यांचे प्रमाण वाढविणे आणि आहारात फळे, दुध, दुग्धजन्यपदार्थ, कडधान्ये यांचा प्राधान्याने समावेश करावा.

३) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाबरोबरच महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था, महिला मंडळे, बचत गट यांनी योग्य ती मदत करणे आवश्यक आहे.

४) ६ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा मातांचे १०० टक्के सर्वेक्षण करून एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या सर्व सेवा पुरविणे.

५) ग्रामीण, दुर्गम व आदिवासी भागात आरोग्य, शिक्षण व पिण्याचे शुध्द पाणी याविषयक सुविधात वाढ करणे आणि या भागातील जनतेमध्ये कुपोषण विषयक जनजागृती

करणे.

६) गाव पातळीवर अंगणवाडी केंद्राचे सक्षमीकरण घडवून आणणे.

७) बाल विवाहास प्रतिबंध करणे, मुलीचे लग्न १८ वर्षानंतर व मुलांचे लग्न २१ वर्षानंतर करणे याबाबत जनसंपर्क व मेळाव्यातून जनजागृती करणे.

८) दारिद्र्य व बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी स्थानिक पातळीवर रोजगारामध्ये वाढ करणे.

९) कुपोषण श्रेणी ३ व ४ मधील बालकांसाठी आरोग्य व पोषण विषयक सुविधा मिळवून देणे. या श्रेणीमधील बालकांना दिवसातून किमान दोन वेळा पुरेशा प्रमाणात चांगल्या दर्जाचा पोषक आहाराचा पुरवठा करावा.

१०) मातांना आरोग्य व पोषण विषयक शिक्षण देणे.

## अभ्यासाचे निष्कर्ष :

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही बाल विकास व बालकल्याण करण्याच्या दृष्टीकोनातून एक महत्वाची योजना आहे. प्रस्तुत अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, लसीकरण व संदर्भ सेवा आणि मातांना पोषण व आरोग्य शिक्षण या सेवा उपलब्ध करून दिल्याने बालकांचे कुपोषण कमी होण्यास मदत झाली आहे.

२) महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्ह्यातील सर्वसाधारण बालकांचे प्रमाण वाढत असल्याचे आढळते.

३) महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्ह्यात कुपोषण श्रेणी ३ व ४ मध्ये घट करण्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना यशस्वी झाली आहे.

४) महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत अहमदनगर जिल्ह्यात सर्वसाधारण बालकांच्या संख्येत अधिक वाढ झाल्याचे आढळते तसेच जिल्ह्यात राज्यापेक्षा कुपोषण श्रेणी १,२,३ आणि ४ मध्ये चांगली घट घडवून आणण्यात योजना अधिक यशस्वी झाली आहे.

५) महाराष्ट्र राज्यातील कुपोषण श्रेणीमधील बालकांच्या एकूण संख्येवरून असे आढळते की, सन २००१-०२ ते २००९-१० या काळात कुपोषण श्रेणी ३ व ४ मधील बालकांची टक्केवारी सन २००४ -०५ चा अपवाद वगळता सातत्याने कमी झाली आहे. मात्र अहमदनगर जिल्ह्यातील कुपोषण श्रेणी ३ व ४ मधील बालकांची टक्केवारी अभ्यासकाळात कमी - जास्त झाली आहे.

## संदर्भसूची :


१) साळुंके सु. र., *अंगणवाडी प्रशिक्षण पुस्तिका*, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पृ. १

२) Dr. Tamara Daley आणि इतर २०११, *The HUNGAMA survey Report*, Citizens Alliance against Malnutrition, Naanadi Foundation, दिल्ली, पृ. ८

३) खताळ राजेंद्र बी., १० डिसेंबर २००६, *कुपोषण ४ सायलेंट किलर* (मार्गदर्शिका) प्रथम आवृत्ती, ४ अनंत दर्शन अपार्टमेंटस्,

पुणे, पृ. १

४) *मासिक प्रगती अहवाल*, सन २००१-०२ ते २०१०-११, फॉरमॅट २ महाराष्ट्र राज्य, वेबसाईट

५) *मानव विकास अहवाल*, महाराष्ट्र राज्य सन २००२.

६) सकाळ वार्ताहर (नाशिक) दि. २५ जुलै २०१२, *कुपोषणामुळे १३८ बालकांचा मृत्यू*, पृ. ७

७) सकाळ वार्ताहर (अहमदनगर) दि. १७/७/२०१२, *जिल्ह्यात १३ टक्के मुले कुपोषणमुक्त*, पृ. ६

८) सकाळ वार्ताहर (अहमदनगर) दि. ११ जून २०१२, *कुपोषणमुक्तीचा नगर पॅटर्न राज्यभर राबविणार*, पृ. ८

९) लोकमत वार्ताहर(अहमदनगर) दि.१०/११/२०११, *४२ टक्के मुले कुपोषित*, पृ. ८

१०) दैनिक लोकसत्ता वार्ताहर, (अहमदनगर) दि.११ जानेवारी २०१२, *कुपोषण हा राष्ट्रीय कलंक*, पृ. १

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

**अर्थसंवाद**

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

**जाहिरातीचे दर**

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
दूरध्वनी:(०२१८४) २२४२९४
मो.९०११३३९९०६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

# भारतातील भाववाढीची चिकित्सा

युगंधरा देशपांडे-टोपरे, औरंगाबाद
अर्थशास्त्र विभाग,
शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९८५०६८३७३९

सातत्याने वाढणारी किंमतपातळी ही चलनवाढ किंवा भाववाढ दर्शवत असते. भारतात गेल्या दशकभरात वस्तूंच्या किंमती या चढ्याच राहिलेल्या आहेत. त्यात प्रामुख्याने अन्नधान्याची किंमत पातळी ही जास्त वाढलेली असल्यामुळे सरासरी चलनवाढीचा दर हा जास्त राहिलेला आहे. १९९० नंतर म्हणजेच जागतिकीकरणाचा अंगिकार केल्यावर भारतीय अर्थव्यवस्था जगातील इतर अनेक वित्तीय घटकांशी जोडली गेल्यामुळे, जागतिक वित्तीय अस्थैर्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर निश्चितच झाला. मात्र भारताने अजुनही काही क्षेत्रात (उदा. रूपयाची पूर्ण परिवर्तनीयता) खुल्या धोरणाचा अंगिकार न केल्यामुळे वैश्विक वित्तीय संकटांचा किंवा अस्थिरतेचा खूप मोठा परिणाम भारतावर झाला नाही. वाढत जाणाऱ्या किंमती हा त्यापैकी एक परिणाम असला तरीही त्याला इतर अनेक देशांतर्गत घटकही कारणीभूत आहेत.

भाववाढ नियंत्रण किंवा किंमत स्थैर्य हे विकसित तसेच विकसनशील देशांचे प्रमुख आर्थिक उद्दिष्ट असते. हे साध्य करतांना राजकोषीय तसेच मौद्रिक धोरण यांची योग्य सांगड घालणे अपेक्षित असते. परंतु दिवसेंदिवस वाढणाऱ्या वित्तीय खुलेपणामुळे चलनवाढ नियंत्रण हे मध्यवर्ती बँकांच्या मौद्रिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट ठरत आहे. भारतात, युरोपियन पेचप्रसंगाच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या वित्तीय वादळाची शक्यता रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अर्थात् आरबीआय च्या स्वायत्त व शिस्तीच्या धोरणामुळे बरीच कमी झाली. गेल्या दहा वर्षातील भाववाढीवरही नियंत्रण मिळवण्याचे आटोकाट प्रयत्न रिझर्व्ह बँकेने केले आहेत. आर्थिक वृद्धीदर कायम राखून किंमतींवर नियंत्रण मिळवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने मौद्रिक प्रसारणाची (Monetary Transmission) जी कसरत केली, त्यामुळे निश्चितच भाववाढीची आर्थिक

व सामाजिक किंमत भारतीयांना इतर विकसित देशांच्या तुलनेत कमी प्रमाणात चूकवावी लागली.

प्रस्तूत शोधनिबंधात भारतातील भाववाढीचा अभ्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मौद्रिक नीतीच्या दृष्टीकोनातून करण्याचा प्रयत्न केला आहे. वर्ष २००८ ते २०१२ या काळात रिझर्व बँकेने प्रमुख मौद्रिक साधनांद्वारे (Monetary Tools) किंमतवाढ रोखण्यासाठी जे प्रयत्न केले त्याविषयी संख्यात्मक स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न इथे केला आहे. युरो संकटानंतर म्हणजे साधारण २००७ नंतर महागाई जास्त भडकली. त्यामुळे साधारण २००८ ते २०१२ कालावधी या ठिकाणी घेतला आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :-

प्रस्तूत शोधनिबंध द्वितीय सामुग्रीवर आधारलेला असुन, आकडेवारी रिझर्व बँकेच्या संकेतस्थळावरुन घेतलेली आहे. या शोधनिबंधाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :-

१) भारतातील भाववाढीचे स्वरुप स्पष्ट करून, रिझर्व बँकेच्या मौद्रिक उपाययोजनांची चर्चा करणे.

२) विकसित तसेच विकसनशील देशांच्या मौद्रिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर भारतातील मौद्रिक नीतीची परिणामकारकता भाववाढीच्या संदर्भात स्पष्ट करणे.

भारतातील भाववाढ : कारणे व परिणाम

भारतातील किंमतवाढ किंवा भाववाढ ही प्रामुख्याने मागणी व पुरवठ्यातील असंतुलनातून निर्माण झालेली आहे. या असंतुलनाला प्रामुख्याने खालील घटक कारणीभूत ठरतात :-

१) अन्नधान्याच्या किंमती वाढत रहाणे.

२) पावसाची प्रतिकूलता ज्यामुळे उत्पादनात सातत्य राहिले नाही.

३) आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढणाऱ्या इंधनाच्या/क्रुड तेलाच्या किंमती व त्याचा भारतीय अर्थ व्यवस्थेवर होणारा परिणाम.

४) बाजारातील असममिती तसेच योग्य माहितीचा अभाव.

५) आर्थिक सुधारणा कार्यक्रमांचा अभाव.

उपरोक्त बाबी ह्या भाववाढीला पूरक असल्या तरीही भारतीय अर्थव्यवस्थेतील वित्तीय संस्था, बँकांची भूमिका, आर्थिक साक्षरता या बाबींवरही लक्ष केंद्रीत करण्याची गरज वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर निर्माण झाली आहे. तक्ता क्र.१ मध्ये भारतातील चलनवाढीची आकडेवारी कालावधी नुसार स्पष्ट केली आहे. २००८ ते २०१२ या काळात भाववाढीचा दर चढा राहीला. वर्ष २००९, वर्ष २०१० या काळात तो सगळ्यात जास्त होता. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर खालील प्रमुख परिणाम दिसून आले.

१. व्याजदर जास्त असल्यामुळे गुंतवणूकीतून परतावा कमी झाला व त्याचा परिणाम भारतीय वस्तूनिर्माण क्षेत्र आणि औद्योगिक गुंतवणूकीवर झाला.

२. एकूण उत्पादकता दर कमी झाला. (औद्योगिक वृद्धी दर केवळ ४ ते ५%)

३. नोकरदार तसेच निम्न आर्थिक स्तरातील वर्गाला भाववाढीची आर्थिक तसेच सामाजिक किंमतही मोजावी लागली.

तक्ता क्र. १

भारतातील चलनवाढीचा दर (%)

| कालावधी | सर्व सूचित वस्तूंसंदर्भात | सर्व अन्नधान्य पदार्थ |
|---|---|---|
| एप्रिल ०८ | ७.८६ | ६.६३ |
| जुलै - ०८ | ११.१५ | ७.७८ |
| सप्टेंबर - ०८ | १०.७८ | ९.१५ |
| ऑक्टोबर - ०८ | १०.६६ | १०.६४ |
| डिसेंबर - ०८ | ६.६८ | १०.४२ |
| जानेवारी - ०९ | ५.८७ | १२.१४ |
| फेब्रुवारी - ०९ | ३.६१ | ९.१० |
| मार्च - ०९ | १.६५ | ७.३१ |
| एप्रिल - ०९ | १.२१ | ८.७६ |
| जुन - ०९ | १.४५ | १०.४२ |
| जुलै - ०९ | ०.३९ | ११.१० |
| ऑगस्ट - ०९ | ०.५४ | १२.९७ |
| सप्टेंबर - ०९ | १.४० | १३.२१ |
| ऑक्टोबर - ०९ | १.७९ | १२.६६ |
| नोव्हेंबर - ०९ | ४.७३ | १७.१७ |
| डिसेंबर - ०९ | ७.१५ | २०.२१ |
| जानेवारी - १० | ८.६८ | १९.८० |
| फेब्रुवारी - १० | ९.६५ | २०.२२ |
| मार्च - १० | १०.६५ | १८.५० |
| एप्रिल - १० | १०.८८ | १६.०९ |
| जुलै - १० | ९.९८ | १४.३१ |
| सप्टेंबर - १० | ८.९८ | ११.४९ |
| ऑक्टोबर - १० | ९.०८ | १०.५६ |
| डिसेंबर - १० | ९.४५ | ९.९४ |
| जानेवारी - ११ | ९.४७ | १०.२८ |
| एप्रिल - ११ | ८.६६ | ७.६० |
| जुलै - १२ | ६.८७ | १०.०६ |

*स्त्रोत : www.rbi.org (संकलित)*

**मौद्रिक धोरण आणि भाववाढः**

कोणत्याही देशातील मौद्रिक किंवा पैसा आणि पतनियंत्रण विषयक धोरणात पैशाच्या पुरवठ्याचे नियंत्रण तसेच पतविस्तार आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मौद्रिक साधनांचा समावेश होतो. रिझर्व्ह बँकेने सुरूवातीपासूनच बँकदर, वैधानिक रोखता निधी गुणोत्तर (Statutory Liquidity Ratio), रोखराखीव निधी (Cash Reserve Ratio) आणि रेपो दर या प्रमुख दरांचा उपयोग पतविस्ताराचे व त्याअनुषंगाने भाववाढीचे नियंत्रण करण्यासाठी केला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पूर्वीपासूनच किंमत स्थैर्य/नियंत्रण आणि आर्थिक वृद्धी दर या दोन्हींची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आरबीआयने ३ ते ४% चलनवाढीचे उद्दिष्ट निर्धारित केलेले असले तरीही न्युझीलंड, कॅनडा, स्वीडन, अमेरिका आदी देशांतील मध्यवर्ती बँकांप्रमाणे कायद्याने हे उद्दिष्ट निर्धारित केलेले नाही. न्यूझीलंडमध्ये मौद्रिक धोरण हे आर्थिक वृद्धीसाठी राबवले जात नाही तर ती जबाबदारी सरकारचीच असते. भारतात मात्र पतनियंत्रणासोबतच आर्थिक वृद्धी हे ही मौद्रिक धोरणाचे एक अंग आहे. भारतातील मौद्रिक प्रसारण हे प्रामुख्याने खालील प्रमुख मार्गांनी झाले आहे.

१) पैशाचा पुरवठा आणि पतनिर्मिती

२) व्याजदर

३) विनिमय दर

भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पैशाचा पुरवठा आणि व्याजदरावर नियंत्रण या प्रमुख बाबींवर रिझर्व्ह बँकेने भर दिलेला आहे. जागतिकीकरणापूर्वी आणि नंतरच्या स्थितीमधे मात्र रिझर्व्ह बँकेने पारंपारिक मौद्रिक नीतीमधे बदल केलेले दिसतात. मौद्रिक धोरणाचे उद्दिष्ट तेच असले तरीही चलनवाढीवर परिणाम करणाऱ्या घटकात बदल झाल्यामुळे मौद्रिक धोरणातील साधनांची दिशा बदलली असल्याचे स्पष्ट होते. यासंदर्भातील विविध अभ्यास (मोहान्ती २०१२) (बसू २०१२) खालील बाबी स्पष्ट करतात :-

१) १९३५ ते १९५० या काळात बँकेच्या मौद्रिक नीतीचा मुख्य भर बँक दर, रोख राखीव निधी आणि खुल्या बाजारातील विक्री यांवर होता.

२) १९५१ ते १९७० या काळात भाववाढीवर नियंत्रणासाठी रिझर्व बँकेने मुख्यतः रोख राखीव निधीच्या व्यवस्थापनावर भर दिला.

३) १९७१ ते १९९० या काळात रोखराखीव निधी आणि वैधानिक रोखता निधी या दोन्ही साधनांद्वारे भाववाढ नियंत्रणाचे प्रयत्न केले गेले.

४) १९९० नंतर बाजाराधिष्ठित व्याजदर व विनिमय दर आले आणि मौद्रिक व्यवस्थापनाची दिशा बदलली.

५) १९९९ पासून रिझर्व्ह बँकेने रोखता व्यवस्थापन सुविधेअंतर्गत (Liquidity Adjustment Facility) रेपो दर आणि विरूद्ध रेपो दर यांवर अधिक भर दिल्याचे स्पष्ट होते.

**भाववाढीसंदर्भात मौद्रिक धोरणातील प्रमुख दरांची बदललेली दिशाः**

मौद्रिक नीतीतील बदललेल्या काही

प्रमुख दरांची चर्चा करतांना वर्ष २००८ ते वर्ष २०१० हा काळ महत्त्वाचा ठरतो. २००९ या वर्षात सरासरी चलनवाढीचा दर जरी कमी असला तरीही अन्नधान्याच्या संदर्भात तो जास्त होता. मात्र या काळात रिझर्व्ह बँकेने रेपो दर तसेच विरूद्ध रेपो दर आणि रोख राखीव निधीत बदल केल्यामुळे बँकांच्या व्याजदरावर परिणाम झाला आणि अर्थव्यवस्थेतील रोखता कमी झाली. रिझर्व्ह बँकेने रोखता व्यवस्थापनात राबवलेल्या बदलांचे परिणाम २००९ पासून दिसायला लागले. त्यामुळे वित्तीय स्थैर्य निर्माण होण्यास मदत झाली. (तक्ता क्र.२) आणि (तक्ता क्र.३) मध्ये प्रमुख दरांमधील बदल आणि त्या बदलांची वारंवारिता स्पष्ट केली आहे. त्यावरून रिझर्व्ह बँकेने रोखता व्यवस्थापनावर दिलेला भर आणि किंमतपातळी कमी होण्यासाठी केलेली कसरत स्पष्ट होते. चलनवाढीच्या मोठ्या धोक्यामुळे आरबीआयने मौद्रिक साधनांच्या वापरात बदल केल्यामुळेही चलनवाढीला लगाम घालता आल्याचे या तक्त्यांवरून स्पष्ट होते.

२००९ आणि २०१० या आर्थिकदृष्ट्या खडतर वर्षात रिझर्व बँकेच्या स्वायत्त आणि कडक धोरणामुळे झालेला परिणाम रिझर्व बँकेच्या मौद्रिक धोरणाच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणाऱ्या समितीने खालील अवस्थांद्वारे स्पष्ट केला आहे:

१) ऑक्टो. २००९ ते मार्च २०१० या काळात अन्नधान्यातील भाववाढ ही २०.६% इतकी होती. याच काळात क्रूड ऑईलच्या किंमती कमी झाल्या आणि पाऊसही कमी होता. या काळात वित्तीय स्थैर्यासाठी रेपो दर आणि विरूध्द रेपो दरात अनेक वेळा बदल केले. यामुळे व्याजदर वाढले.

२) एप्रिल २०१० ते जुलै २०१० या काळात भाजीपाल्याच्या किंमती चांगल्या पावसामुळे कमी झाल्या. मात्र तरीही या काळात रोखता कमी करण्यात आली ज्यामुळे चलनवाढ नियंत्रणात राहिली.

३) तिसऱ्या अवस्थेत ऑगस्ट २०१० ते नोव्हेंबर २०१० या काळात चलनवाढ कमी झाली तरीही औद्योगिक वृद्धी दर कमी होता. या काळात रिझर्व्ह बँकेने व्याजदर कमी करावेत म्हणून सर्वच क्षेत्रातून दबाव होता. मात्र ते कमी केले नाहीत. कारण पुरवठा सुरळीत झाल्याशिवाय ते कमी करता येणार नाहीत असे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे होते.

४) डिसेंबर २०१० नंतर मात्र भाववाढ कमी होत गेली व सध्या (जुलै २०१२) ती ७% च्या आसपास आहे. वित्तीय तूटीतही रोखता राखून ठेवण्याचा प्रयत्न रिझर्व बँक करत असून व्याज दरास पोषक वातावरण निर्मिती करण्यावर मौद्रिक नीतीचा भर आहे.

निष्कर्षः

तक्ता क्र. १, २ आणि ३ तसेच संदर्भीय अभ्यासांवरुन असे लक्षात येते की,

१) २००७-०८ नंतर मौद्रिक धोरणात किंमत स्थैर्यासाठी रिझर्व बँकेने रेपो दर आणि संबंधित व्याजदरांद्वारे रोखता व्यवस्थापनाची दिशा निश्चित केली आहे.

२) पारंपारिक रोखता राखीव तसेच वैधानिक

तक्ता क्र. २

रोखता व्यवस्थापनातील प्रमुख दरांमधील बदल (२००८-२०१२) (%)

| कालावधी | रेपो दर | विरूद्ध रेपो दर | रोख राखीव गुणोत्तर | वैधानिक रोखता गुणोत्तर |
|---|---|---|---|---|
| ११ ऑगस्ट १२ | - | - | - | २३ |
| १७ एप्रिल १२ | ८.०० | ७.०० | - | - |
| २८ जानेवारी १२ | - | - | ५.५० | - |
| १८ डिसेंबर १२ | - | - | - | २४ |
| २५ ऑक्टोंबर ११ | ८.५० | ७.५० | - | - |
| १६ सप्टेंबर ११ | ८.२५ | ७.२५ | - | - |
| २६ जुलै ११ | ८.०० | ७.०० | - | - |
| ०३ मे ११ | ७.२५ | ६.२५ | - | - |
| १७ मार्च ११ | ६.७५ | ५.७५ | - | - |
| २५ जानेवारी ११ | ६.५० | ५.५० | - | - |
| ०२ नोव्हेंबर १० | ६.२५ | ५.२५ | - | - |
| १६ सप्टेंबर १० | ६.०० | ६.०० | - | - |
| ०२ जुलै १० | ५.५० | ४.०० | - | - |
| २० एप्रिल १० | ५.२५ | ३.७५ | - | - |
| १९ मार्च १० | ५.०० | ३.५० | - | - |
| २१ एप्रिल ०९ | ४.७५ | ३.२५ | - | - |
| ०५ मार्च ०९ | ५.०० | ३.५० | - | - |
| १७ जानेवारी ०९ | - | - | ५ | - |
| ०८ नोव्हेंबर ०८ | - | - | ५.५० | - |
| २५ ऑक्टोंबर ०८ | - | - | ६.०० | - |
| ११ ऑक्टोंबर ०८ | - | - | ६.५० | - |
| ३० ऑगस्ट ०८ | - | - | ९.०० | - |
| १० जुलै ०८ | - | - | ८.७५ | - |
| १२ जुन ०८ | ८.०० | - | - | - |

स्त्रोत : *www.rbi.org (Database on Indian Econoly)*

तक्ता क्र. ३

मौद्रिक साधनांतील बदलांची वारंवारिता :- २००१ ते २०१२

| वर्ष | रोख राखीव निधी | बँक दर | रेपो दर | विरूद्ध रेपो दर |
|---|---|---|---|---|
| २००१-०२ | ४ | २ | ४ | ३ |
| २००२-०३ | २ | १ | ३ | ३ |
| २००३-०४ | १ | १ | १ | १ |
| २००४-०५ | २ | ० | ० | ० |
| २००५-०६ | ० | ० | २ | ३ |
| २००६-०७ | ४ | ० | ५ | २ |
| २००७-०८ | ४ | ० | ० | ० |
| २००८-०९ | १० | ० | ८ | ३ |
| २००९-१० | ०२ | ० | २ | २ |
| २०१०-११ | ०१ | ० | ७ | ७ |
| २००१-१२ (मार्च १२ पर्यंत) | २ | ० | ५ | ५ |

*स्त्रोत : मोहान्ती (WPS (DEPR) : ६/२०१२)*

रोखता गुणोत्तरऐवजी व्याजदरावर बँकेचा भर दिसून येतो.

३) भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यात रिझर्व्ह बँकेने स्वायत्तपणे व कडक रितीने घेतलेले निर्णय भारतीय अर्थव्यवस्थेला पोहोचवणाऱ्या वित्तीय धक्क्यांची तीव्रता कमी करण्यात यशस्वी ठरले आहेत.

४) अतिरिक्त भाववाढ टाळण्यासाठी रिझर्व्ह बँकेने व्याज दरांचा वापर करून चलनाचा संकोच केला. यामुळे काही काळासाठी वृद्धीदर कमी झालेला असला तरीही दोन आकडी चलनवाढीपेक्षा हा वृद्धीदर परवडला असे म्हणावे लागेल.

संदर्भ सूची :


१) Mohanty Deepak (May 2012) Evidence of Interest Rate Channel of Monetory Policy Transmission in India, WPS (DEPR) 6/2012

२) Basu Kaushik, March 2012, "The Risk of Indian Economy: Fiscal, Monetory & other Policy Changes", Journal of the Italian Assocation. (papers.ssrn.org/wiki/kaushik_basu)

३) RBI(2011), Report of the Working Group on Operation of Monetory Policy.

# सहकारी चळवळ: नवी दिशा

**नारायण टाक**, जेजुरी,
ता. पुरंदर, जिल्हा पुणे.
E Mail : narayantak24@gmail.com
भ्रमणध्वनी: ९९२२५५८०२६

भारत सरकारने ९७ वी घटना दुरुस्ती करुन सहकारी चळवळीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. बदलती आर्थिक विचारसरणी, जागतिकीकरणाचे युगात अर्थव्यवस्थेपुढे असलेली नवी आव्हाने, भारतीय राज्यघटनेत समाविष्ट असलेली मार्गदर्शक तत्त्वे, लोकशाही समाजव्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट या सर्व बाबींचा विचार करुन घटना दुरुस्ती करण्यात आली आहे. शासनाचे कमीत कमी नियंत्रण असलेल्या, प्रशिक्षित सभासदांचे लोकशाही मार्गांनी नियंत्रण असलेल्या, योग्य व्यवस्थापन असलेल्या सहकारी संस्थांची निर्मिती करणे व आहेत त्या संस्थांमध्ये तसा बदल घडवून आणणे हे या घटना दुरुस्तीचे मूलभूत तत्त्व आहे. सहकारी संस्था स्थापन करण्याचा मूलभूत अधिकार या घटना दुरुस्तीने भारतीय नागरिकांना मिळालेला आहे.

भारतीय राज्य घटनेला अभिप्रेत असलेल्या तत्त्वांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे कार्य सहकारी चळवळ करत आहे. या घटना दुरुस्तीला उशीर झाला पण उशिरा का होईना योग्य स्वागतार्ह पाऊल टाकले गेले आहे , हे निश्चित. भारतीय राज्यघटनेत दुरुस्ती केली गेली सहकार राज्याचा विषय असल्याने त्यानुसार प्रत्येक राज्याने आपल्या कायद्यात १५ फेब्रुवारी पर्यंत दुरुस्ती करणे आवश्यक होते. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी याबाबत १४ फेब्रुवारी २०१३ रोजी अध्यादेश काढून राज्याच्या सहकारी कायद्यात त्या अनुषंगाने बदल केले आहेत.

### सहकारी तत्त्वांना महत्त्व:

सहकारी चळवळीमध्ये सहकारी तत्त्वांना सर्वाधिक महत्त्व आहे. घटना दुरुस्तीने पुढील सात तत्त्वांचा समावेश सहकाराची तत्त्वे म्हणून करण्यात आला आहे. १) ऐच्छिक व खुले सभासदत्व २) सभासदांचे लोकशाही नियंत्रण ३) संस्थेच्या व्यवसायात सभासदांचा सहभाग ४) स्वायत्तता ५) सभासदांचे प्रशिक्षण ६) सहकारातील सहकार ७) सामाजिक बांधीलकी. सहकारी चळवळी बरोबरच

सहकारी तत्त्वांचा विकास होत गेला आहे. कायद्याने स्वीकारलेली तत्त्वे व्यापक आणि सर्वोच्च आहेत. विदेशी आणि भारतीय विचारवंतांनी सहकाराच्या विविध व्याख्या केल्या आहेत त्यातून सहकाराची तत्त्वे, स्वरूप व व्याप्ती थोडक्यात स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या अध्यादेशानुसार संयुक्त मालकी आणि लोकशाही नियंत्रण असलेल्या उपक्रमांद्वारे आपल्या सामाईक गरजा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि सहकारी तत्त्वांचे आणि मूल्यांचे अनुसरण करण्यासाठी स्वेच्छेने एकत्र आलेल्या व्यक्तींचा स्वायत्त अधिसंघ असलेली संस्था सहकारी संस्था म्हणून ओळखली जाणार आहे. ही संकल्पना व्यापक आणि लोकशाहीच्या व सहकारी चळवळीच्या तत्त्वांना प्राधान्य देणारी आहे. या व्याख्येत समतेवर आधारित असलेल्या लोकशाही तत्त्वांचे, सहकाराच्या मूलभूत तत्त्वांचे प्रतिबिंब आहे. या व्याख्येवर सहकारी चळवळीबाबत विचार मांडणाऱ्या भारतीय विचारवंतांचा प्रभाव आहे.

**शिक्षणाबाबत स्वायत्तता:**

सहकारी संस्थांना जास्तीत जास्त स्वायत्तता देण्याचा प्रयत्न घटना दुरुस्तीने केला आहे. त्यासाठी सहकारी प्रशिक्षणाबाबतही स्वायत्तता दिली आहे. संस्था राज्य सरकारने अधिकृत केलेल्या कोणत्याही संघीय संस्थेद्वारे प्रशिक्षण देऊ शकतात. महाराष्ट्र राज्य सरकारचे अध्यादेशानुसार प्रत्येक संस्था, राज्यशासन, राजपत्रातील अधिसूचनेनुसार विनिर्दिष्ट करील अशा राज्य संघीय संस्थांमार्फत किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थांमार्फत आपले सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या करिता शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करील. या शिक्षणामुळे संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये सदस्यांचा प्रभाव व सक्रिय सहभाग सुनिश्चित होईल. कर्मचारी शिकून कुशल होतील, प्रशिक्षणामुळे व्यावसायिक कौशल्य विकसित होईल. अशी अपेक्षा अध्यादेशात व्यक्त केली आहे. यासाठी योग्य, दर्जेदार, सर्वांना सहजपणे समजणारे, प्रत्यक्ष व्यवहाराशी निगडीत असलेले प्रशिक्षण दिले पाहिजे. सहकाराची तत्त्वे मनामध्ये रुजविण्याबरोबरच, मुक्त अर्थव्यवस्थेत गुणवत्तेला दिले जाणारे महत्त्व, स्वायत्ततेमुळे येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे महत्त्व सर्वांना समजले पाहिजे याची दक्षता प्रशिक्षण देणारांनी घेतली पाहिजे.

प्रशिक्षण देणे कायद्याने बंधनकारक आहे. प्रशिक्षण न देणाऱ्या संस्थांवर कायदेशीर कारवाई केली जाणार. प्रशिक्षणाचे केवळ नाटक करणे, प्रशिक्षणाबाबत सहकार खात्याला खोटी माहिती देणे कायद्याने गुन्हा ठरणार आहे. प्रशिक्षणाची तरतूद फक्त सहकारी चळवळीमध्ये असणाऱ्यांसाठीच आहे. समाजातील इतर घटकांना सुध्दा याबाबत शिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे लोक चळवळीकडे आकृष्ट होतील व सहकारी चळवळीचा विकास होईल.

**क्रियाशीलतेला महत्त्व:**

क्रियाशील सदस्य ही संकल्पना घटना दुरुस्तीने पुढे आली आहे. संस्थेच्या कारभारात सहभाग घेणाऱ्या, संस्थेच्या उपविधीमध्ये नमूद केलेल्या विशिष्ट मर्यादेपर्यंतच्या सेवांचा उपभोग घेणाऱ्या सभासदालाच क्रियाशील सदस्य असे समजले आहे. संस्थांच्या निवडणुकीत भाग घेण्याचा अधिकार अशा सभासदालाच दिलेला आहे. महाराष्ट्र शासनाने आपल्या अध्यादेशात

अक्रियाशील सदस्य कोणाला समजावे या बाबत तरतूद केली आहे. सदस्याने लागोपाठ पाच वर्षाच्या कालावधीत सर्व सदस्य मंडळाच्या बैठकीला किमान एकदा उपस्थित राहणे आवश्यक आहे. जर तो उपस्थित राहिला नाही तर त्या सदस्याला अक्रियाशील सदस्य समजावे. क्रियाशील सदस्य होण्यासाठी संस्थेच्या किमान किती सेवांचा उपयोग सदस्याने करावा याबाबत प्रत्येक संस्थेने आपापल्या उपविधी मध्ये तरतूद करावी. या तरतुदीप्रमाणे सदस्याने किमान सेवांचा लाभ घ्यावा, संस्थेशी व्यवहार करावा. असे न केल्यास त्या सदस्याला अक्रियाशील समजावे. उपस्थिती व किमान सेवांचा लाभ या अटी पूर्ण न केलेल्या सभासदाला संस्था अक्रियाशील सदस्य म्हणून घोषित करेल. वित्तीय वर्ष समाप्त होणाऱ्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत संस्था संबंधित सदस्याला या बाबतची माहिती देईल. अशा अक्रियाशील सदस्याला मतदानाचा अधिकार मिळणार नाही पण त्याचे सदस्यत्व रद्द होणार नाही अक्रियाशील म्हणून घोषित झाल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षात सर्व सदस्य बैठक उपस्थिती व किमान सेवांचा वापर या अटींची पूर्तता या सदस्याने न केल्यास त्याचे सभासदत्व सुध्दा रद्द होईल. याबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय देण्याचा अधिकार सहकारी निबंधकाचा असेल.

संस्थांचे काही सदस्य संस्थेवर आपले वर्चस्व रहावे, संस्थेचा सत्ता म्हणून उपयोग करता यावा, राजकारणासाठी उपयोग करता यावा, म्हणूनच सदस्य झालेले असतात ते संस्थेशी व्यवहार करत नाहीत. विविध कार्यकारी सहकारी संस्थेचा अभ्यास केला असता काही सदस्य संस्थेचे पदाधिकारी आहेत, संस्थेवर प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष त्यांचे वर्चस्व आहे पण ते संस्थेकडून कर्ज घेत नाहीत असे आढळले. संस्थेचा गैरवापर करतात त्या सदस्यांचे सदस्यत्व रद्द होणे आवश्यकच आहे. संस्थेच्या किमान किती सेवांचा सभासदाने लाभ घ्यावा. याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार संस्थांना आहे. त्यांनी हे प्रमाण नगण्य ठेवल्यास कायद्याला अभिप्रेत असलेला परिणाम साध्य होणार नाही.

संस्थेतील पुढारपण करणारे सदस्य, निवडणुकीचा विचार करुन नातलगांना, जवळच्या व्यक्तींना सभासद करुन घेतात. हे सदस्य संस्थेशी व्यवहार करत नाहीत. सर्व सदस्यांसाठी आयोजित केलेल्या सभांना उपस्थित रहात नाहीत. अशा सभासदांचे सदस्यत्व रद्द झाल्यास अपप्रवृत्तीला आळा बसेल. स्वार्थासाठी, सत्तेसाठी, राजकारणासाठी संस्थेचा उपयोग केला जात आहे. म्हणूनच सहकारी संस्थांना अपयश येत आहे. सर्व सामान्यांच्या आर्थिक हिताचे संवर्धन व उन्नती करण्याचे कार्य करण्यासाठी स्थापन झालेल्या संस्थांचे व्यवस्थापन संस्थेशी व्यवहार करणाऱ्या सदस्यांचे हातात असेल तरच संस्थेचा योग्य रितीने विकास होईल.

कोणत्याही सदस्याने संस्थेचा गैरफायदा घेऊ नये याबाबतही काळजी घेण्यात आली आहे. अवजारे, यंत्रसामग्री, विक्रेय वस्तू किंवा सामग्रीचा धंदा जर संस्था करत असेल किंवा अशा बाबींची खरेदी करण्यासाठी संस्था कर्ज देत असेलतर अशा संस्थेच्या समितीवर अशा व्यवसायापासून फायदा मिळविणारा सदस्य असणार नाही. सभासद क्रियाशील असावा व संस्थेचा गैरफायदा घेणारा नसावा या बाबत कायद्यात असलेली तरतूद

संस्थांच्या विकासाला पोषक आहे.

### संचालक मर्यादा:

घटना दुरुस्तीने सहकारी संस्थांच्या संचालकांची कमाल मर्यादा २१ केली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने या २१ जागांमधील पाच जागा आरक्षित ठेवल्या आहेत व त्यातील २ जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. अनुसूचित जाती अथवा जमाती, इतर मागास वर्गीय, भटक्या विमुक्त जाती व जमाती यांच्यासाठी प्रत्येकी एक जागा आरक्षित आहे. अगोदर असलेले ' आर्थिक दुर्बल ' घटकांसाठी असलेले आरक्षण काढून टाकले आहे याबाबत अनेक विचारवंतांनी नाराजी व्यक्त केली आहे. सर्वसामान्यांना प्रतिनिधित्व देण्याचे जे तत्त्व आहे त्याचे हे विरुद्ध आहे. संस्थेच्या कर्मचारी वर्गातून संचालक निवडले जाणार आहेत हे योग्यच आहे. महिला सबलीकरणाबाबत सर्वजण बोलत आहेत. पण फक्त २ जागा महिलांसाठी आरक्षित ठेवल्या आहेत. महिलांसाठी जास्त जागा देणे समता आणि महिला सबलीकरणासाठी आवश्यकच आहे. आता अस्तित्वात असलेल्या सहकारी संस्थांमध्ये महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे. महिलांसाठी असलेले आरक्षण भविष्यात वाढेल अशी अपेक्षा आहे.

### स्वतंत्र निवडणूक यंत्रणा:

लोकशाहीत निवडणुकांना महत्त्व असते. तसेच सहकारी चळवळीतही निवडणुकांना महत्त्व आहे. पोलॉक हा राज्यशास्त्रज्ञ म्हणतो ' सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पाडल्या नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थापनच संकटात सापडते.' सहकारी चळवळ लोकशाही व्यवस्थापनावर आधारित आहे म्हणून सहकारी चळवळीबाबत या विधानाला खूप महत्त्व आहे. निवडणूक यंत्रणेतील दोषांमुळेच सहकारी चळवळच संकटात आलेली आहे. ९७ व्या घटना दुरुस्तीने याची दखल घेतलेली आहे. मुक्त वातावरणात, पारदर्शी पद्धतीने, लोकांचा विश्वास संपादन करु शकेल अशा स्वतंत्र यंत्रणेमार्फत निवडणुका घेण्याला प्राधान्य दिले आहे. सहकारी संस्थांच्या सभासदांना निर्भयपणे, स्वेच्छेनुसार प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार या यंत्रणेमुळे मिळणार आहे. भारतीय निवडणूक आयोगाचे धर्तीवर एका स्वतंत्र निवडणूक आयोगाची किंवा ॲथॉरीटीची नेमणूक केली जावी या यंत्रणेमार्फत नि:पक्षपाती कोणत्याही राजकीय व शासकीय हस्तक्षेपाशिवाय सहकारातील निवडणुका घेतल्या जाव्यात असे घटना दुरुस्तीला अभिप्रेत आहे.

राज्य सरकारने आपल्या आर्थिक क्षमतेचा व इतर बाबींचा विचार करुन राज्यातील सहकारी चळवळीतील निवडणुका घेण्यासाठी स्वतंत्र निवडणूक आयोग, प्राधिकरण अथवा स्वतंत्र निवडणूक अधिकारी यांपैकी कोणत्याही प्रकारची स्वतंत्र यंत्रणा उभी करावी यासाठी तसा अधिकार केंद्र शासनाने राज्य सरकारांना दिला आहे. महाराष्ट्र राज्य सरकार राज्यासाठी 'राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करणार आहे. या प्राधिकरणामार्फत राज्यातील सहकारी संस्थांचे निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यात येतील. निवडणुकांचे संचालन व नियंत्रण केले जाईल. सहकारी संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबरोबरच निवडून आलेल्या संचालकांमधून अध्यक्ष, उपाध्यक्षाची निवड करणे, रिक्त झालेली संचालकांच्या पदांची निवड

करणे या बाबतची जबाबदारी प्राधिकरणाची असणार आहे. या प्राधिकरणामध्ये राज्य शासनाच्या सविचाच्या दर्जापेक्षा कमी नाही असे पद ज्याने धारण केले आहे. त्या व्यक्तीचा राज्य सहकारी निवडणूक आयुक्त म्हणून समावेश असेल. या आयुक्त पदाचा कालावधी तीन वर्षांचा असेल तथापि त्यामध्ये दोन वर्षापर्यंत वाढ करता येईल.

सहकारी संस्थांच्या निवडणूका पुढे ढकलण्याचा राज्य सरकारचा अधिकार आता संपुष्टात आला आहे. कारण प्राधिकरण स्वायत्त आहे. महाराष्ट्रात सहकारी संस्थांची संख्या प्रचंड आहे. या सर्व संस्थांची निवडणूक स्वतंत्र, नि:पक्षपातीपणे, पारदर्शकपणे घेणे, वेळेत घेणे हे मोठे आव्हान या प्राधिकरणासमोर आहे. या प्राधिकरणाचे कार्यावर सहकारी चळवळीची विश्वसनीयता आणि सामान्य माणसांमध्ये निर्माण होणारी प्रतिमा अवलंबून आहे. अयोग्य स्पर्धा, राजकीय पक्षांचा प्रभाव, मनमानी करणाऱ्या पुढाऱ्यांचे संस्थांवरील परंपरागत वर्चस्व, स्वार्थासाठी निर्माण केलेल्या संस्था, सहकारी तत्त्वज्ञानाबाबत व लोकशाही तत्त्वांबाबतच अज्ञानी असलेले संस्था सभासद या सर्व आव्हानांना सामोरे जाऊन योग्य वातावरणात, योग्य पद्धतीने निवडणुका घेणे अवघड आहे. योग्य पद्धतीने निवडणुका घेतल्या गेल्या तर महाराष्ट्राचे अर्थव्यवस्थेवर प्रभाव असलेल्या या चळवळीचा विकास होऊन महाराष्ट्राचाही विकास होईल हे निश्चित.

**शासनाचे कमीत कमी नियंत्रण:**

महाराष्ट्रात सहकारी चळवळीला सरकारी चळवळ असे संबोधले जाते. इतका सरकारचा हस्तक्षेप आहे. नवीन कायद्याने स्वायत्त निवडणूक यंत्रणेची तरतूद करुन सहकार खात्याचे अधिकार कमी केले आहेत. बँकिंग व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांना बँकिंग रेग्युलेशन कायद्याच्या सर्व तरतुदी लागू होणार आहेत. कायद्याने सहकारी पतपुरवठा संस्थांमध्ये सरकारचा वाटा असावा अशी कोणतीही तरतूद केलेली नाही. महाराष्ट्र राज्याने काढलेल्या अध्यादेशात बँकिंग व्यवसाय करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत असे कोणतेही एकत्रीकरण, हस्तांतरण, विभागणी किंवा रूपांतर, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्वमान्यतेशिवाय करता येणार नाही. अशी स्पष्ट तरतूद आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने किंवा सदस्यांचे हिताच्या दृष्टीने एकत्रीकरण, विभागणी व पुनर्रचना करण्याचा अधिकार काही अटींचे अधीन राहून सहकारी निबंधकाला मिळतो पण निबंधक अशी कार्यवाही रिझर्व्ह बँकेची पूर्व मान्यता घेऊनच करु शकतो. सरकारचे अधिकारांवर आलेल्या मर्यादा योग्यच आहेत. सहकारी चळवळीला या तरतुदींमुळे स्वायत्तता मिळाली आहे.

महाराष्ट्रात सहकारी चळवळीने प्रगती केली आहे. जून २०१० मध्ये राज्यात २२४३०६ सहकारी संस्था होत्या. आता राज्यात अडीच लाखापेक्षा जास्त सहकारी संस्था आहेत. राज्याच्या अर्थव्यवस्थेत या चळवळीला महत्त्व आहे. १९९१ नंतर भारताचे आर्थिक धोरण बदलले त्यानंतर सहकारी चळवळ अडचणीत येईल असेच अंदाज व्यक्त केले जात होते. काही अंशी ते खरे ठरले पण नव्या घटना दुरुस्तीने भारतीय अर्थव्यवस्थेतील या चळवळीची आवश्यकता अधोरेखित केली आहे. सहकारी चळवळीने सहकारी समाजाची निर्मिती करावी

अशी अपेक्षा आहे. सर्वसामान्यांनी एकत्र येऊन आपल्याकडचे भांडवल एकत्र करुन परस्परांना साहाय्य करुन, आर्थिक, सामाजिक उन्नती घडवून आणणारी, जात आणि धर्म यातून निर्माण झालेली उच्चनीचता न मानणारी, समता निर्माण करणारी, शोषण आणि पिळवणूक थांबवून आर्थिक विकास साध्य करणारी, राजकीय हस्तक्षेपापासून अलिप्त असलेली सहकारी चळवळ निर्माण करण्यात भारतीयांना अद्याप यश आलेले नाही. घटना दुरुस्तीने, राज्याच्या अध्यादेशाने काही सकारात्मक बदल होतील आणि या चळवळीला गती मिळून आपले उद्दिष्ट या संस्था गाठतील अशी अपेक्षा आहे. केवळ कायद्याने हे साध्य होईल असे नाही. पण या कायद्याने सहकारी चळवळीला नवी दिशा दिली आहे हे निश्चित.

संदर्भ:


१. ९७ वी घटना दुरुस्ती, भारत सरकार,

२. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सहकाराबाबत १४ फेब्रुवारी २०१३ रोजी काढलेला अध्यादेश.


---


**'अर्थसंवाद' ऑक्टो-डिसेंबर २०१३ अंक:** शोधनिबंध पाठवा

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. गरज असल्यास एखादा टेबल घ्यावा. लेखातील टेबलचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा.
- PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word **मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत.**
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.

\- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# कृषी विकासासाठी करार शेती

**चंद्रकांत कोकाटे, औरंगाबाद,**
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
भ्रमणध्वनी: ९९२११५३५२१
E mail : cnkokate@yahoo.com

**आनंदा पांडुरंग वडवळे, औरंगाबाद,**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
भ्रमणध्वनी: ९७६४३४२४७६
E mail : ananda_wadwale@rediffmail.com

आर्थिक सुधारणा काळानंतर भारतीय कृषीक्षेत्रात सार्वजनिक गुंतवणूकीचे प्रमाण घटत आहे. त्याचाच परिणाम कृषी उत्पादकतेत घट होत आहे. लहान व सीमांत शेतकऱ्यांना भांडवलाची कमतरता, कृषीक्षेत्रातील पायाभूत सुविधांचा अभाव बाजारपेठेतील अपूर्णता, वेळेवर योग्य कृषी आदानाच्या पुरवठ्याची समस्या व योग्य व्यवस्थापन तंत्राचा अभाव इत्यादी समस्येला तोंड द्यावे लागते. भारतीय कृषीक्षेत्रात आजही मोठ्या प्रमाणात अनिश्चितता, अस्थिरता दिसून येते आणि याच अस्थिरतेमुळे कृषीक्षेत्राच्या विकासात अनेक अडथळे निर्माण होत असल्याचे दिसून येतात. कृषीक्षेत्रासमोर असणाऱ्या अडथळ्याचे प्रमुख दोन भागात विभाजन करता येईल. एक उत्पादन अनिश्चितता तर दुसरी उत्पन्न अनिश्चितता. उत्पादन अनिश्चततेस अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यात शेतीचा लहान आकार, निर्वाहासाठी शेती, निसर्गावरील अवलंबित्व व आदानाचा अपुरा पुरवठा इत्यादी यामुळे भारतीय कृषीक्षेत्रात अनिश्चतता दिसून येते. उत्पादन अनिश्चिततेमुळे निर्माण होणारे धोके पीक विम्याच्या साहाय्याने कमी करता येतात. उत्पन्न विषयक असणारे धोके हे बाजारपेठेशी संबंधित असून त्यामुळे बाजार किंमत किती राहील, उत्पादीत मालास योग्य भाव मिळेल का ? याबाबत अनिश्चितता दिसून येते. उत्पन्न विषयक धोके हे जरी अस्थिर किंमतीमुळे निर्माण होत असले

तरी या सर्व घटकांचा विचार केल्यास भारतीय शेतकऱ्यांना करार शेती एक महत्वपूर्ण पर्याय ठरु शकतो.

आर्थिक सुधारणा काळात भारताच्या व्यापार क्षेत्रात व औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. जागतिकीकरण व उदारीकरणामुळे कृषीक्षेत्राच्या विकासाकडे सरकारला विशेष लक्ष देता येत नाही. कारण सरकारला जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी विषयक कराराचे पालन करावे लागत असल्याने कृषी धोरणांच्या माध्यमातून कृषीक्षेत्रात खाजगी व्यक्ती, संस्था व कंपनी यांचा सहभाग वाढविण्यावर भर दिला आहे. या घटकांच्या सहभागामुळे कृषी क्षेत्रासमोर असलेली भांडवलाची कमतरता, नवीन तंत्रज्ञान वापरावयाची समस्या, बाजारपेठेची समस्या कमी होऊन कृषीक्षेत्राचा विकास होण्यास मदत झाली.

जागतिकीकरणामुळे कृषीक्षेत्राकडे निर्वाहक्षेत्र म्हणून पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल झाला असून यातून कृषी उद्योगाची संकल्पना उदयास आली आहे. कृषी उद्योगामुळे मागणीनुसार वस्तुचा पुरवठा करण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी कृषीक्षेत्रात करार शेतीची सुरुवात केली.

### करार शेतीचा अर्थ :

'करार शेती हा असा करार आहे की, ज्यात शेतमाल उत्पादक शेतकरी आणि शेतमाल खरेदीदार यांच्यात शेतमाल खरेदी विक्रीच्या संदर्भात करार झालेला असतो जो दोघांनाही मान्य असतो.'

करार शेती हा अशा प्रकारचा करार आहे की, ज्यात शेतमाल उत्पादक शेतकरी आणि खरेदीदार यांच्यात शेती हंगामापूर्वीच झालेला असतो. त्या करारानुसार शेतकऱ्याला शेतमालाच्या उत्पादनाच्या विशिष्ट मात्रा, विशिष्ट वेळेला व निश्चित गुणवत्तेनुसार विशिष्ट किंमतीला देण्याची जबाबदारी असते. खरेदीदारावर करारानुसार कृषी आदानाचा पुरवठा करण्याची जबाबदारी असते.

### संशोधन साहित्याचा आढावा:

भारतातील करार शेतीचा विविध अभ्यासकांनी व संशोधकांनी अभ्यास केलेला आहे. त्यांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे. दिलीप बी.के. आणि ग्रोवर आर.के. (२००२) यांनी टमाट्याची करार शेती : एक आर्थिक विश्लेषण या लेखात हरियाणातील करार शेतीचा अभ्यास केला असून, त्यांना असे आढळून आले की, करार शेतीमुळे उत्पादनातील अनिश्चितता व किंमतीची अनिश्चितता पूर्णपणे दूर झाल्याचे दिसून आले. देव आणि राव (२००५) यांनी Food Processing and contract farming in AP : A small farmer perspective या लेखात आंध्रप्रदेशातील पामतेलाच्या करार शेतीचा अभ्यास केला. त्यांना अभ्यासात असे आढळून आले की, लहान व सीमांत शेतकऱ्यांना मोठ्या शेतकऱ्याच्या तुलनेत कमी फायदा झाला आहे. कंपनीला मात्र निश्चित कच्च्या मालाच्या पुरवठ्याची सुविधा झाली आहे. जैन आर.सी. (२०१०) यांनी भारतातील करारशेतीचे नियम आणि विवादनिवारण या लेखात जळगांव जिल्ह्यातील कांदा पिकाच्या करार शेतीचे अध्ययन केले असून त्यांना असे आढळून आले की, लहान व सीमांत शेतकऱ्यांना करार शेती ही फायदेशीर ठरली आहे. स्वाईन बी.बी. (२०११) यांनी आंध्रप्रदेशातील करार शेती : भात बियांणाची लागवड या लेखात

महेबुबनगर व करीमनगर या दोन जिल्ह्यातील भातपीक उत्पादक शेतकऱ्यांचा अभ्यास केला: त्यांना असे आढळून आले की, करार शेतीचे सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही परिणाम घडून आले. सुखपाल सिंग (२०१२) यांनी भारतातील लहान भूधारकासाठी नवीन बाजार या लेखात भारतातील लहान शेतकऱ्यांची सद्यस्थिती व बाजार पेठेतील स्थान यांचा अभ्यास केला असून त्यांना असे आढळून आले की, करार शेतीचा लहान व मध्यम शेतकऱ्यांवर सकारात्मक परिणाम घडून आला आहे. करारशेती हा ग्रामीण अर्थव्यस्थेच्या विकासाचा एक पैलू आहे.

**अभ्यास विषयाचे महत्व :**

करार शेतीशी संबंधित अभ्यास तसेच संशोधकाच्या संशोधनामधून भारतातील विविध पिकाकरिता करण्यात येणाऱ्या करारशेतीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या सर्व लेखातील निष्कर्ष हे संमिश्र स्वरुपाचे आढळतात. काही अभ्यासकांच्या मते, लहान शेतकऱ्यावर याचा प्रतिकुल परिणाम होत आहे. तर काही अभ्यासकांच्या मते, ही शेती लहान तसेच मध्यम शेतकऱ्यांना फायदा मिळवून देणारी आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील तसेच महाराष्ट्रामध्ये केल्या जाणाऱ्या करार शेतीचे स्वरुप कसे आहे. करार शेतीमुळे शेतकरी तसेच करार शेती करणाऱ्या कंत्राटदार संस्थेला कोणते लाभ होतात यासोबतच करारशेतीमुळे निर्माण होणारे संभाव्य धोके कोणते आहेत, याचे अध्ययन करण्याकरिता सदरील विषय निवडण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :**

भारतीय कृषी विकासाचा एक पैलू : करार शेती हा विषय अध्ययनासाठी निवडल्यानंतर त्याकरिता खालील उद्दिष्ट समोर ठेवून सदरील शोध निबंध तयार करण्यात आला आहे.

१) करार शेतीतील कराराच्या प्रकाराचा अभ्यास करणे.
२) भारतातील व महाराष्ट्रातील करार शेतीचा आढावा घेणे.
३) लहान व सीमांत शेतकऱ्यांवर करार शेतीच्या होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
४) करार शेतीमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

सदरील शोध निबंध हा दुय्यम आधार सामग्रीवर आधारित आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी विविध पुस्तके, विविध संशोधकांनी करार शेतीवर केलेले संशोधन, आशिया विकास बँकेचा अहवाल, व विविध मासिकांचा वापर करण्यात आलेला आहे.

**करार शेतीतील कराराचे प्रकार :**

भारतातील करार शेती अंतर्गत केल्या जाणाऱ्या कराराचे तीन प्रकार पडतात. ते पुढील प्रमाणे.

**उत्पादन करार :**

उत्पादन करारामध्ये शेतमाल उत्पादक आणि खरेदीदार यांच्यात शेतमालाच्या खरेदीचा करार झालेला असतो. याशिवाय इतर कोणत्याही घटकांचा समावेश या करारात नसतो. उदा. बियाणे कंपन्या या कराराचा वापर करतात.

**अंशिक करार :**

या करारामध्ये उत्पादन कराराबरोबरच शेतमाल उत्पादकांना काही विशिष्ट आदानाची पूर्तता करण्याची जबाबदारी खरेदीदाराची असते.

यात खरेदीदार योग्य बियाणाचा, रासायनिक खतांचा व इतर आदानाचा पुरवठा करतात. उदा. करंज, जट्रोपा, पेट्रोल ज्वारी या पिकांची करार शेती करणाऱ्या कंपन्या आदानाचा पुरवठा करतात.

### संपूर्ण करार:

या करारामध्ये शेतमाल उत्पादक व खरेदीदार कंपनी यांच्यात संपूर्ण आदानाच्या पूर्तीबाबत करार झालेला असतो. या कराराअंतर्गत शेतमाल उत्पादक केवळ पुरवठादाराची भूमिका बजावत असतो.

थोडक्यात वरील करारामध्ये उत्पादन करार हा बाजारपेठेशी संबंधित असून तो फक्त उत्पादन विक्री व खरेदीशी संबंधित असतो. अंशिक करार व संपूर्ण करार हे उत्पादन कराराबरोबरच उत्पादन घटकांशी संबंधित आहेत. अंशिक करारापेक्षा संपूर्ण करार हा अधिक व्यापक असून यात उत्पादन घटकांच्या पुरवठ्याबरोबर खरेदीदार कंपनीला उत्पादन व्यवस्थापन करावे लागते. यामुळे संपूर्ण करारात शेतकऱ्यांना निश्चित उत्पादनाची प्राप्ती होते.

### भारतातील करार शेती:

भारतात विविध राज्यात करार शेतीचा विकास होत असल्याचे दिसून येते. भारतात करार शेतीचा विकास प्रस्थापित बाजारपेठीय वितरण व्यवस्थेला पर्याय म्हणून होत असल्याचे दिसून येते. आसाम राज्यात हिंदुस्थान पेपर मिलने क्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत आठ जिल्ह्यात बांबूच्या करार शेतीचा विकास घडवून आणला आहे. बिहारमध्ये सर्वोदय कृषक सेवा स्वावलंबी सहकारी समितीने आरा जिल्ह्यात बीज उत्पादनाची करार शेती केली आहे. हिमाचल प्रदेशातील सोलन जिल्ह्यात हिमालयने इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीने तीन औषधीय वनस्पतीची करार शेती केली आहे. मध्यप्रदेशात आय.टी.सी. लिमिटेड कंपनीने सोयाबीन व गहू पिकाची करार शेती केली असून, ती शेतकऱ्यांना योग्य आदानाचा पुरवठा करुन हवामान बदलाची माहिती पुरविते. हिंदुस्थान लिव्हर लि., कारगिल इंडिया लि., रिलायन्स बायो सायन्स लि. या कंपन्यांनी गहू पिकांच्या बाबतीत करार शेती केली असून ते शेतकऱ्यांमार्फत गव्हाची प्रत्यक्ष खरेदी करतात. पंजाब व हरियाणा राज्यात टाटा केमिकल्स कंपनीने टाटा कृषी विकास केंद्राद्वारे २७०० गावांना करार शेती अंतर्गत सामावून घेण्याचे ठरविलेले आहे. वर्धमान स्पिनिंग मिल आणि स्टेट बँक ऑफ पतियाला यांनी कापूस पिकाची करार शेती हा भटींडा आणि मुक्तसार जिल्ह्यात केली असून यामुळे कापसाच्या उत्पादनात ४.६ क्विंटल प्रति एकर वरुन ९.६ क्विंटल प्रति एकर पर्यंत वाढ झाली आणि खर्चात कपात झाली आहे. गुजरात राज्यात औषधीय वनस्पतीची करार शेती अहमदाबाद विभागात केली जाते. याचबरोबर फुलकोबी, टोमॅटो यांची करार शेती केली जाते. पश्चिम बंगालमध्ये अननस, बटाटे, नारळ यांची करार शेती डाबर इंडिया कंपनी द्वारा केली जाते. आंध्र प्रदेशात पामतेला संदर्भात गोदरेज, पामटेक, एस.आय.सी. ए.एल., सिमापुरी इंड्स्ट्री आणि राधिका इंडस्ट्री इत्यादी करार शेती करतात.

वरील सर्वच राज्यात करार शेती संदर्भात कायदे करण्यात आले आहेत. यावरुन राज्य सरकार करार शेतीबाबत अनुकूल असल्याचे दिसून येते.

### महाराष्ट्रातील करार शेती:

महाराष्ट्रात सोयाबीन, फळे, भाजीपाला,

बटाटे, ऊस, संत्री, कांदा, द्राक्ष इत्यादी पिकांची करार शेती केली जाते. विशिष्ट पिकासंदर्भात विशिष्ट कंपनी शेतकऱ्यांसोबत करार करते. उदा. सोयाबीन पिकासाठी आयकॉन इक्सचेंज इन्व्हारमेंट लिमिटेड, बटाटा या पिकासाठी महिंद्रा सुलभ, द्राक्ष या पिकासाठी टाटा केमिकल्स लिमिटेड, ऊस व संत्री पिकासाठी सहकारी संस्था व कांदा या पिकासाठी जैन सिंचन संस्था महाराष्ट्रात करार शेती क्षेत्रात असल्याचे आढळते. नाशिक जिल्ह्यात द्राक्ष उत्पादनात टाटा केमिकल संस्थेने करार शेती केलेली असून जी खात्रीशीर पुरवठा व गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करते. तसेच त्याकरिता दर एकरी ५५०००/- रुपये कर्ज उपलब्ध करुन देते. शेतकऱ्यांना तांत्रिक माहिती देऊन निश्चित आदानाचा पुरवठा करण्यात येतो. भारतीय स्टेट बँकेमार्फत या शेतीची अमंलबजावणी करण्यात येते.

सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात एस.एच. केलकर ग्रुप कंपनीने सुगंधी तेलाच्या पिकासंदर्भात करार शेती केली असल्याचे आढळून येते. या करार शेतीतून निश्चित कच्च्या मालाचा पुरवठा होतो. चॅम्पगन इंडिया लि. ही कंपनी पुणे जिल्ह्यात द्राक्षापासून दारु तयार करते. ह्या कंपनीने २५०० एकर कृषी क्षेत्रावर करार शेतीची सुरुवात केली असून ती शेतकऱ्यांना आदानाचा पुरवठा करते व मालाची गुणवत्ता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करते. व्यंकटेश्वरा बॉयलर प्रा.लि. कंपनीने कोबंड्याची करारशेती केली असून ती प्रत्येक शेतकऱ्यांना ५००० कोंबड्यांच्या पिल्यांची पूर्तता करते. अशाप्रकारचे एकूण १२० युनिट या संस्थेने सुरु केले आहेत.

जळगांव जिल्ह्यात जैन सिंचन संस्थेने कांदा पिकाची करार शेती केली असून ती यशस्वी ठरली आहे. ही संस्था कांदा उत्पादकाकडून कांदा घेवून कांद्याचे निर्जलीकरण करुन विदेशात निर्यात करते. ही संस्था कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कांदा लागवडीपूर्वी पासून ते कांद्याचे पिक येईपर्यंत वेळोवेळी मार्गदर्शन व सहाय्य करते.

**करार शेतीचे फायदे :**

करार शेतीमध्ये दोन घटक प्रमुख दिसून येतात. एक शेतकरी आणि दुसरी संस्था किंवा कंपनी या दोन्ही घटकांना करार शेतीमध्ये कोणत्या स्वरुपात फायदा घडून येतो तो पुढीलप्रमाणे.

**शेतकऱ्यांना होणारे फायदे:**

करार शेतीमुळे लहान व सीमांत शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित मालाला खात्रीशीर बाजारपेठ मिळेल तसेच शेतमालाला योग्य निश्चित किंमत मिळेल. यातून शेतमालाच्या बाजारपेठेचा विस्तार होऊन उत्पादन वाढीला प्रोत्साहन मिळेल. किंमत अस्थिरतेमुळे निर्माण होणारे धोके करार शेतीमुळे टाळता येतील. करार शेती करणाऱ्या संस्थेद्वारे गुंतवणूकीत वाढ केली जाऊन शेतकऱ्यांची भांडवलाची गरज भागविली जाईल. शिवाय बँकेद्वारे शेतकऱ्यास कर्ज उपलब्ध करुन देण्यास संस्थेची मदत होते. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान तसेच आधुनिक बियाणांचा पुरवठा करण्यात येतो. तसेच योग्यवेळी आधुनिक आदानाचा पुरवठा करण्यात येत असल्याने गुणवत्तापूर्ण उत्पादन वाढीला प्रोत्साहन मिळते. करार शेती ही केवळ पीक उत्पादनाशीच संबंधीत असल्याने शेतकऱ्यांच्या शेत जमिनीवरील मालकी हक्काला कोणतीही बाधा पोहचत नाही. एकंदर पीक नियोजन आणि कुटुंबातील सदस्यांना मिळणारा रोजगार यामुळे उत्पादन खर्चही कमी

होण्यास मदत होते.

## संस्थेला/कंपनीला होणारे फायदे :

करार शेतीमुळे जसे फायदे शेतमालाच्या उत्पादकाला मिळताना दिसून येतात तसेच ते करार शेती करणाऱ्या संस्थेला अथवा कंत्राटदार कंपनीला देखील मिळतात. कंत्राटदार संस्थेला कमी खर्चामध्ये कच्च्या मालाचा खात्रीशीर पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे बाजारातील अस्थिरतेचा परिणाम संस्थेच्या उत्पादनावर आणि उत्पादन खर्चावर होत नाही. शेतकऱ्याकडून पुरविण्यात येणाऱ्या शेतमालाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवता येत असल्याने उत्पादित मालाची गुणवत्ता टिकून ठेवता येते. संस्थेला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत लागणाऱ्या व्यापार मानांकनाची पूर्तता करणे यातून शक्य होते. या सारखे अनेक फायदे हे करार शेतीच्या कंत्राटदार संस्थेला अथवा कंपनीला मिळताना दिसून येतात.

## करार शेतीमधील संभाव्य धोके :

करार शेतीचे फायदे हे शेतकरी तसेच कंत्राटदार संस्थेला होत असले तरी करार शेतीच्या लाभासोबत काही संभाव्य धोके सुद्धा निर्माण होण्याची शक्यता आहे.

१) करार शेतीमध्ये शेतमालाची खरेदी करणारी कंपनी एकच असल्यामुळे एक क्रेताधिकार निर्माण होण्याची संभावना असते.

२) करार शेतीमधील करार हा दोन असमान शक्तीमधील करार असून या करारात लहान शेतकऱ्यांची सौदा शक्ती कमी असल्याने त्यांना अपेक्षित लाभ मिळणार नाही.

३) करार शेती ही मोठ्या प्रमाणात मोठ्या शेतकऱ्यांसोबतच केली जाते. त्यामुळे लहान व सीमांत शेतकरी करार शेतीपासून अपेक्षित फायदा घेऊ शकत नाहीत किंवा करार शेतीपासून वंचित राहतात.

४) करार शेतीमध्ये पर्यावरण संसाधनाचा अधिक प्रमाणात वापर केला जातो, त्यामुळे या संसाधनाचा अपव्यय मोठ्या प्रमाणात घडून येतो.

५) करार शेतीमुळे पारंपरीक कृषी पद्धती मोडीत निघण्याची व कंपनीचा एकाधिकार निर्माण होण्याची शक्यता अधिक असते.

६) करार शेतीमध्ये जर कराराचे उल्लंघन घडून आल्यास दोघांचेही नुकसान होते.

## सारांश:

जागतिकीकरण आणि डब्ल्यु. टी. ओ. यांच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रात जे बदल घडून आले. त्यामुळे विकसनशील देशाच्या अविकसित कृषी क्षेत्राकडे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी लक्ष वेधले. विकसनशील देशात लहान व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक असून ते परंपरागत पद्धतीने शेती करतात, लहान व सीमांत शेतकऱ्यांसमोर भांडवलाची कमरतात, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, सुधारित बी-बियांणांची टंचाई यामुळे शेतीत सुधारणा घडवून आणता येत नाही. याचबरोबर सरकारला जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी विषयक कराराचे पालन करावे लागते. त्यामुळे सरकारला कृषीक्षेत्रास मोठ्या प्रमाणात अनुदान देता येत नाही. म्हणून विकसनशील राष्ट्रात जर कृषी विकासासाठी करार शेती पद्धतीचा वापर करण्यात आला तर लहान व सीमांत शेतकऱ्यांना निश्चित फायदा होवू शकतो. भारतात ज्या ठिकाणी करार शेती केली जाते. त्या-त्या भागातील शेतकऱ्यांना निश्चित फायदा झाल्याचे दिसून आले आहे. करार

शेतीतील करार हा परस्पर विश्वासावर अवलंबून असतो. त्याचे पालन उभय पक्षांनी केल्यास निश्चित दोघांना फायदा होतो. करार शेतीच्या माध्यमातून स्थानिक बाजारपेठेला जागतिक बाजार पेठेशी जोडता येते. करार शेतीमधील संभाव्य धोक्याचा विचार केल्यास असे लक्षात येते की, सरकारी हस्तक्षेपांनी ते टाळता येतात. थोडक्यात करार शेती विकसनशील देशातील कृषी विकासाकरिता तसेच शेतीवर अवलंबून असलेल्या मोठ्या लोकसंख्येकरिता वरदान ठरेल. शेती क्षेत्रातील अनिश्चितता विशेषतः किंमत आणि बाजारपेठेतील अनिश्चतता करार शेतीद्वारे दूर होण्यास मदत होईल. असे असले तरी या शेती पद्धतीचे काही संभाव्य धोके सुद्धा दिसून येतात. हे संभाव्य धोके टाळण्यासाठी सरकारद्वारे योग्य ते कायदेशीर उपाय योजल्यास निश्चितच करार शेती ही जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर भारतासारख्या विकसनशील देशाला फायद्याची ठरेल.

**संदर्भ :**


1) Sunuter Setboonsutry (2008), *'Global Partnership in Poverty Reduction : Contract Farming and Regional Co-operation'* Asian Development Bank Institute, Tokiyo, Japan, Page 2
2) Channavare G.B.N. (2011), *'Contract Farming and Contractal Agreement -A Descriptive Analysis'*, Southern Economist, April, Page 17.
3) Asokan S.R. and Singh G. (2003), *'Role and Constraints of Contract Farming in Agro-Processing Industry'*, Indian Journal of Agricultural Economics, Vol. 58 No. 3 July-Sept. Page 567.
4) Pandey Tushar - (2011), *'Contracting and Agricultural Finance for Small Holder Hi-tech Farming and Case for public Private Partnerships'*, YES Bank Ltd., Chandkyauri, New Delhi. Page 1
5) Dileep B.K. and Grover R.K. (2002), *'Contract Farming in Tomato : An Economic Analysis'* 'Indian Journal of Agricultural Economics, April - June, Page 199- 210.
6) Dev S.M. and Rao N.C. (2005), *'Food Processing and Contract Farming in Andhra Pradesh : A Small Farmer Perspective'*, Economic and Political Weekly, Vol X L (26), June - July; Page 17.
7) Jain R.C.A. (2010), *'Regulation and Dispute Statement in Contract Farming in India'*, Jain Irrigation Systems Ltd., Jalgaon, Maharashtra Page 1-15.
8) Swain B.B. (2011), *'Contract Farming in Andhra Pradesh : A case of Rice Seeds Cultivation'* Economic and political weekly, Vol

XLVI 42 Page 60-68

9) Singh Sukhpal (2012), *'New Markets for Small Holders in India'*, Economic and Political Weekly, Vol XL VII 50 Page 95-105.

10) Rao V., Naik N.T. and Kumar N. (2011), *'Impact of Contract Farming on Rural Woman in India'*, Southern Economist, April, Page 49.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मान चिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१२ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरीत पाठवाव्यात.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १/१/२०१२ ते ३१/१२/२०१२ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३१ ऑगस्ट २०१३ पर्यंत पाठवाव्यात.

### डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१२ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख, वृत्तपत्राचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्ट २०१३ पूर्वी कार्यवाह, म.अ.प., बार्शी यांच्याकडे पाठवावेत. २०१३ च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

- डॉ. अनिल सूर्यवंशी, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ

वाय. एस. गायकवाड, सांगली,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
विलिंग्डन महाविद्यालय,
भ्रमणध्वनी ९८५०९९१४५३.

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या विकासासाठी आणि यशस्वीतेसाठी जे विविध घटक महत्वाचे ठरलेले आहेत त्यामध्ये नेतृत्व हा एक अतिशय महत्वाचा घटक आहे. जिल्ह्यातील सहकारी चळवळ ही प्रामुख्याने नेतृत्वाच्या मार्गदर्शनातून आणि त्यांच्या योगदानातून आर्थिकदृष्ट्या सबल बनलेली आढळून येते. देशाच्या सहकारी चळवळीची संघटनात्मक रचनाच अशा स्वरूपाची आहे की ही चळवळ फार मोठ्या प्रमाणावर सरकाच्या वित्तीय मदतीवर, मार्गदर्शनावर अवलंबून आहे. तसेच सरकारच्या व्यवस्थापनाखाली काम करीत आहे. वर्तमानाचा व भविष्याचा विचार करता सहकारी चळवळीला सरकारवरती अवलंबून न राहता या चळवळीला प्रामाणिक व कार्यक्षम नेतृत्वाची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे नेतृत्व महाराष्ट्र राज्यात किंबहुना पश्चिम महाराष्ट्रात आणि प्रामुख्याने कोल्हापूर जिल्ह्यात निर्माण झालेले आहे. परिणामी इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात सहकारी चळवळीचा विकास झालेला आहे. सदर शोध निबंधामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा विकास या सहकारी नेतृत्वाच्या यशस्वी वाटचालीतून कशा प्रकारे झालेला आहे याचा उहापोह करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. सहकारी नेतृत्वाची संकल्पना समजून घेणे.
२. जिल्ह्यातील सहकारी नेतृत्वाचा विकास अभ्यासणे.
३. जिल्ह्यातील सहकारी चळवळीची प्रगती अभ्यासणे.

## अभ्यास पद्धती:

सदर शोध निबंध हा पूर्णतः दुय्यम साधनसामग्रीवर आधारीत असून यासाठी अहवाल, संदर्भ पुस्तके, विविध लेख, नियतकालीके व मासिकांमधून प्रकाशित झालेले लेख, एम.फिल., पीएच.डी. प्रबंध इत्यादींचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.

## सहकारी नेतृत्वाची संकल्पना:

नेतृत्व या शब्दाची अचूक व्याख्या करणे शक्य नाही. विविध व्यवस्थापकीय तत्ववेत्यांनी नेतृत्वाची व्याख्या वेगवेगळ्या प्रकारे केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जॉर्ज टेरी, जॉन ग्लोवर, टीड ओर्डवे, डेविड कॅथ लिंगरन, बोगारडस, एम.एस. किर्लोस्कर, अल्फ्रेड व ब्युटी, लिव्हींगस्टन यांचा समावेश आहे. या तज्ज्ञांनी केलेल्या व्याख्या विचारात घेतल्या असता आपण असे म्हणू शकतो की, "नैतृत्व ही एक व्यक्तीची अशी पात्रता आहे की, जी आपल्या स्वतंत्र अशा कार्यप्रणालीतून, वागण्याच्या स्वतंत्र अशा प्रभावातून किंवा स्वतःच्या संघटनेनुसार योग्य प्रसंगी ध्येय संपादन करण्याचा प्रयत्न करते."

समाजशास्त्र ज्ञान कोषानुसार "नेतृत्व हे एक असं नाव आहे की ज्यामध्ये व्यक्ती व संघटना यांचा समान सहभाग आणि त्यांची वागण्याची पद्धत ही त्यांच्या निर्देशनानुसार व मतानुसार ठरविली जाते."

## सहकारी नेतृत्वाचा विकास:

नेतृत्व ही लोकांकडून अपेक्षित कार्य करून घेण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांना योग्य प्रकारे निर्देशित करणारी, त्यांना कार्य प्रवृत्त करणारी प्रक्रिया आहे. नेतृत्व ही जबाबदारी स्वीकारण्याची, ती पार पाडण्याची क्षमता आहे. नेतृत्वाशिवाय कोणतीच सामाजिक, राजकीय, धार्मिक किंवा आर्थिक चळवळ अगर क्रांती शक्य नसते. महात्मा गांधीची स्वातंत्र्य चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलित चळवळ, छत्रपती शाहू महाराजांची सामाजिक परिवर्तनाची चळवळ, कॉम्रेड लेनिन यांची रशियन राज्यक्रांती, रॉबर्ट ओवेन यांची सहकारी चळवळ या चळवळी भक्कम नेतृत्वावरच यशस्वी झाल्या. लोकांच्या एकत्रित प्रयत्नांना समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी योग्य दिशा देण्यास नेतृत्वाची नेहमीच गरज असते. सहकारी क्षेत्रही याला अपवाद नाही. महाराष्ट्र राज्यात सहकारी चळवळीचा पाया प्रा.डी. आर. गाडगीळ, वैकुंठलाल मेहता, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील, डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार, तात्यासाहेब कोरे, तात्यासाहेब मोहिते, शंकरराव मोहिते-पाटील यांनी घातला.

सामाजिक आणि आर्थिक सुधारणांचे तसेच कल्पनांचे माहेरघर म्हणून कोल्हापूर संस्थानाचा उल्लेख होतो. छ. शाहू महाराज प्रजाहितदक्ष असल्यामुळे व राजकीय स्थैर्यामुळे त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर संस्थानांचा कायापालट झाला. छ. शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. आपल्या प्रजेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी शिक्षण, शेती विकास, जलसिंचन, सहकारी धोरण, व्यापार, वाहतूक इ. योजना कार्यक्षमपणे राबविल्या. कोल्हापूर संस्थानात सहकारी संस्थांची स्थापना करण्यात व त्यांच्या विकासात

छ. शाहू महाराज व छ. राजाराम महाराज यांचा सक्रिय सहभाग होता.

भारतात इ.स. १९०४ साली पहिला भारतीय सहकारी कायदा पास झाला आणि वैधानिकरित्या सहकारी चळवळीस सुरूवात झाली. त्यापूर्वी कोल्हापूर संस्थानामध्ये 'सामुदायिक फड पद्धती' च्या स्वरूपात सहकार चळवळ कार्यरत होती. देशातील लहान शेतकऱ्यांच्या गरजा भागविणे हे १९०४ च्या सहकारी कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. पुढील काळात १९१२ व १९२५ मध्ये या कायद्यामध्ये सुधारणा केल्या गेल्या, तरी स्वातंत्र्यपूर्व काळात या चळवळीने मूळ धरलेले नव्हते, परंतु स्वातंत्र्यानंतर मात्र भारताचे पहिले पंतप्रधान प. जवाहरलाल नेहरू यांनी या चळवळीकडे विशेष लक्ष दिले. १९६० मध्ये भाषीक प्रांतरचनेनुसार स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती केली गेली. महाराष्ट्र राज्यामध्ये सहकारी चळवळीचा विकास गतिमान होण्यासाठी 'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०' हा कायदा करण्यात आला.

सहकारातील १९१२ च्या कायद्यानुसार सहकारी तत्वाचा विस्तार करण्यासाठी सहकार खात्याची नेमणूक करण्यास परवानगी मिळाली. या कायद्यामुळे राज्य सरकारला काही अधिकार प्राप्त झाले. त्यामुळे राज्यातील सहकारी चळवळीचा विकास होण्यास मदत झाली. महाराष्ट्राच्या या सहकारी घोडदौडीमध्ये कोल्हापूर जिल्हा आघाडीवर असणे स्वाभाविक होते. कारण शाहू छत्रपतींची शिकवण त्यामागे होती. नामदार भास्करराव जाधवांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरातील १९१३ साली स्थापन झालेली 'कोल्हापूर अर्बन को-ऑप बॅंक लि.' ही आद्य संस्था म्हणून आज कोल्हापूरचे भूषण आहे. समाजातील गरीब, दुर्बल, रोजंदारीवर जगणारे, नगरपालिकेतील कर्मचारी, झाडूवाले, आदींना पठाणांच्या जोखडातून सोडविण्यासाठी सुरू झालेल्या या बॅंकेने अर्बन बॅंकिंगमध्ये चळवळीचे नेतृत्व केले.

ना. भास्करराव जाधव यांच्या सल्ल्यानेच श्री. धोंडो कृष्णाजी मराठे या संस्थानातील मामलेदारास संस्थानातील को-ऑप सोसायट्यांचा पहिला रजिस्ट्रार नेमण्यात आले. १९१३ साली मुंबई नगरपालिकेच्या झाडूवाल्यांसाठी स्थापन होत असलेल्या पतपेढ्यांची बातमी त्यांच्या कानी आल्याने कोल्हापूर नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना पठाणी सावकारांच्या जाचातून सोडविण्यासाठी अर्बन को-ऑप सोसायटीची स्थापना केली आणि या सोसायटीचे मुख्य प्रवर्तक ना. भास्करराव जाधव हे होते. या सोसायटीच्या स्थापनेनंतर दोन वर्षांनी आठवडे बाजारातील लहान व्यापाऱ्यांनाही हफ्त्यावर कर्ज व कॅश क्रेडीट देण्याची सोय करण्यात आली. मुदत ठेवी घेण्याची व सरकारी रोख्याच्या तारणावर कर्जही देण्याची सोय करण्यात आली. यावरून ना. भास्करराव जाधवांचा दूरदृष्टीपणा व आर्थिक बाबींवरील प्रभावी नियंत्रण व आत्मविश्वास अधोरेखित होतो. या सोसायटीचे कालांतराने बॅंकेत रूपांतर होवून ती संस्थानातील इतर सोसायटयास अॅपेक्स बॅंक ठरावी अशी त्यांची दीर्घदृष्टी होती. अर्बन को-ऑप बॅंक कोल्हापूर संस्थानातील सहकारी संस्थांच्या व चळवळीच्या मातृस्थानी आहे. त्याचे श्रेय ना. भास्करराव जाधवांना द्यावे लागते. छत्रपती शाहू महाराजांच्या नंतर त्याचे चिरंजीव

छत्रपती राजाराम महाराज यांनी संस्थानातील सहकारी चळवळीच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी संस्थानासाठी स्वतंत्र खाते सुरू करून सहकारी संस्थांच्या निबंधकाची नेमणूक केली. त्यांनी सहकारी खात्याचे निबंधक म्हणून श्री.एस. एस. शिर्के यांची नेमणूक केली. संस्थान काळात शिर्के यांनी सहकारी अर्थव्यवस्था विकसीत करण्याचा प्रयत्न केला. संस्थानकाळात सहकारी नेतृत्व पुढे येण्याच्या दृष्टीने विशेष मदत झालेली आहे.

१९४० च्या दरम्यान श्री. तात्यासाहेब मोहिते यांनी शेतकरी सहकारी संघाची स्थापना केली. या संघामार्फत सहकारी क्षेत्रात विविध प्रकारच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. कोल्हापूरच्या शेतकरी सहकारी संघाला आशिया खंडामध्ये तोड नाही. खरेदी विक्री बरोबरच शेतकरी संघाच्या ग्राहक चळवळीनेही एकूण सहकारी चळवळीबद्दल जनसामान्यामध्ये विश्वास निर्माण केला आहे. तसेच संघाच्या औषध दुकानामुळे संघ सर्वत्र परिचीत झाला आहे.

भारतातील संस्थानिक खालसा करण्यात आल्यानंतर कोल्हापूर जिल्हा अस्तित्वात आला आणि १९४९ नंतर राजकीय क्षेत्रातील लोक सहकारी संस्था स्थापन करण्यास पुढे येवू लागले. सुरवातीला शेतीला आवश्यक असणारा कर्जपुरवठा करण्यासाठी शेती सहकारी सोसायट्यांच्या स्थापना करण्यात आल्या. त्यानंतर १९६० च्या दरम्यान सहकारी साखर कारखाने स्थापन होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सुरूवातीला १९५९ मध्ये श्री. रत्नप्पाण्णा कुंभार यांनी पंचगंगा सहकारी साखर कारखाना स्थापन केला. त्यानंतर तात्यासाहेब कोरे यांनी वारणानगर येथे वारणा सहकारी साखर कारखाना, कै. दादासाहेब कौलवकर यांच्या नेतृत्वाखाली भोगावती सहकारी साखर कारखाना, श्री. नरके यांच्या नेतृत्वाखाली कुंभी-कासारी सहकारी साखर कारखाना आणि कै. दत्ताजीराव कदम यांच्या नेतृत्वाखाली शिरोळ येथे दत्त सहकारी साखर कारखाना सुरू झाला. देशातील एकूण साखर उत्पादनाच्या ३५ ते ४० टक्के साखर उत्पादन एकट्या महाराष्ट्र राज्यात होते. त्यात सहकारी साखर कारखान्यांचा हिस्सा ३० टक्केहून अधिक आहे आणि त्यातील २० ते ३० टक्के साखर उत्पादन कोल्हापूर जिल्ह्यात होते. या साखर कारखाना निर्मितीमुळे ग्रामीण भागाचा चेहरामोहराच बदलून टाकला आहे. ही गोष्ट सूर्य प्रकाशाइतकी स्वच्छ आहे. परिसराच्या सर्वांगीण विकासाचे सामर्थ्य या उद्योगात असले तरी ध्येयवेडाने ते राबविण्यासाठी आवश्यक असणारे चारित्र्यसंपन्न नेतृत्व त्यास लाभले पाहिजे. असे नेतृत्व ज्या साखर कारखान्यांना लाभले त्यांनाच आपल्या भागाचा सर्वांगिण विकास साधता येणे शक्य झाले. सहकारी साखर कारखान्यातील नेतृत्व हे प्रामुख्याने राजकीय क्षेत्रातून निर्माण झालेले आहे. सहकारी साखर कारखानदारी आणि सहकारातील इतर संस्थांच्या निर्मितीमुळे येथील नेतृत्वाची ताकद, मानसन्मान, श्रेष्ठत्व, स्थानिक, राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील शासनात वर्चस्व वाढत गेले. कोल्हापूर जिल्ह्यात जवळ-जवळ १७ सहकारी साखर कारखाने स्थापन झाले आहेत.

सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीनंतर राजकीय नेतृत्वानी जिल्ह्यात सहकारी सूतगिरण्या आणि सहकारी दुध संस्था स्थापन करण्यास सुरूवात केली. कोल्हापूरामध्ये छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर शहरात शाहू मिल सुरू

केली. त्यांना सहकारी सूतगिरणी सुरू करणे शक्य झाले नाही म्हणून त्यांनी परिसरात सहकारी सूत गिरण्या सुरू होण्यासाठी भांडवल तसेच जमीन उपलब्ध करून दिली. त्यांच्या प्रोत्साहनामुळे इचलकरंजी परिसरात श्री. भिडे, श्री. दातार, कै. दत्ताजीराव कदम, बाबासाहेब खंजिरे, आबासाहेब कुलकर्णी, डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार, शामराव पाटील-यड्रावकर, कल्लाप्पाण्णा आवाडे या व इतर काही सहकारी तज्ञांनी सहकारी तत्त्वावरील सूतगिरण्या स्थापन केल्या. या गिरण्यांचा सुताचा दर्जा हा देशात सर्वोत्तम आहे. सहकारी दूध संस्थामुळे ग्रामीण भागात घरोघरी दुभती जनावरे दिसू लागली आहेत. ग्रामीण भागातील जनतेस अर्थार्जनाचे एक हमखास असे साधन उपलब्ध झाले आहे. दुधाचे संकलन करण्यासाठी आणि दुधापासून इतर उपपदार्थांची निर्मिती करण्यासाठी तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाखाली वारणा दुध प्रकल्प तसेच आनंदराव पाटील चुयेकर आणि अरूण नरके यांच्या नेतृत्वाखाली गोकुळ प्रकल्प त्याबरोबरच मंगरायाचीवाडी येथील श्री.एस.के. पाटील आणि संजय पाटील यांच्या नेतृत्वाखालील मयूर दूध प्रकल्प तसेच अलिकडे नव्याने स्थापन झालेला प्रा. संजय मंडलिक आणि नामदार हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखालील महालक्ष्मी दूध प्रकल्प कार्यरत आहेत. या दूध प्रकल्पामुळे प्लॅस्टिकच्या पिशव्यातून दूध मुंबईला पाठविले जाते तसेच दूधापासून पावडर, तूप, श्रीखंड यासारख्या उत्पादीत होणाऱ्या सर्व पदार्थांचा दर्जा उत्कृष्ठ प्रकारचा आहे. ग्रामीण भागातील नेतृत्वाच्या या विविध कार्यपद्धतीमुळे त्यांची आर्थिक आणि राजकीय शक्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वाचा विचार केला असता त्यामध्ये व्यावसायीक आणि शेती क्षेत्रातील लोकांची संख्या वाढत चालली आहे. या लोकांची आवड ही प्रामुख्याने नागरी सहकारी बँका स्थापन करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात असलेली आढळून येते. हातकणंगले तालुका आणि इचलकरंजी परिसरातील राजकीय नेतृत्व याबाबत आघाडीवरती आहे. आज अखेर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ६२ नागरी सहकारी बँका आपल्या विविध शाखांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. तसेच करवीर तालुक्यामध्ये एकूण २० अर्बन बँका कार्यरत असून एकट्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १८ अर्बन बँका कार्यरत आहेत. २६७ शाखांच्या माध्यमातून या बँका आपलं कार्य करीत आहेत. नागरी सहकारी बँकामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर अर्बन, मराठा बँक, जनता बँक, पंचगंगा बँक, महिला बँक, विरशैव बँक, शिवनेरी बँक, यूथ डेव्हलपमेंट बँक, पार्श्वनाथ बँक, श्रीपतराव बोंद्रे बँक, महावीर बँक, रवि बँक, बलभीम बँक, गव्हर्नमेंट सर्व्हंट बँक, श्री. शाहू बँक, अण्णासाहेब चौगुले वडगाव अर्बन बँक या बँकांचा समावेश होतो. या बँकांचे नेतृत्व ना. भास्करराव जाधव, श्रीपतराव बोंद्रे, शामराव शिंदे, काशीनाथ चराटी, राजाराम देसाई, अण्णासाहेब चौगुले, अरूण नरके, अशोकराव साळोंखे, ॲड. पिसाळ, डॉ. सनतकुमार खोत, प्र. रा. मुंडरगी, हिंदुराव शेळके, धनपाल आलासे यासारखे सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ते करीत आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रातील नेतृत्व मोठ्या प्रमाणात राजकीय क्षेत्रातून आणि मोठ्या शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले आहे. तसेच सहकारी नेतृत्वामध्ये मराठा जातीतील नेतृत्वाचे

वर्चस्व आढळून येते. कोल्हापूर जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व भक्कम बनविण्याच्या दृष्टीने सहकारी क्षेत्राने महत्वाची भूमिका बजावलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या सहकारी अर्थव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने सहकारी कारखाने, सूत गिरण्या, दूध संस्था, कुक्कुटपालन संस्था, ग्राहक सहकारी संस्था, उपसा जलसिंचन संस्था, नागरी आणि ग्रामीण पतसंस्था, नागरी सहकारी बँका, खत कारखाने, औद्योगिक वसाहती गृहनिर्माण संस्था, शेती सोसायट्या या संस्थांचे वर्चस्व आढळून येते. या संस्थांच्या स्थापनेला प्रामुख्याने साखर कारखाने, नागरी सहकारी बँका, ग्राहक सहकारी संस्था जबाबदार आहेत. तसेच महिला सहकारी उद्योगामध्ये औद्योगिक उत्पादनांचा समावेश होतो. त्यामध्ये ब्लॅकबोर्ड, कागद, इथेनॉल, अल्कोहोल, ग्राहकोपयोगी वस्तूंचा समावेश होतो. अलिकडे सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून विद्युत निर्मिती, कागद प्रकल्प, पशुखाद्य निर्मिती, बायोगॅस यासारखे प्रकल्प राबविले जात आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील महिला नेतृत्वाचा विचार केला असता कै. श्रीमती सरोजिनी खंजिरे या महिला बँकेचे नेतृत्व करीत आहेत. तसेच खा. श्रीमती निवेदिता माने यांनी जिल्हा बँकेचे नेतृत्व केले आहे. तसेच सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीच्या माध्यमातून नेतृत्व करीत आहेत. त्याबरोबर सौ. इंदुमती आवाडे आणि सौ. सपना आवाडे या श्रीमती इंदिरा गांधी महिला सहकारी सूत गिरणीच्या माध्यमातून सहकारी क्षेत्रात नेतृत्व करीत आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेतून आणि आर्थिक मदतीतून निर्माण झालेले सहकाराचे जाळे संपूर्ण देशाला खूप काही देवून राहिले आहे. तसेच देशाच्या सहकारी चळवळीला ती निश्चितच मार्गदर्शक ठरली आहे. डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार, दत्ताजीराव कदम, बाबासाहेब खंजिरे, तात्यासाहेब मोहिते, तात्यासाहब कोरे, सा.रे. पाटील, दादासाहेब पाटील-कौलवकर, शामराव पाटील-यड्रावकर, कल्लाप्पाण्णा आवाडे, वसंतराव मोहिते, बाबा नेसरीकर, दिनकरराव मुद्राळे, एस.के. पाटील, भाई माधवराव बागल, श्रीमंत नारायणराव घोरपडे, डी.सी. नरके, आबासाहेब कुलकर्णी यासारखे सहकारातील नामदार भास्करराव जाधव यांच्या आदर्शातून आणि छत्रपती शाहू महाराज व राजाराम महाराज यांच्या प्रेरणेतून निर्माण झाले आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील सह. चळवळ प्रगती:**

कोल्हापूर जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांच्या प्रगतीचा आढावा तक्ता क्र.१ मध्ये दर्शविला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांच्या प्रगतीचा आढावा विचारात घेतला असता सहकारी संस्थांची संख्या वेगवेगळ्या कालावधीमध्ये फक्त प्रा. सहकारी बँकांचा अपवाद वगळता सर्वच संस्थांची संख्यात्मक प्रगती झाल्याचे आढळून येते. तसेच संस्थांचा वृद्धी दर काही वर्षांचा अपवाद वगळता सर्वच वर्षामध्ये वाढल्याचे आढळून येते. म्हणजेच संस्थांची संख्यात्मक व गुणात्मक प्रगती घडवून आणण्यासाठी नेतृत्वाची भूमिका महत्वाची ठरलेली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सहकारी संस्थांचा झालेला विकास, संस्थांचे भाग भांडवल, सभासद संख्या, ठेवी, दिलेली कर्जे, रोजगार निर्मिती इत्यादी

## तक्ता क्र.१
## कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीची प्रगती

(प्रकारानुसार)

| क्र. | संस्था प्रकार | २०००-०१ | २००१-०२ | २००४-०५ | २००५-०६ | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथ.शेती पतपुरवठा संस्था | १५३९ | १५७५<br>(२.३३) | १७१७<br>(९.०१) | १८४२<br>(७.२८) | १८५७<br>(०.८१) |
| २ | दुग्ध संस्था | २९४९ | २८५१<br>(३.३२) | ३५५७<br>(२४.७६) | ३७७०<br>(५.९८) | ४२१३<br>(१३.८७) |
| ३ | प्राथ. सहकारी बॅंका | २६७१ | २७५२<br>(३.०३) | २८९२<br>(५.०८) | २८२८<br>(-२.२१) | १८४६<br>(-३४.७२) |
| ४ | सहकारी विपणन संस्था | ७४ | ८६<br>(१६.२१) | २११<br>(१४५.१३) | २३५<br>(११.३७) | ४८६<br>(१०६.८) |
| ५ | ग्राहक सहकारी संस्था | २८३ | २९२<br>(२.०९) | २८५<br>(-२.३९) | २८७<br>(०.७०) | २७०<br>(-२.९२) |
| ६ | उपसा जलसिंचन संस्था | ५४३ | ५३४<br>(-१.६५) | ६३८<br>(१९.४७) | ६४६<br>(१.२५) | ६८१<br>(५.४१) |
| ७ | प्रक्रिया सह. संस्था | ५५८ | ५८६<br>(५.०१) | ५५६<br>(-५.११) | १०११<br>(८१.८३) | १२४६<br>(२३.२४) |
| ८ | मजूर सह. संस्था | १३१ | १३०<br>(-०.७६) | २०५<br>(५७.६९) | २०६<br>(०.४८) | २२७<br>(१०.१९) |
| ९ | गृहनिर्माण सह. संस्था | ५४७ | ५८७<br>(७.३१) | ५९७<br>(१.७०) | ६१५<br>(३.०१) | -- |
| १० | इतर | ११२७ | १११०<br>(-१.५०) | १३१५<br>(१८.४६) | १०१८<br>(-२२.५८) | १८३८<br>(८०.५५) |
| | एकूण | १०४२२ | १०५०३<br>(०.७७) | १२०७३<br>(१४.९४) | १२३५७<br>(२.३५) | १३४१५<br>(८.५६) |

*स्त्रोत : जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय कोल्हापूर*

*टीप : कंसातील आकडे वृध्दीदर दर्शवितात.*

घटकामध्ये झालेली वाढ सहकारी संस्थांच्या प्रगतीचे द्योतक आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या विकासामुळे जिल्ह्यातील पायाभूत सुविधांमध्ये झालेली वाढ नजरेआड करता येणार नाही. म्हणजेच जिल्ह्यात निर्माण झालेल्या

शैक्षणिक, आरोग्य, दळणवळण व वाहतूक सुविधांमध्ये झालेली वाढ तसेच कृषी आधारीत उद्योगधंद्यांची निर्मिती, जलसिंचन सुविधा व बॅंकिंग क्षेत्राचा झालेला विकास हा प्रामुख्याने नेतृत्वाच्या धाडसी निर्णयातून आणि कल्पकतेतून झाल्याचे आढळून येते.

**समारोप:**

नेतृत्वाशिवाय कोणतीच सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक चळवळ अगर क्रांती शक्य नसते. उदा. म.गांधीची स्वातंत्र्य चळवळ, डॉ. आंबेडकरांची दलित चळवळ, छत्रपती शाहू महाराजांची सामाजिक परिवर्तनाची चळवळ आणि रॉबर्ट ओवेन यांची सहकारी चळवळ अशा प्रकारच्या चळवळी भक्कम व कार्यक्षम नेतृत्वावरच यशस्वी झालेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात सहकारी चळवळ यशस्वी करण्याचे काम प्रा.डी.आर. गाडगीळ, वैकुंठलाल मेहता, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, कै. वसंतराव दादा पाटील, कै. डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार, तात्यासाहेब कोरे, तात्यासाहेब मोहिते, शंकरराव मोहिते पाटील, कै. दत्ताजीराव कदम इत्यादी सहकारी नेतृत्वाने पार पाडले आहे.

छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीमुळे, राजकीय स्थैर्य, सामाजिक व आर्थिक सुधारणामुळे कोल्हापूर जिल्ह्यात सहकारी संस्थांची स्थापना व विकास घडून आला. तसेच त्यांच्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी सहकारी चळवळीला प्रोत्साहन देण्याचे काम केले. ना. भास्करराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या विविध संस्था, त्यांची दूरदृष्टी, आत्मविश्वास तसेच आर्थिक बाबीवरील प्रभावी नियंत्रण यामुळे जिल्ह्यातील सहकारी चळवळ विकसित होण्यास बरीच मदत झाली. तसेच छ. राजाराम महाराजांनी संस्थानासाठी निर्माण केलेले स्वतंत्र सहकार खाते, सहकारी निबंधकाची नेमणूक यांच्यामुळेही जिल्ह्यातील सहकारी अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत झाली. देशातील संस्थाने खालसा करण्यात आल्यानंतर राजकीय क्षेत्रातील लोक सहकारी संस्था स्थापन करण्यास पुढे आले. हे नेतृत्व चारित्र्य संपन्न, ध्येयवेडे, शेतकरी कुटुंबातील आणि मराठा जातीतील होते. परिणामी जिल्हयातील राजकीय नेतृत्व भक्कम बनविण्याच्या दृष्टिने सहकारी क्षेत्राची भूमिका महत्वाची ठरली आहे.

थोडक्यात कोल्हापूर जिल्ह्यात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेतून आणि आर्थिक मदतीतून निर्माण झालेले सहकाराचे जाळे संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरलेले आहे. जिल्ह्यात सहकारी क्षेत्रात निर्माण झालेले नेतृत्व सहकारातील दिग्गज ना. भास्करराव जाधव यांच्या आदर्शातून आणि छ. शाहू महाराज व छ. राजाराम महाराज यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले आहे.

**संदर्भ सूची:**


१. Nadkarni R.V. (1998), *"Role of Leadership in Reshaping Co-operative Movememnt for Twenty First Century"*, Sahakarita Samshodhan, Jan-June-July-Dec 1998

२. Dr. Doshi R.R. (1989), *"Co-operative Sugar Factories in Kolhapur District"* Arthashuwad July Sept, Vol. 13, No. 2.

३. Karve D.G. (1963), *"In Co-op-*

*erative Leadership in South East Asia"*, Asia Publishing House, Bombay.

४. Dinesh C. (1970), *"Co-operative Leadership and Management - An Empirical Approach"*, VAMNICOM.

५. Kamat G.S. (1987), *"New Dimensions of Co-operative Management"*, Himalaya Publishing House, Mumbai.

६. Maharashtra State Co-operative at a Glance, 2004-05.

७. कट्टी, विद्यावती प्रल्हाद (२००६), *"कोल्हापूर शहरातील नागरी सहकारी बँकामधील नेतृत्व"*, अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर, २००६

८. मोहिते पी.एम. (१९९५), *"कोल्हापूरातील सहकारी पतपेढी व्यवहार १९१३-१९४९ एक ऐतिहासिक अभ्यास"*, श्रीहरी प्रकाशन, कोल्हापूर.

९. डॉ. घुगे वि.बा.. (१९७५), *"छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण: एक चिकित्सक अभ्यास"*, कोल्हापूर रायटर्स को-ऑप सोसायटी लि. कोल्हापूर

१०. कोल्हापूर जिल्हा आर्थिक आणि सामाजिक समालोचन २०१०-११

११. कोल्हापूर जिल्हा उपनिबंधक कार्यालय, कोल्हापूर वार्षिक अहवाल, १९९९-०० ते २००४-०५

१२. कोल्हापूर जिल्हा सहकारी बोर्ड लि. कोल्हापूर सांख्यिकीय पुस्तिका, १९९०-०० ते २००४-०५

# अपंगांचे समावेशन : एक दृष्टीक्षेप

बी.आर.सोनवणे, सिल्लोड,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
जिल्हा औरंगाबाद.
भ्रमणध्वनी: ९४२३४५३३२५
E-mail: drbrss@gmail.com

अपंग-दु:खाच्या लक्तरात जगणारा, एकाकीपणे रहाणारा, भीकेची याचना करणारा, मरणापर्यंत आपल्या वेदनांना जपणारा एक अश्वत्थामा. अपंग म्हणजे मानसीकदृष्ट्या खचलेला, सांस्कृतिकदृष्ट्या उपेक्षीलेला, सामाजिकदृष्ट्या अव्हेरलेला व व्यक्तिगतरित्या खचलेला असा एक उपेक्षित घटक. ह्या उपेक्षितांच्या, वंचितांच्या सांस्कृतिक, सामाजिक, कौटुंबिक व आर्थिक स्वरूपाच्या अनेक समस्या आहेत. त्यांचे विकासाच्या मुख्य प्रवाहात समावेशन झाले पाहिजे जे ११ व्या पंचवार्षीक योजनेचे महत्त्वाचे उद्दीष्टच होते. या अपंग कल्याण किंवा अपंग समावेशना संदर्भात शासनाने पार पाडलेल्या भूमिकेचा परामर्श घेतला आहे.

## अपंग कल्याणाचे शासकीय प्रयत्न:

अपंग लोकसंख्या हे राष्ट्राचे धन आहे. त्याचा अपव्यय व्हायला नको. त्यांनाही विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेतले पाहिजे. विकासाची फळे त्यांनाही चाखता यावीत. त्यांनाही सुसहाय जीवन जगण्याचा हक्क प्राप्त व्हावा. त्याचसाठी त्यांना उपजीवीकेची साधने उपलब्ध झाली पाहिजेत, समानसंधी व न्याय उपलब्ध करून दिला पाहिजे, त्यांच्यातील क्षमतांचा विकास झाला पाहिजे. ज्याद्वारे आपल्याला सर्वसमावेशक वृद्धीचे उद्दीष्ठ साध्य करता येईल, जी आपल्या कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेल्या लोकशाही राष्ट्राची घटनात्मक जबाबदारीच आहे. ह्याच हेतूने प्रेरीत होऊन अपंग कल्याणार्थ शासनाने

स्वातंत्र्योत्तर काळात घटनात्मक, कायदेशीर व धोरणात्मक स्वरूपाचे भरीव प्रयत्न केलेले आहेत.

राज्य घटनाकारांनी घटनेचा मसुदा तयार करतांना अपंगांचे जरूर भान ठेवले आहे. म्हणूनच कोणत्याही व्यक्तीची समानता नाकारली जाणार नाही, हे अभिवचन त्यात अंतर्भूत आहे. याशिवाय घटनेच्या सातव्या परिशिष्टातील दुसऱ्या सूचीत अपंगाना मदत करण्याचे स्पष्ट असे दिशानिर्देश दिलेले आहेत. पुढे घटनेच्या ४१ व्या कलमात अपंगाचा रोजगार, शिक्षण व सार्वजनिक मदतीचा हक्क मान्य करण्यात आलेला आहे. थोडक्यात अपंगांना आपल्या राज्यघटनेने संरक्षक कवच बहाल केलेले आहे. ज्यामुळे शासन अपंग कल्याणाची आपली जबाबदारी नाकारू शकत नाही.

अपगांना समान जीवन जगता यावे म्हणून या विकलांग घटकाच्या संरक्षण, कल्याण, पुनर्वसन व विकासासाठी शासनाने वेळोवेळी अनेक कायदे केले आहेत. जसे मानसीक आरोग्य कायदा (१९८७) Rehabilitation Council of India Act ज्यात २००० मध्ये दुरूस्ती करण्यात आली. पुढे अपगांच्या कल्याणासाठी ज्याला मैलाचा दगड मानता येईल असा कायदा १९९५ मध्ये तयार करण्यात आला ज्याचे नामाभिधान अपंग व्यक्ति, समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग असे करण्यात आले त्यामुळे अपगांची संकल्पना व प्रकार स्पष्ट होण्यास मदत झाली. यानंतरही शासनाच्या जेव्हा लक्षात आले की अजुनही १९९५ च्या कायद्यात केलेल्या संकल्पनेत न बसणारेही अपंग आहेत. अशांच्या समावेशनासाठी National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disability Act (१९९९) करण्यात आला. पुढे २००५ मध्ये अपंग कल्याणाचे सर्वंकष धोरण जाहीर करण्यात आले. २००६ मध्ये Sector Specitic Policies Emerging National Action Plan Inclusion Disabilities हा बालक व युवा अपगांचे शिक्षणात समावेशन वाढविण्यासाठी कृती कार्यक्रम देणारा कायदा बनविण्यात आला. त्यानंतर Ratification of Dnconventional on Rights of Persons with Disabilities (२००७) हा अपगांसाठीचा कायदा बनविण्यात आला.

कोणत्याही लोकशाहीप्रधान व कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेल्या राष्ट्रात कायदे हे वंचीत, उपेक्षीत व विकलांगाच्या हातातील अस्त्र म्हणून काम करतात. म्हणूनच कायद्याचे महत्व सांगतांना प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ ऑगस्ट काँट म्हणतात, ज्या देशात कायद्याची भूमिका नगण्य असते तो देश म्हणजे डाकूंची झुंड असतो.

## उणीवा आणि तरतूदी:

शासनाची आजपर्यंतची अपंग कल्याणा संदर्भातील भुमिका कितीही प्रामाणिक असली तरी अपगांचे उन्नयन झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. अपंग कल्याणासंदर्भात आजपावेतो शासनाने कायद्यांसोबतच अनेक उपक्रम राबविलेत. पंचवार्षिक नियोजनाद्वारे आर्थीक निधीची तरतूद केली. त्यांच्यातील उद्योजकतेस वाव देण्यासाठी आर्थीक महामंडळाची निर्मीती केली. स्वतंत्र मंत्रालय व आयुक्तालयांची स्थापना केली. अपगांना भेडसावणाऱ्या समस्यांची उकल

होण्यासाठी वेळोवेळी अभ्यासगटांची नियुक्तीही केली. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अपंग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व शिष्यवृत्तीची तरतूद केली. मोफत कृत्रीम अवयव पुरविण्याची व्यवस्था केली. तरीही अपगांचे प्रश्न मिटलेले नाहीत. त्याचे कारण म्हणजे कार्यपद्धती आणि व्यवस्थेत असलेल्या उणीवा. ह्या उणीवांचा परामर्श घेऊन त्या दूर करण्यासाठी पुढील उपाय सुचविता येतील:

१. अपंग कल्याणासंदर्भात शासनाने वेगवेगळ्या यंत्रणा निर्माण केलेल्या आहेत. परंतु त्यात समन्वयाचा व सुसंवादाचा अभाव आहे. ज्यामुळे प्रकरणे निकाली निघण्यात अडचणी येतात. ह्या विविध यंत्रणेत सुसंवाद साधण्याची गरज आहे. तसेच यंत्रणेत कर्मचाऱ्यांची संख्या तोकडी आहे ती वाढविल्यास प्रकरणांचा जलद निपटारा होईल.

२. निम्नस्तरीय घटक जसे - कर्मचारी, अपंग सेवा पुरवठादार, नेतृत्व या सारख्या संबधीत घटकांना अपंग कल्याणाची कोणतीही आस्था नाही. त्यांच्या जाणीवात बदल घडवून आणण्याची गरज आहे.

३. अपंग कल्याणासंदर्भात कायदे डझनभर आहेत परंतु त्यांची प्रभावी अमंलबजावणी नाही. ह्या कायद्याची प्रभावीपणे अमंलबजावणी व्हावी. ज्यामुळे अपंगाना घटनेने शिक्षणात व रोजगारात दिलेल्या ३% आरक्षणाची पूर्ती होईल व अपंगाना न्याय मिळेल.

४. प्रत्येक पंचवार्षीक योजनेत अपंग कल्याणासाठी निधी मंजूर केला जातो. परंतु अपंग लोकसंख्येचे आकारमान बघता तो खूपच अपुरा असतो. त्यात भरीव वाढ व्हावी. तसेच मंजूर निधी व झालेला खर्च यातील अंतरही बरेच जास्त असते. म्हणून जेवढा निधी मंजूर झालेला असेल तेवढा का खर्च होत नाही, ह्याची कारणे शोधली पाहिजेत. या शिवाय बेरोजगार अपंग व्यक्तिंना निर्वाह भत्याची तरतूद करावी. त्यांना सामाजीक वीम्याचे संरक्षण कवच प्राप्त व्हावे. तसेच ग्रामीण अपंग महिलांसाठी शिक्षण व प्रशिक्षण सुविधेत असलेली गुंतवणूक वाढवावी. ज्यामुळे त्यांना योग्य मोबदल्याचा रोजगार मिळेल.

५. अशासकीय स्वयंसेवी संघटना (NGO) व बचत गट यांचे अपंग कल्याण संदर्भातील कार्य नक्कीच प्रभावी आहे. परंतु ते फक्त शहरी भागापुरतेच मर्यादित आहे. म्हणून ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटनांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

६. अपंगासंदर्भात समाजाचा दृष्टीकोन हा नकारात्मक स्वरूपाचा आहे. त्यात बदल होण्याची गरज आहे. त्यासाठी अपंगाना अल्पसंख्याक दर्जा द्यावा व त्यांना शेलक्या विशेषणांनी हिणवणाऱ्यांना अत्याचार प्रतिबंधात्मक कायद्या अंतर्गत शिक्षा व्हावी. ज्यामुळे अपंगांचा कोणीही उपमर्द करणार नाही.

७. असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायद्याचे पाठबळ नाही. त्यामुळे त्यांचे शोषण होत असते. त्यांचा आवाज ऐकून घेतला जात नाही. कामाच्या जागी त्यांच्या सुरक्षिततेची व्यवस्था असावी. अपंगांना आर्थिक लाभ मिळवून देणे हा कल्याणकारी राज्यातील सामाजिक न्यायच असतो.

८.    धोरण व निर्णय प्रक्रीयेत ग्रामीण अपंग महिलांचा सहभाग वाढविला पाहिजे. महिला वसतीगृहात अपंग महिलांसाठी काही जागा राखीव ठेवाव्यात.

९.    अपगांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यासाठी ग्रामीण भागापर्यंत शासकीय दवाखान्यातून औषधे व लसींची व्यवस्था व्हावी. सोबतच पोषक आहाराची व्यवस्था व्हावी. तसेच गर्भाची वाढ आणि बाळाची काळजी याबाबत ग्रामीण स्त्रीयांचे प्रबोधन करावे. म्हणजे निरोगी मुल जन्माला येतील.

वरील शिफारशींवर गांर्भीयाने विचार केल्यास अपंगांचे जीवन सुसह्य होऊ शकते व राष्ट्राच्या आर्थिक विकासाला बळ मिळून अधिकतर सर्वसमावेशक वृद्धीचे उद्दीष्ट साध्य होऊ शकते.

## समारोप:

आज नक्कीच भारतात अपंग सक्षमीकरणाची प्रक्रीया गतीमान होऊ लागली आहे. न्यायव्यवस्थेच्या सक्रीयतेमुळे राज्यकर्त्यांच्या पुरोगामी विचारसरणीमुळे, अपंग कल्याणार्थ असलेल्या कायदे व माध्यमांच्या सतर्कतेमुळे, वैद्यकशास्त्राच्या प्रगतीमुळे, अशासकीय सेवाभावी संस्थांच्या प्रबोधन व जनजागृतीमुळे, समाजाच्या प्रगल्भ संवेदनेमुळे अपगांच्या समस्या सुटायला मदत होत आहे.

थोडक्यात अपगांच्या वाट्याला अनेक वेदना आलेल्या असतात. त्यांच्यातील शारीरीक व्यंगामुळे, दुर्बलतेमुळे त्यांना शिक्षण, रोजगार व जगण्याच्या समान संधीपासून वंचीत रहावे लागते. म्हणूनच त्यांचे हक्क मान्य करून त्यांना रोजगार शिक्षण व अर्थार्जनाची साधने अग्रक्रमाने प्राप्त करून दिली पाहिजेत. ज्यामुळे त्यांचे जगणे सुसह्य होईल व भारताची कल्याणकारी राज्याची अंत्योदयाची संकल्पना साकारण्यास मदत होईल. त्याचसाठी अपंग कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, नसता संयुक्त राष्ट्राच्या दबावामुळे अपंगासाठी कायदा केला एवढाच अर्थ त्यातुन ध्वनीत होईल.

## संदर्भ सूची -


१. ॲड.उदय वांजीकर, अपंग कायद्यांची संथ अमंलबजावणी, दै.लोकमत, ३ डिसेंबर २०११

२. NSS Report on disabled persons (58th Round) July 2002

३. जनगणना अहवाल २०११, भारत सरकार

४. अर्थसंवाद, त्रैमासिक

५. योजना विविध अंक

६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोष (विविध खंड)

७. Tripathy S.N., Ubckysuveolicies and Removal of Social Disadvantage, Abhijit publication, Delhi.

८. 'Panigrahi Santoshkumar, Rile of the NGOs in the Emowerment of the Disabled, Radha Publications, New Delhi 2004.

निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

# मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात विषमता, दारिद्र्य ह्यासंबंधी सैध्दांतिक विवेचन


**अवधूत नाडकर्णी, मुंबई,**
प्रोफेसर, अर्थशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ,
भ्रमणध्वनी: ९८२१०८६३९४.


वरील विवेचन दोन वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केले जाऊ शकते: अर्थशास्त्राच्या मुख्य प्रवाहात किंवा मानवी विकास आणि उपजीविकेच्या दृष्टिकोनातून. निबंधात विषयाचा विस्तृत आढावा जर आपण घेत नसू तर आपण कोणत्या दृष्टिकोनातून विचार करणार आहोत हे आधी ठरवावे लागेल. दोघातील फरक हा की अर्थशास्त्रीय दृष्टिकोनात गरिबी उत्पन्नाच्या/उपभोगाच्या कमतरतेतून निश्चित केली जाते, तर मानवी विकास दृष्टिकोनातून गरिबीची निश्चिती बहु आयामी पध्दतीने होत असते. अर्थशास्त्राच्या मुख्य प्रवाहात मुक्त व्यापारामुळे विषमता वाढली तरी गरिबी घटते असा निष्कर्ष काढला जातो, तर मानवी विकास दृष्टिकोनात जागतिकीकरण हे गरिबांना घातक ठरते असाच निष्कर्ष सहसा काढला जातो. असे असले तरीही ह्या दोन्ही दृष्टिकोनातील विवेचनात थोडासा वेगळा विचारही मांडला गेला आहे. एखाद्या दृष्टिकोनातील विश्लेषणात थोडा वेगळा निष्कर्ष येत असेल तर त्या संबंधीचे विवेचन करणारा सैध्दांतिक निबंध उपयुक्त ठरावा.

मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्रीय विश्लेषण हे दोन पध्दतींनी करता येईल: स्थैतिक आणि गतिक. स्थैतिक विश्लेषण हे हेक्स्चेर-ओहलीन-साम्युल्सन यांच्या सिध्दान्तावर आधारित राहील. या सिध्दान्तानुसार मुक्त व्यापारामुळे विकसनशील देशात मुबलक प्रमाणात असलेल्या अकुशल कामगारांची मजुरी वाढून गरिबी आणि विषमता घटेल तर विकसित देशात तुलनेने मुबलक असलेल्या कुशल कामगारांचे वेतन वाढून तिथली विषमता वाढेल. पण असे दिसून आले आहे की विषमता सर्वत्रच म्हणजे विकसनशील देशातसुध्दा वाढली आहे. विकसनशील देशात विषमता घटण्याऐवजी का वाढली याचे सैध्दान्तिक विश्लेषण करणारे विपुल संदर्भ साहित्य उपलब्ध आहे आणि त्याचा वापर करून निबंध लिहिता

येतील. विषमतेचा विचार करताना, जागतिक स्तरावर विषमता का कमी झाली आहे आणि देशांतर्गत, विशेषत: चीनमध्ये आणि भारतात आणि अमेरिकेत ती का वाढली आहे याचा विचार व्हावा.

मुख्य प्रवाहातील मुक्त व्यापार आणि गरिबी ह्यातील संबंधाचे गतिक विश्लेषण हे दोन भागात करता येईल: एका बाजूला व्यापार आणि वृध्दी ह्यांच्यातील संबंध आणि दुसऱ्या बाजूला वृध्दी आणि गरिबी यांच्यातील संबंध. व्यापार आणि वृध्दी यांच्यातील संबंधाबाबत अर्थशास्त्राच्या मुख्य प्रवाहात देखील एकमत नाही. पण यासंबंधीची चर्चा तितकीशी सैध्दांतिक नसून, अनुभवनिष्ठ अधिक आहे. काठच्छेद आधार सामग्री प्रतिपगामी विश्लेषणाने किंवा दाखला अभ्यास करून वेगवेगळे निष्कर्ष काढले गेले आहेत. हे साहित्य विपुल आहे आणि जरी शुध्द सैध्दांतिक विवेचनात त्याच्या वापरावर बंधने येत असली तरी हे साहित्य या चर्चेच्या संदर्भात महत्त्वाचे असल्यामुळे या साहित्याचा वापर करून निबंध लिहिण्यास हरकत नसावी. या संदर्भात विकासाचा व्यूह आणि वृध्दी यावर चर्चा होऊ शकते. भगवती, श्रीनिवासन अणि क्रुगर यांनी सत्तरच्या दशकात केलेली निर्यात प्रोत्साही विरुध्द आयात पर्यायी धोरणांची चर्चा येथे उपयुक्त ठरावी. निर्यातीचा परिणामकारी दर आणि आयातीचा परिणामकारी दर या संकल्पना येथे उपयोगी पडाव्यात.

याविरुध्द गरिबी आणि वृध्दी यांच्यातील संबंधाबाबत बऱ्याच प्रमाणात एकमत आहे. गरिबी कमी करण्यासाठी वृध्दी आवश्यक असली तरी पुरेशी नाही हे सर्व मान्य आहे. गरिबी हटवण्याच्या दृष्टीने वृध्दीची रचना महत्त्वाची कशी असते याची चर्चा केली जाऊ शकते. अशा प्रकारची चर्चा आपल्याला मानवी विकास आणि उपजीविकेच्या दृष्टिकोनाजवळ घेऊन जाईल. मुख्य प्रवाहाचा विचार करता, मुक्त व्यापारामुळे गरिबी कमी करण्यास उपयुक्त अशा रचनेची वृध्दी होते का याची चर्चा केली जाऊ शकते. उदा. मुक्त व्यापारामुळे श्रमप्रधान तंत्रांचा वापर विकसनशील देशाच्या अर्थव्यावस्थेत वाढतो का आणि तसे होत नसल्यास त्याची कारणे कोणती याचा विचारही केला जाऊ शकतो.

अलिकडच्या काळातील वृध्दीच्या काही अंतर्जात प्रतिमानात खुल्या अर्थव्यस्थेचे महत्त्व विशद करता येईल.

मानवी विकास दृष्टिकोनात गरिबीचे निष्पन्न बहुआयामी पध्दतीने केल्यामुळे खुला व्यापार अशी गरिबी कमी करण्यास उपयुक्त ठरतोच असे नव्हे. अर्थशास्त्राच्या मुख्य प्रवाहात हे मान्य केले आहे की, मुक्त व्यापारामुळे वृध्दीद्वारे गरिबी जरी घटली तरी विषमता वाढू शकते, किंवा वाढतेच. म्हणजेच सापेक्ष गरिबी वाढली तरी निरपेक्ष गरिबी घटते. या दृष्टिकोनातून सापेक्ष गरिबीतील वाढ ही निरपेक्ष गरिबी कमी करण्यासाठी मोजलेली एक आवश्यक किंमत असते. मानवी विकास दृष्टिकोनातून मात्र मुक्त व्यापारामुळे सापेक्ष गरिबीत झालेली वाढ देखील मानवी क्षमताना हानीकारक कशी ठरू शकते यासंबंधी चर्चा करता येईल.

निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

# विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**श्रीराम देविदास जोशी**, जळगाव
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
मु. जे. महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२१००८७७६

आज जागतिक पातळीवर थेट विदेशी गुंतवणुकीकडे आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून पाहिले जाते. आजच्या प्रगत काळात विदेशी भांडवलाचा उपयोग राष्ट्रीय स्वाभिमान आणि आत्मसन्मानाला ठेच पोहोचवितो असा विचार मान्य होत नाही. विदेशी गुंतवणूक आपल्या देशात यावी म्हणून विकसनशील देश मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करताना दिसतात. भारत सरकारने देखील खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण आणि बाजारीकरण या आर्थिक सुधारणांच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत. १९९१ पासून भारत सरकारने आपल्या विदेशी गुंतवणूक विषयक धोरणात आमुलाग्र बदल करून विदेशी गुंतवणूकीला अर्थव्यवस्थेचे दरवाजे उघडे केले आहेत. आज भारतात नकारात्मक सूचीतील व्यवसाय वगळता सर्व उद्योग व्यवसायात १० टक्क्यापासून १०० टक्केपर्यंत थेट विदेशी गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली आहे. भारत सरकारच्या उदार आर्थिक धोरणाबरोबरच भारतातील उपभोक्त्यांची मोठी संख्या, वाढते राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न, बदलत्या आवडी-निवडी, विकसनशील नाणेबाजार व भांडवल बाजार, नैसर्गिक व मानवी संसाधनाची सहज उपलब्धता, वेगाने विकास साध्य करणारी वाहतूक व दळण-वळण व्यवस्था, इत्यादी व्यावसायिक पर्यावरणाचा सकारात्मक प्रभाव म्हणून भारतात सातत्याने विदेशी गुंतवणूकीच्या आंतरप्रवाहात वाढ झाली आहे.

विदेशी गुंतवणूकीच्या माध्यमातून एका विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेला पुढील लाभ प्राप्त होऊ शकतात- बचत आणि गुंतवणूकीतील अंतर भरून काढता येते, भांडवलाचा निरंतर प्रवाह, कार्यक्षम व्यवस्थापन आणि नियंत्रण, प्रगत तंत्रज्ञानाची उपलब्धता, देशीय उद्योगांचा विकास, उत्पादनातील धोके आणि अनिश्चितता स्वीकारणे, पायाभुत संरचनेची निर्मिती, रोजगार संधी,

वास्तव मजुरीत वाढ, बाजारकक्षांचा विस्तार, निर्यात स्पर्धात्मकता, उपभोक्त्यांना लाभ, उच्च सामाजिक प्रतिफल, लाभाची पुनर्गुंतवणूक, व्यवहारतोलावर सकारात्मक प्रभाव, सरकारला महसूल प्राप्ती, वित्तीय संकटात आर्थिक परिस्थिती पूर्वपदावर आणण्यात महत्त्वाची भूमिका, इत्यादी. या मुद्द्यांच्या साह्याने विदेशी गुंतवणूकीचे महत्त्व स्पष्ट होत असले तरी विदेशी गुंतवणूकीमुळे काही दोष, उणिवा, हानी पोहोचण्याची शक्यता असते. या प्रमाणे - पायाभूत सुविधांवर मोठा खर्च, मर्यादित व असंतुलित विकास, आर्थिक शोषण, प्रगत तंत्रज्ञानाचे हस्तांतरण होत नाही, देशांतर्गत उद्योगसंस्थांमध्ये नैराश्य, प्रादेशिक असमतोल, मक्तेदारीचा उदय, सरकारी महसुलात घट, अनिश्चितता, व्यवहारतोल संतुलनावर भार, राजकीय हस्तक्षेप, इत्यादी मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेवर विदेशी गुंतवणूकीच्या परिणामांचा विचार केल्यास अभ्यासकांना खालील मुद्द्यांच्या आधारावर आपले शोधनिबंध लिहिता येतील: विदेशी गुंतवणूक व स्थूल उत्पादन, विदेशी गुंतवणूक व निर्यात वृध्दी, विदेशी गुंतवणूक व क्षेत्रनिहाय श्रमाची उत्पादकता, विदेशी गुंतवणूकीचे भारताच्या गाभा (कोअर) क्षेत्रावरील परिणाम, जसे की, ऊर्जा व इंधन, विद्युत उपकरणे, वाहतुक, रसायने, अन्न प्रक्रिया, धातू उद्योग, औषधी, कापड उद्योग, औद्योगिक यंत्र सामग्री हे गाभा क्षेत्र बहुराष्ट्रीय कंपन्यांना खुली केली आहेत त्यावरील परिणामांचे अध्ययन करणे उचित ठरेल.

विदेशी गुंतवणूकीचे ग्रामीण व निमशहरी भागाच्या विकासावर झालेले परिणाम व त्यातील दुव्यांचा अभ्यास करता येईल. विदेशी गुंतवणूक झालेल्या क्षेत्रात उत्पादन, मूल्यवृध्दी, भांडवल आणि रोजगार यावर काय परिणाम झाला याचाही अभ्यास करणे शक्य आहे.

विदेशी गुंतवणूक असणाऱ्या पुढचे व मागचे दुवे (Forward and Backward Linkages) कितपत आहेत याचेही विश्लेषण करता येईल. किरकोळ व्यापारातील थेट विदेशी गुंतवणूकीच्या संधी यावरही अभ्यास करणे शक्य आहे.

विदेशी गुंतवणूकीमुळे उपभोग रचना, देशी उद्योग आणि राष्ट्राच्या स्वत:च्या धोरणांवर काय परिणाम झाला यावरही प्रकाश टाकता येईल. विविध देशांमार्फत झालेल्या विदेशी गुंतवणूकीबाबतचा अनुभव व त्याचे विश्लेषण कसे उपयुक्त आहे, कोणत्या देशाने भारतात केलेली गुंतवणूक अधिक फायदेशीर ठरली आहे. याबाबतही निबंध लिहिता येतील. याशिवाय विदेशी गुंतवणूक, थेट विदेशी गुंतवणूक व त्यांचे भारतावरील परिणाम या संदर्भातील इतर मुद्द्यांवरही निबंधलेखक निबंध लिहू शकतील.

हे त्रैमासिक डॉ. अनिल सूर्यवंशी (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी- ४१३ ४११, जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळ-सद्यस्थिती व भवितव्य


**लालासाहेब ना. घाटगे**, सातारा

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

छत्रपती शिवाजी कॉलेज.

भ्रमणध्वनीः ९८५०११०७४६


स्वातंत्र्योतर काळात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, केरळ, तामिळनाडू यासारख्या निवडक ११ ते १२ घटकराज्यांत सहकार वेगाने वृद्धिंगत झाला आहे. महाराष्ट्र हे भारतातील सहकारी चळवळीच्या विकासातील अव्वल दर्जाचे घटक राज्य मानता येईल. १ मे १९६० मध्ये महाराष्ट्र हे स्वतंत्र घटकराज्य म्हणून उदयास आले. राज्यात सहकारी पतपुरवठा व बिगरपतपुरवठ्याच्या क्षेत्रात १९६० पूर्वी विकास झालेला होता. तथापि १९६० च्या 'महाराष्ट्र सहकार अधिनियम' पारित झाल्यानंतर राज्यातील सुजान नेतृत्वाच्या मार्गदर्शनातून सहकाराने शेती, कृषी उद्योग, बँक व्यवस्था, कृषी पूरक उद्योग, दुग्धव्यवसाय इत्यादि क्षेत्रात आधाडी घेतली. १९५१ ते १९९० या काळात राज्यसरकारने सहकारी संस्थांना केलेल्या वित्तीय मदतीचा सहभाग अत्यंत महत्वाचा होता हे आपणास विसरुन चालणार नाही. राज्यातील सहकारी चळवळीची सध्यस्थिती विचारात घेताना सहकारी पतपुरवठा, सहकारी साखर उद्योग, सहकारी दुग्ध व्यवसाय, इत्यादि क्षेत्रातील योगदान विचारात घेणे उचित ठरते. आजमितीस महाराष्ट्रात सुमारे २ लाख विविध प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. 'महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - सद्यस्थिती व उपाययोजना'' या विषयावर शोधनिबंध लिहिताना लेखकांना पुढील मुद्दे विचारात घेऊन निबंध लिहिता येतील -

१) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची सध्यस्थिती विचारात घेताना राज्यातील कृषी व बिगर कृषी सहकारी संस्थांचा प्रगतीचा आढावा घेवून सहकाराचे आर्थिक विकासातील योगदान अद्ययावत आकडेवारीचा आधार घेवून स्पष्ट करता येईल. प्रसंगी आपल्या जिल्ह्यातील सहकारी संस्थाच्या विशेष कामगिरीचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करुन विवेचन करता येईल.

२) महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची प्रादेशिक विभागानुसार प्रगती अजमावता येईल. यामध्ये प्रामुख्याने १९६०-६१ ते १९९०-९१ व १९९०-९१ नंतर अशा

दोन कालखंडात कृषी पतपुरवठा संस्था, सह.बँका, दुग्ध सह.संस्था, सह.सुतगिरण्या, सह.साखर कारखाने यांचे योगदान अभ्यासता येईल.

३) राज्यांच्या सर्वांगीण आर्थिक विकासात सहकारी चळवळीची भूमिका विचारात घेताना सहकारी संस्थांच्या विकासातील प्रादेशिक असमतोल व त्याचा प्रादेशिक विकासावर झालेला परिणाम या अनुषंगाने शोधनिबंध लिहता येऊ शकतील. सदरहू विवेचन समग्रलक्षी (राज्यस्तरावरील) व व्यष्टी पद्धतीने करता येईल.

४) १९६० चा महाराष्ट्र सहकार कायदा, त्याचे महत्त्व व ९७ वी घटनादुरुस्ती विचारात घेवून फेब्रुवारी २०१२ मध्ये केंद्र सरकारने पारित केलेले विधेयक विचारात घेवून त्यावर गुजरात व महाराष्ट्र सरकारने सहकारी व्यवस्थेत केलेले बदल यांचा साकल्याने व चिकित्सक पद्धतीने अभ्यास करुन शोधनिबंध लिहिता येऊ शकतील.

५) राज्याच्या सहकारी क्षेत्राच्या विकासात सहकारातील नेतृत्व अधिक प्रभावशाली ठरले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील सहकार नेतृत्वाने सहकारी चळवळीत केलेले योगदान विचारात घेऊन जिल्हानिहाय वास्तवस्थिती विचारात घेऊन शोधनिबंध तयार करता येतील. यामध्ये कै.वसंतदादा पाटील, कै.यशवंतराव चव्हाण, कै. तात्यासाहेब कोरे, कै. राजारामबापू पाटील, कै.विठ्ठलराव विखे-पाटील यासारख्या सहकारातील धुरंधर नेतृत्वाची कामगिरी अजमावता येईल.

६) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा अभ्यास सहकारी साखर कारखान्यांच्या योगदानाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. त्यासाठी राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या सध्यस्थिती व समस्यांवर आधारित व्यष्टी व समष्टी पद्धतीने निबंध तयार करता येवू शकतील.

७) महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती बँका, दुग्ध सहकारी संस्था, कृषि सहकारी संस्था, सहकारी सूत गिरण्या यांचे ग्रामीण विकासातील योगदान अत्यंत महत्त्वाचे असून शोधनिबंध लेखकांनी आपापल्या जिल्ह्यांतील वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या सह.संस्थांचा चिकित्सक आढावा घेवून निबंध तयार करावेत.

८) राज्यातील सहकारी चळवळीचे भवितव्य विचारात घेता, नव्या आर्थिक वातावरणाचा विविध सहकारी संस्थांवर झालेला परिणाम निबंधाच्या रुपाने विषद करता येईल.

९) महाराष्ट्र हे देशातील सहकाराच्या प्रगतीबाबतचे प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. सहकाराच्या उज्वल भवितव्यासाठी सहकारातील नेतृत्व व अपप्रवृत्तींवर प्रकाश टाकून निबंध लेखकांना निबंध तयार करता येतील.

१०) सहकाराची मचेस्टर तत्वे व सहकारी संस्थांचे व्यवस्थापन यांचे अतूट नाते आहे. या दृष्टीने राज्यातील अकार्यक्षम सहकारी संस्थांचे अवलोकन करुन सहकारी तत्वांची सहकाराच्या भविष्यकालीन वाटचालीतील भूमिका या अनुषंगाने शोधनिबंध तयार करता येतील.

११) राज्य सरकारची सहकारी चळवळीच्या विकासात भूमिका काय असावी? याबाबत शोधनिबंध तयार करता येतील.

१२) सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुक्त अर्थव्यवस्थेत विद्यमान स्पर्धात्मक स्थितीत सहकारी क्षेत्र अधिक कार्यक्षम बनविण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करता येईल याचा सांगोपांग विचार करुन निबंध तयार करता येतील.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## सदतिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सदतिसावे वार्षिक अधिवेशन पिपल्स वेल्फेअर सोसायटी अमरावती संचलित कै.नारायणराव अमृतराव देशमुख महाविद्यालय, चांदूर बाजार, जि.अमरावती येथे ऑक्टोबर/ नोव्हेंबर २०१३ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. सातारा येथील डॉ.जगन्नाथ पाटील हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य एस. एन.देशमुख, स्थानिक कार्यवाह प्रा. वनिता बी. चौरे (भ्रमणध्वनी:९७३००६७४००) हे आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

***१) मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात विषमता आणि दारिद्र्य याबाबत सैध्दान्तिक विवेचन.***

***२) विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम.***

***३) महाराष्ट्राच्या साखर उद्योगाची सद्यस्थिती व भवितव्य.***

वरील विषयांचे टिपण सूत्रसंचालकांनी ***अर्थसंवाद*** च्या या अंकामध्ये दिले आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त २००० शब्दात विषय मांडावयाचा असून निबंधासोबत ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंध **Shree-Dev7-2336** या फॉन्टमध्ये **PageMaker 6.5** या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ **14** असावी. MS-Word मध्ये टाईप करू नयेत. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असला पाहिजे. निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रसिध्द केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहिलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. दि.३१ ऑगस्ट २०१३ ही निबंध स्वीकारण्याची अंतीम तारीख राहील. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**जगन्नाथ शामराव पाटील,**
शांती प्लाझा, बी-९, ८८०/८८१,
शनिवार पेठ, सातारा - ४१५ ००२
भ्रमणध्वनी : ९४२३२६१७९६, दूरध्वनी: ०२१६२-२३३१५२.

- अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

## 'अर्थसंवाद' : जागतिकीकरण विशेषांक: संशोधनपर लेख पाठवा

***अर्थसंवाद: जुलै-सप्टेंबर २०१३*** हा ***जागतिकीकरण विशेषांक*** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ४/५ पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावा. लेख स्वीकारण्याची अंतिम मुदत २० ऑगस्ट २०१३ पर्यंत आहे. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित केले आहे.

विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१) औद्योगिक बाजारपेठेचे जागतिकीकरण, २) खनिजतेलाचे अर्थशास्त्र, ३) परकीय गुंतवणुकीचा भारतातील किरकोळ क्षेत्रावरील परिणाम, ४) बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवहाराचा विविध देशातील अर्थव्यवस्थांवर परिणाम, ५) जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावरील परिणाम, ६) जागतिकीकरणाचा विकसित देशातील अर्थव्यवस्थेवर परिणाम, ७) जागतिकीकरणाचा अविकसित देशातील अर्थव्यवस्थेवर परिणाम, ८) जागतिकीकरण, व्यापार व उद्योगामधील उच्च तंत्रज्ञान, ९)जागतिकीकरणाचा जगातील सहकारक्षेत्रावरील परिणाम, १०) BRICS संघटना आणि विकास ११) जागतिक व्यापार पध्दतीत जागतिकीकरणामुळे झालेले बदल, १२) जागतिकीकरणाचा कापड निर्मिती करणाऱ्या देशावरील परिणाम १३) जागतिकीकरणाचा पर्यटनक्षेत्रावरील परिणाम १४) जागतिकीकरण, शहरीकरण व विकास १५) जागतिकीकरणाचा बँकींग क्षेत्रावरील परिणाम

**विशेषांकासाठी शोधनिबंध पाठविताना लेखकांनी घ्यावयाची काळजी:**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. गरज असल्यास एखादा लहान आकाराचा टेबल घ्यावा. एकापेक्षा अधिक टेबल असू नयेत.
- PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word **मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत.**
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.अनिल सूर्यवंशी,
मुद्रक व प्रकाशक



मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष

## श्री. र. पु. कुरुलकर

यांना

मराठी अर्थशास्त्र परिषद परिवारातर्फे
भावपूर्ण श्रध्दांजली !

